# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१३/ २०१८** **दिनांक २०.११.२०१८**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.३० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा मंगळवार दि.२०.११.२०१८ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये दुपारी १२.३० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/४०३२/२०१८, दि.१२.११.२०१८ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार मंगळवार दि.२०.११.२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य ०४. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
०५. मा.सौ.योगिता अभय शेळके पाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे यांनी जा.क्र.१९४/२०१८, दि.१५.११.२०१८ रोजीचे पत्रान्वये तसेच समिती सदस्य मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंह यांनी दुरध्वनीव्दारे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

मा.डॉ.मनिषा कायंदे, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२०.११.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. परंतु या बैठकीस मी हजर राहणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व पर्यावरण मंत्री मा.श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व माननीय मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत अजून कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने, त्याचा मला खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहण्यास मला स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मा.श्री. रविंद्र मिर्लेकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२०.११.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस माझ्यासकट शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी.

तसेच मा.श्री.अमोल कीर्तीकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२०.११.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. परंतु या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव मा.श्री.अनिल देसाई व पर्यावरण मंत्री मा.श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे, खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी ०१.०० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक ०१.११.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६९७** **दिनांक ०१.११.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

१) **निर्णय क्र.६४१-** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमानिमीत्त मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९.१०.२०१८ रोजीचे शिर्डी येथील दौरा व कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी ठेकेदार श्री.बी.एस.कातूरे, पुणे यांनी सादर केलेल्या वाढीव कामाचे बील रक्कम रु.६९,२७,१७३/- मात्र यास मान्यता देण्यात आली. तसेच वाढीव खर्चासह एकूण रु.१,५४,३२,४२३/- मात्र ठेकेदार श्री.बी.एस.कातूरे, पुणे यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. तथापी

ठेकेदार श्री.बी.एस.कातूरे, पुणे यांनी प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या मोजमापाप्रमाणे तपासणी करुन त्यानंतर प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार बिलाची रक्कम आदा करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप या कार्यक्रमासोबत शासनाचा पंतप्रधान आवास योजणेअंतर्गत ई-गृह प्रवेश हा कार्यक्रम एकत्रित घेण्यात आला. या कार्यक्रमामुळे मुळची २० हजार व्यक्तींची मंडप व अनुषंगीक व्यवस्था वाढवून पंतप्रधान आवास योजनेचा ई-गृहप्रवेश कार्यक्रमासाठी ८० हजार व्यक्तींची मंडप व अनुषंगीक व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९.१०.२०१८ रोजीचे शिर्डी येथील दौरा व कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी ठेकेदार श्री.बी.एस.कातूरे, पुणे यांनी सादर केलेल्या वाढीव कामाचे बील रक्कम रु.६९,२७,१७३/- मात्र यास मान्यता देण्यात आली. तसेच वाढीव खर्चासह एकूण रु.१,५४,३२,४२३/- मात्र ठेकेदार श्री.बी.एस.कातूरे, पुणे यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. तथापी ठेकेदार श्री.बी.एस.कातूरे, पुणे यांनी प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या मोजमापाप्रमाणे तपासणी करुन त्यानंतर प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार बिलाची रक्कम आदा करणेत यावी, असे ठरले.** **(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

२) निर्णय क्र.६४९- यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ६ रस्ते भूसंपादन (अंदाजे खर्च रु.१६३.५५ कोटी) करणेकामी भुसंपादन कायद्यानुसार प्रक्रिया करणेत यावी, तसेच सदर जमीनीचे भूसंपादन संस्थानसाठी होणारे नसून नगर पंचायतीसाठी होणार आहे. त्यामुळे त्यासाठी दि. २५/०६/२०१८ च्या शासन निर्णयाव्दारे विहित करण्यात आलेले जमीन खरेदी धोरण सदर प्रस्तावास लागू होणार नाही, असे अभिप्राय छाननी समितीच्या मान्यतेने शासनास सादर करावे, असे ठरले. तसेच प्रस्तावातील अ.नं.४ विकास योजनेतील १५ मिटर रुंदीच्या रस्ता (जैन मंदिरालगत नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता) या प्रस्तावीत रस्त्याच्या उत्तर व दक्षिण बाजुस अंदाजे ५०० मिटर अंतरावर दोन रस्ते अस्तित्वात आहेत. त्यामुळे या रस्त्याची आवश्यकता नाही. तसेच हा रस्ता लोकवस्तीमधुन जात असल्याने स्थानिक लोक त्यामुळे विस्थापीत होणार आहे. सदर रस्त्याकरीता जागा व घरांसाठीचा मोबदला यासाठी भुसंपादनाची रक्कम मोठया प्रमाणात द्यावी लागणार असल्याने, या रस्त्यासाठी निधी देण्यात येऊ नये, असे ठरले.

तसेच याकामी छाननी समितीची शिफारस घेऊन, प्रस्ताव शासनास सादर करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ६ रस्ते भूसंपादन (अंदाजे खर्च रु.१६३.५५ कोटी) करणेकामी भुसंपादन कायद्यानुसार प्रक्रिया करणेत यावी, तसेच सदर जमीनीचे भूसंपादन संस्थानसाठी होणारे नसून नगर पंचायतीसाठी होणार आहे. त्यामुळे त्यासाठी दि. २५/०६/२०१८ च्या शासन निर्णयाव्दारे विहित करण्यात आलेले जमीन खरेदी धोरण सदर प्रस्तावास लागू होणार नाही, असे अभिप्राय छाननी समितीच्या मान्यतेने शासनास सादर करावे, असे ठरले.**

**तसेच शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ६ रस्ते भूसंपादनासाठी अंदाजे खर्च रक्कम रु.१६३.५५ कोटी शिर्डी नगरपंचायतीस देणेस मान्यता देण्यात आली, व सदरचा प्रस्ताव छाननी समितीचे मान्यतेने शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, तसेच सुधारित विकास आराखडा मंजूर होईपर्यंत प्रस्तावातील अ.नं.४ विकास योजनेतील १५ मिटर रुंदीच्या रस्ता (जैन मंदिरालगत नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता) या रस्त्याच्या भुसंपादनासाठीचा निधी राखुन ठेवण्यात यावा व उर्वरीत ५ रस्त्यांचा भुसंपादनाचा निधी शासनाचे मान्यतेनंतर शिर्डी नगरपंचायतीकडे वर्ग करावा, असे ठरले. तसेच याकामी छाननी समितीची शिफारस घेऊन प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग/ प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग /मुख्यलेखाधिकारी)**

---

३) निर्णय क्र.६५७- यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या १४ कियॉस्क/गाळे वापरासाठी दि.०७/१०/२०१८ ते दि.०६/०९/२०१९ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रति कियॉस्क मागील मासिक भाडे रु.४,३९२/- मध्ये १०% वाढ करुन (रु.४,३९२/- +१०% रक्कम रु.४३९/-= रु.४,८३१/-) रु.४,८३१/- (अक्षरी रक्कम रु.चार हजार आठशे एकतीस

मात्र) इतकी व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि.शिर्डीचे चेअरमन व सदस्य यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर चर्चेसाठी बोलविण्यात यावे व तोपर्यत सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.०२** **मे. वैभव प्लेसमेंट्स (प्रा.) लिमिटेड, नाशिक यांनी संस्थानचे मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत (Manpower Energy Audit) सादर केलेल्या परिक्षण अहवालाबाबत.**

**प्रस्ताव-** अ) सन २०१६ मध्ये संस्थानचे ३९ विभागांमध्ये काम करत असलेल्या कायम, कंत्राटी व आऊटसोर्स कर्मचा-यांचे दैनंदिन कामाचे व त्यांच्या कार्यक्षमतेचे मनुष्यबळ व्यवस्थापन सल्लागार संस्थेमार्फत (Human Resource Management Consultant) परिक्षण करणेकामी संस्थानचे संकेतस्थळासह महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये प्रसिध्द होणा-या वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन त्यानुसार प्राप्त झालेल्या सिलंबद व्यावसायिक प्रस्तावांमधील निम्नतम दरधारक मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांची मा.त्रिसदस्य समितीचे दि.१४/०६/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६५ अन्वये जा.नं. एसएसएस /साप्रशा-आस्था/१८२३/२०१६ दि.१४ जुलै,२०१६ रोजीचा कार्यादेशाव्दारे रु.९,५१,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख एक्कावन्न हजार) मात्रचे दरावर (सर्व करासह) नेमणूक करणेत आलेली होती.

याकामी त्यांना कार्यादेशातील अटी-शर्तीनुसार प्रत्यक्ष कामास सुरुवात केलेनंतर रु.३,००,०००/- व अहवाल सादर केलेनंतर त्यांचे दि.२०/१०/२०१६ रोजीचे लेखी मागणीनुसार व तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांचे तोंडी सुचनेनुसार आस्थापना विभागाच्या दि.०२/११/२०१६ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये रु.४,००,०००/- असे एकूण रु.७,००,०००/- (अक्षरी रुपये सात लाख मात्र) ॲडव्हॉन्स म्हणून अदा करणेत आलेले आहेत. त्यानंतर त्यांना अद्यापपर्यंत उर्वरीत रक्कम अदा करणेत आलेली नाही.

मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांनी वरील नेमणूक आदेशानुसार मनुष्यबळ व्यवस्थापन (Manpower Energy Audit) करुन केलेल्या कामाच्या अहवालाच्या प्रती त्यांचेमार्फत दि.२०/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये मा.अध्यक्ष महोदय, मा.उपाध्यक्ष महोदय व मा. कार्यकारी अधिकारी यांचेकडेस सादर केलेल्या आहेत. तसेच सदर अहवालाच्या छायांकित प्रती इकडील विभागामार्फत सर्व समिती सदस्यांना माहितीसाठी उपलब्ध करुन देणेत आलेल्या आहेत.

त्यास अनुसरुन मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांनी सादर केलेल्या अहवालाबाबत दि.२४ नोव्हेंबर, २०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदयांनी पुढील मुद्यांबाबत सविस्तर अहवाल मागविणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

१. अहवालात सादर केलेल्या प्रत्येक विषय / मुद्यांसदर्भात स्तंभ आलेख (Bar Chart)

२. अहवालात सादर केलल्या प्रत्येक कर्मचा-यांच्या वैयक्तिक कामाचा सविस्तर अहवाल (Job Chart).

उपरोक्त निर्देशानुसार कार्यवाही करणेसाठी मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांना दि.२७/१२/२०१६ रोजी पत्र देण्यात आले. त्यानुसार त्यांनी दि.३१/१२/२०१६ रोजी ई-मेलव्दारे स्तंभ आलेख सादर केलेले आहेत. तथापी, मुद्दा क्र.०२ ची माहिती सादर केलेली नाही. याबाबत मे.वैभव प्लेसमेंट्स यांना वेळोवेळी पत्राने तसेच दुरध्वनीव्दारे कळविणेत आलेले आहे. तथापी, त्यांनी अहवालात सादर केलेल्या प्रत्येक कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाचा सविस्तर अहवाल (Job Chart) सादर न केल्यामुळे याबाबत सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यास अनुसरुन निर्णय क्र.२५८ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. वैभव प्लेसमेंट्स (प्रा.) लिमिटेड, नाशिक यांनी संस्थानचे मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत (Manpower Energy Audit) सादर केलेल्या परिक्षण अहवालाबाबत विषयात नमूद मुद्यांच्या अनुषंगाने तपशीलवार माहिती मागवावी. तसेच त्यांनाही सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले."

उपरोक्त निर्देशानुसार कार्यवाही करणेसाठी मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांना दि.२७/१२/२०१६ रोजी पत्र देण्यात आले. त्यानुसार त्यांनी दि.३१/१२/२०१६ रोजी ई-मेलव्दारे स्तंभ आलेख सादर केलेले आहेत. तथापी, मुद्दा क्र.०२ ची माहिती सादर केलेली नाही. याबाबत मे.वैभव प्लेसमेंट्स यांना

दि.२५/०४/२०१७, दि.०४/१०/२०१७ रोजी पत्र देणेत आलेले आहे. तसेच वेळोवेळी दुरध्वनीव्दारे कळविणेत आलेले आहे. तथापी, त्यांचेकडून अहवालात सादर केलेल्या प्रत्येक कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाचा सविस्तर अहवाल (Job Chart) सादर केलेला नाही.

ब) तथापी, उपरोक्त निर्णयास अनुसरुन, आस्थापना विभागाकडील दि.०२/०६/२०१८ रोजीचे मंजूरी टिपणीनुसार जा.नं.एसएसएस/साप्रशा-आस्था/१८९९/२०१८ दि.१८ जुलै, २०१८ रोजीचे पत्राने मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१८ रोजी होणा-या सभेपुढे चर्चेसाठी उपस्थीत राहणेबाबत कळविणेत आले होते.
त्यानुसार मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांचे प्रतिनिधी श्री. श्रीधर व्यवहारे हे दि.२६/०७/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उपस्थीत होते.

यावेळी त्यांनी सदर कामाचे भाग -१ व भाग -२ असे दोन भाग होते, भाग- १ चा कार्यादेश मिळाला आहे. त्याप्रमाणे अहवाल सादर करण्यात आला असून, तो संस्थानने मान्य केल्यानंतर व संस्थानने कार्यादेश दिल्यास भाग -२ चे काम सुरु केले जाईल. भाग -२ साठी मानधन निश्चीत करण्यात आलेले नाही, असे नमूद केले.

तथापी, संस्थानने दिलेल्या दि.१४/०७/२०१६ चे कार्यादेशाप्रमाणे मे. वैभव प्लेसमेंट (प्रा) लिमिटेड, नाशिक यांना भाग-१ व भाग-२ असे दोन्ही भागाचे काम देण्यात आले असून त्यांचे एकत्रित मानधन रक्कम रु.९,५१,०००/- मात्र निश्चीत करण्यात आले आहे.

भाग-१ मध्ये - मनुष्यबळ संरचना, कामाची मांडणी, व्याख्या आणि विभागणी, कौशल्य तक्ता, मनुष्यबळ संख्या, मनुष्यबळ परिक्षणाबाबत अहवाल सादर करणे.

भाग-२ मध्ये - भाग-१ वर आधारीत सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार मनुष्यबळ संरचना करणे, कामाची विभागणी व त्यानुसार अंमलबजावणी करणे याबाबत उपाययोजना सुचविणे, संस्थानकडून अपेक्षित असलेली मदत, सल्लागार संस्थेचे शुल्क/ मानधन, इतर आवश्यक सर्व साधारण बाब, याकामांचा समावेश होता.

तसेच भाग-१ व भाग-२ प्रमाणे त्यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करावयाचा आहे. भाग-२ साठी स्वतंत्रपणे कळविण्याची आवश्यकता नाही, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नमूद केले.

" यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. वैभव प्लेसमेंट (प्रा) लिमिटेड, नाशिक यांनी त्यांचेकडील सर्व कागदपत्रांसह प्रशासनाशी संपर्क करावा, असे ठरले. (मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२६/०७/२०१८ निर्णय क्र.४७८) मा. व्यवस्थापन समितीचे वरील निर्णयानुसार मे. वैभव प्लेसमेंट्स (प्रा.) लिमिटेड, नाशिक यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा- आस्था/२६४५/२०१८ दि.०१/०९/२०१८ रोजीचे पत्राने त्यांचेकडील सर्व कागदपत्रासह संस्थान कार्यालयाशी संपर्क करणेबाबत कळविणेत आले होते.

क) मे. वैभव प्लेसमेंट, नाशिक यांनी वरील पत्राच्या अनुषंगाने इकडील कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क न करता, दि.१३/०९/२०१८ रोजीचे पत्रासोबत मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत अहवालाच्या एकूण १ ते ८७ पाने असलेली भाग २ ची प्रत इकडील कार्यालयास स्पीड पोष्टद्वारे पाठविली आहे. सदरहू अहवालाचे भाग २ मध्येही मा. अध्यक्ष महोदय यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रत्येक कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाचा सविस्तर अहवाल (Job Chart) सादर केलेला नाही.

भाग २ चे अहवालामध्ये त्यांनी भाग १ मध्ये नमूद केलेल्या मनुष्यबळ संरचना, कामाची विभागणी आणि त्यानुसार अंमलबजावणी करणे, याबाबत उपाय योजना सुविविणे इ. बाबींचा समावेश केलेला असून, त्यानुसार परिक्षणातील काही मुद्दे खालील प्रमाणे दिलेले आहेत.

१. स्वतंत्र मनुष्यबळ विभाग अस्तित्वात नाही, हा विभाग असणे आवश्यक आहे.
२. संस्थानमधील कर्मचा-यांची कार्यक्षमता, गुणवत्ता वाढवण्यासाठी विशेष योजना आखणे अतिशय गरजेचे आहे.
३. सर्वांगीण प्रशिक्षण आणि विकास कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.
४. योग्य जागी योग्य मनुष्यांचीच नेमणूक करुन कामकाजात सुधारणा करायला हवी.
५. वरिष्ठ पदाची व्यक्ती अपेक्षित असतांना कनिष्ठ स्तरावरील मनुष्य नेमून कामकाज रेटून नेल्याने संस्थानचेच नुकसान होते, अशा बाबी टाळता आल्यास फायदा होईल.
६. बढती, बदली, भरती यासारख्या बाबी अधिक पारदर्शकतेने तसेच काटेकोर नियमाने व्हायला हव्यात.
७. नियमांचे पालन यथायोग्य रितीने व्हायला हवे.
८. संगणकीकरण पूर्णपणे व्हायला हवे.

९. कर्मचारी गुणवत्ता पडताळणी, मुल्यमापन तसेच प्रोत्साहन कार्यक्रम राबवायला हवा.

१०. कार्यशैलीत सुधारणा करुन अधिक भक्ताभिमुख होणे गरजेचे आहे.

११. भरती, बढती, बदली, नेमणूका यामधील हस्तक्षेपापासून व्यवस्थापन आणि प्रशासन स्वतंत्र असावे.

वरीलप्रमाणे सर्वसाधारण बाबीचा समावेश करुन, त्याचे विश्लेषणरुपी अहवाल सादर केला असल्याचे सदर अहवालात नमूद केले आहे.

**ड)** तसेच, मे. वैभव प्लेसमेंट्स यांनी सादर केलेला अहवालाचा भाग १ मध्ये एकूण १८० पानांचा असून त्यामध्ये अंदाजे ३० ते ४० पाने परिक्षणाचे मूळ विषयाशी संबधीत आहेत. तसेच भाग २ मध्ये एकूण ८७ पाने असून, सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन केल्यास जी माहिती अहवालाचे भाग एक मध्ये दिलेली आहे तीच माहीती अहवालाचे भाग २ मध्येही नमूद केली असल्याचे दिसून येते. सदरचा अहवाल विस्तृत स्वरुपात नाही. तसेच सदर अहवालाचे भाग १ व भाग २ मध्ये वैभव प्लेसमेंट्स (प्रा.), लि. नाशिक यांनी सादर केलेल्या संस्थानचे विविध विभागांच्या कर्मचारी संख्येबाबत (आकृतीबंध) सुचविणेत आलेले बदलाबाबतचा थोडक्यात गोषवारा खालील प्रमाणे.

| अं. क्र | विभाग | मंजूर आकृतीबंध संख्या | | | सध्याची कर्मचारी संख्या | | | पर्याय १ | अपेक्षित बदल | | | | पर्याय २ | अपेक्षित बदल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कायम | कंत्राटी | एकूण | कायम | कंत्राटी | एकूण | | आकृतीबंध | | सद्यस्थिती | | | आकृतीबंध | | सद्यस्थिती | |
| | | | | | | | | | अधिक | कमी | अधिक | कमी | | अधिक | कमी | अधिक | कमी |
| ०१ | जनसंपर्क विभाग | १४ | ०२ | १६ | १४ | १४ | २८ | २८ | १२ | | | | २८ | १२ | | | |
| ०२ | मंदिर विभाग | ७४ | ११ | ८५ | ५६ | २४ | ८० | ११५ | ३० | | ३५ | | १५५ | ३० | | ३५ | |
| ०३ | विद्युत विभाग | ८३ | ३९ | १२२ | ७१ | ३० | १०१ | १३३ | | -९ | १२ | | ११३ | | ९ | १२ | |
| ०४ | **कॅन्टिन विभाग** | १२० | ४३ | १६३ | ८८ | १०३ | १९१ | २०२ | ३९ | | ११ | | १४ | | १४९ | | १७७ |
| ०५ | **साईबाबा भक्तनिवासस्थान** | १३६ | ०४ | १४० | ११० | ३४ | १४४ | १५६ | १६ | | १२ | | ६ | | १३४ | | १३८ |
| ०६ | **साईप्रसाद निवासस्थान** | ८३ | २८ | १११ | ४० | २० | ६० | ६३ | | ४८ | ३ | | ६ | | १०५ | | ५४ |
| ०७ | व्दारावती निवासस्थान | ३० | ५४ | ८४ | २४ | १० | ३४ | ३५ | | ४९ | १ | | ६ | | ७८ | | २८ |
| ०८ | **वाहन विभाग** | ५१ | ६८ | ११९ | ४४ | ८४ | १२८ | १३९ | २० | | ११ | | १९ | | १०० | | १०९ |
| ०९ | ध्वनीक्षेपन आणि टेलिफोन | २६ | १९ | ४५ | १८ | १५ | ३३ | ४४ | | ०१ | ११ | | ४४ | | ०१ | ११ | |
| १० | पाणी पुरवठा | ७० | १५ | ८५ | ६८ | १८ | ८६ | ९५ | १० | | ९ | | ९५ | १० | | ९ | |
| ११ | संरक्षण विभाग | १९५ | ४३४ | ६२९ | १२९ | ७८५ | ९१४ | ८८९ | २६० | | | २५ | ८८९ | २६० | | | २५ |
| १२ | **आरोग्य विभाग** | १९३ | ३०२ | ४९५ | १५५ | २२१ | ३७६ | ३५४ | | १४१ | | २२ | ६ | | ४८९ | | ३७० |
| १३ | मेकॅनिकल विभाग | ४४ | ९० | १३४ | १८ | २७ | ४५ | ६६ | | ६८ | २१ | | ६६ | | ६८ | २१ | |
| १४ | फायर आणि सेफ्टी | ०२ | ०४ | ०६ | १५ | ०८ | २३ | ४१ | ३५ | | १८ | | ४१ | ३५ | | १८ | |
| १५ | लेखाशाखा विभाग | ८५ | ०७ | ९२ | ५१ | २५ | ७६ | ९३ | ०१ | | १७ | | ९३ | ०१ | | १७ | |
| १६ | **प्रसादालय विभाग** | ३६० | ४१४ | ७७४ | २९२ | ३४१ | ६३३ | ७३४ | | ४० | १०१ | | ५१ | | ७२३ | | ५८२ |
| १७ | प्रसादालय प्रयोगशाळा | ० | ० | ० | ०२ | ० | ०२ | ९ | ०९ | | ०७ | | ९ | ०९ | | ०७ | |
| १८ | प्रकाशने | २३ | ०५ | २८ | १६ | १८ | ३४ | ३९ | ११ | | ०५ | | ३९ | ११ | | ०५ | |
| १९ | सामान्य प्रशासन | ६१ | २१ | ८२ | ३८ | ३६ | ७४ | ७६ | | ०६ | ०२ | | ७६ | | ०६ | ०२ | |
| २० | विधी विभाग | ०४ | ० | ०४ | ०४ | ० | ०४ | ६ | ०२ | | ०२ | | ६ | ०२ | | ०२ | |
| २१ | सभाकामकाज विभाग | ०८ | ० | ०८ | ०४ | ० | ०४ | ७ | | ०१ | ०३ | | ७ | | ०१ | ०३ | |
| २२ | कामगार विभाग | १० | ० | १० | ०६ | ०२ | ०८ | ११ | ०१ | | ०३ | | ११ | ०१ | | ०३ | |
| २३ | खरेदी विभाग | ११ | ०३ | १४ | ०७ | ०४ | ११ | १४ | | | ०३ | | १४ | | | ०३ | |
| २४ | भांडार विभाग | १४ | ० | १४ | ०९ | ०५ | १४ | १५ | ०१ | | ०१ | | १५ | ०१ | | ०१ | |
| २५ | बांधकाम विभाग | १०२ | २२ | १२४ | ७१ | १३ | ८४ | ८४ | ० | ४० | | | ८४ | | ४० | | |
| २६ | बगीचा विभाग | ३९ | ० | ३९ | ४६ | ०९ | ५५ | ५५ | १६ | | | | ३ | | ३६ | | ५२ |
| २७ | दप्तर विभाग | ०५ | ०२ | ०७ | ०३ | ०१ | ०४ | ७ | | | ०३ | | ७ | | | ०३ | |
| २८ | माहिती तंत्रज्ञान विभाग | १८ | ०३ | २१ | ०५ | १९ | २४ | २७ | ०६ | | ०३ | | २७ | ०६ | | ०३ | |
| २९ | मुंबई कार्यालय | १२ | ०५ | १७ | ०४ | ०४ | ०८ | ११ | | ०६ | ०३ | | ११ | | ०६ | ०३ | |
| ३० | **सी.सी.टि.व्ही** | ० | ० | ० | १७ | ०७ | २४ | २५७ | | ० | २३३ | | २५७ | २५७ | | २३३ | |
| ३१ | साईआश्रम भक्तनिवास | ० | ० | ० | १२ | ०० | १२ | ६ | | ० | | ६ | ६ | ०६ | | | ०६ |
| ३२ | साई धर्मशाळा | ० | ० | ० | ०५ | ० | ०५ | ६ | | ० | ०१ | | ६ | ०६ | | ०१ | |
| ३३ | लाडू व बर्फी प्रसाद | ० | ० | ० | १२ | ११ | २३ | २० | | ० | | ३ | ६ | ०६ | | | १७ |
| ३४ | मालमत्ता | ० | ० | ० | ०३ | ०२ | ०५ | ५ | | ० | | | ५ | ०५ | | | |
| ३५ | मागसवर्ग | ० | ० | ० | ०३ | ० | ०३ | ४ | | ० | ०१ | | ४ | ०४ | ० | ०१ | |
| ३६ | श्री साईबाबा इंग्लिश मेडियम | ४१ | ०६ | ४७ | ४५ | ४० | ८५ | ९४ | ४७ | ० | ०९ | | ९४ | ४७ | ० | ०९ | |
| ३७ | आय.टी.आय | ५१ | ० | ५१ | ४१ | ०४ | ४५ | ५० | | ०१ | ०५ | | ५० | ० | ०१ | ०५ | |
| ३८ | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर | २५ | ०३ | २८ | १९ | ०८ | २७ | ३१ | ०३ | ० | ०४ | | ३१ | ०३ | ० | ०४ | |

| | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३९ | श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय | ३७ | ०८ | ४५ | ३५ | १५ | ५० | ५४ | ०९ | ० | ०४ | | ५४ | ०९ | ० | ०४ | |
| ४० | **श्री साईनाथ रुग्णालय** | ३६२ | ८१ | ४४३ | २२८ | १५३ | ३९१ | ७१३ | २७० | ० | ३२२ | | ७१३ | <u>२७०</u> | ० | <u>३२२</u> | |
| ४१ | **श्री साईबाबा हॉस्पीटल** | ५१९ | २२५ | ७४४ | २६५ | ३६३ | ६२७ | १०५१ | ३०७ | ० | ४२४ | | १०५१ | <u>३०७</u> | ० | <u>४२४</u> | |
| | **एकूण** | **२९०८** | **१९१८** | **४८२६** | **२०९३** | **२४७३** | **४५७५** | **५८१९** | **१४०३** | **४१०** | **१३००** | **५६** | **४१७८** | **१२९८** | **१९४६** | **११६१** | **१५५८** |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन केल्यानंतर कॅन्टिन विभाग, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान, वाहन विभाग, आरोग्य विभाग, प्रसादालय विभाग, सी.सी.टि.व्ही, साईनाथ रुग्णालये व साईबाबा हॉस्पीटल इ. विभागांची मंजूर आकृतीबंधाची संख्या, सध्या कार्यरत कर्मचारी संख्या आणि परिक्षणानंतर कमी करावयाच्या किंवा अतिरिक्त उपलब्ध करुन द्यावयाच्या कर्मचारी संख्येमध्ये मोठा विरोधाभास / तफावत आहे किंवा त्या संख्या न पटणा-या आहेत. त्याबाबत वैभव प्लेसमेंट यांनी कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. तसेच अहवालामध्ये सादर केलेल्या सध्याचे कार्यरत कर्मचा-यांचा वर्कलोड पुर्णवेळ आहे काय ? याबाबतही स्पष्टीकरण दिलेले नाही. मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि. नाशिक यांना संस्थानचे विविध विभागात बदल करावयाच्या कर्मचारी संख्यमध्ये कशाच्या आधारे बदल करावयाचा याबाबतचे स्पष्टीकरण अद्यापपर्यंत देता आलेले नाही. याचाच अर्थ परिक्षण अहवालामध्ये सादर केलेल्या कर्मचा-यांची विभागनिहाय बदल करावयाची कमी व अधिक संख्या परिक्षणाच्या प्राथमिक अंदाजानुसार ढोबळमनाने सादर करण्यात आलेल्या आहेत, असे इकडील मत आहे.

| अ.क्र | विभाग | मंजूर आकृतीबंध संख्या | | | सध्याची कर्मचारी संख्या | | | अपेक्षित बदल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कायम | कंत्राटी | एकूण | कायम | कंत्राटी | एकूण | अधिक (आकती-बंधात बदल करावयची संख्या) | कमी (आकती-बंधात बदल करावयची संख्या) | अधिक (अतिरिक्त उपलब्ध करुन द्यावयाची संख्या) | कमी (अतिरिक्त कर्मचारी कमी करावयाची संख्या) |
| ०१ | कॅन्टिन विभाग | १२० | ४३ | <u>१६३</u> | ८८ | १०३ | <u>१९१</u> | ० | <u>१४९</u> | ० | <u>१७७</u> |
| ०२ | साईबाबा भक्तनिवासस्थान | १३६ | ०४ | <u>१४०</u> | ११० | ३४ | <u>१४४</u> | ० | <u>१३४</u> | ० | <u>१३८</u> |
| ०३ | साईप्रसाद निवासस्थान | ८३ | २८ | <u>१११</u> | ४० | २० | <u>६०</u> | ० | <u>१०५</u> | ० | <u>५४</u> |
| ०४ | व्दारावती निवासस्थान | ३० | ५४ | ८४ | २४ | १० | ३४ | ० | ७८ | ० | २८ |
| ०५ | वाहन विभाग | ५१ | ६८ | <u>११९</u> | ४४ | ८४ | <u>१२८</u> | ० | <u>१००</u> | ० | <u>१०९</u> |
| ०६ | आरोग्य विभाग | १९३ | ३०२ | <u>४९५</u> | १५५ | २२१ | <u>३७६</u> | ० | <u>४८९</u> | ० | <u>३७०</u> |
| ०७ | प्रसादालय विभाग | ३६० | ४१४ | <u>७७४</u> | २९२ | ३४१ | <u>६३३</u> | ० | <u>७२३</u> | ० | <u>५८२</u> |
| ०८ | सी.सी.टि.व्ही | ० | ० | ० | १७ | ०७ | <u>२४</u> | <u>२५७</u> | ० | <u>२३३</u> | ० |
| ०९ | श्री साईनाथ रुग्णालय | ३६२ | ८१ | <u>४४३</u> | २२८ | १५३ | <u>३९१</u> | <u>२७०</u> | ० | <u>३२२</u> | ० |
| १० | श्री साईबाबा हॉस्पीटल | ५१९ | २२५ | <u>७४४</u> | २६५ | ३६३ | <u>६२७</u> | <u>३०७</u> | ० | <u>४२४</u> | ० |

मे. वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांनी सादर केलेल्या अहवालातील उपरोक्त काही विभागांचा गोषवारा तपासल्यास उपरोक्त तक्त्यातील सध्या कार्यरत कर्मचारी संख्या आणि परिक्षणानंतर कमी करावयाच्या किंवा अतिरिक्त उपलब्ध करुन द्यावयाच्या कर्मचारी संख्येमध्ये मोठा विरोधाभास / तफावत आहे किंवा त्या संख्या न पटणा-या आहेत. त्याबाबत वैभव प्लेसमेंट यांनी कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. उदा. एखाद्या विभागात एखाद्या पदनामाच्या कर्मचा-यांची आवश्यकता अतिरिक्त किंवा कमी का करावयाचे आहेत याची प्रत्यक्ष कर्मचा-यांच्या कार्यस्थळावर जाऊन पहाणी करुन, पहाणीवेळी निर्देशनास आलेल्या विविध मुद्दयांच्या तपशिलासह, पुराव्यासह व कारणासह विस्तृत स्वरुपात अहवाल सादर केलाला नाही. अशा अहवालानुसार कार्यवाही करावयाची झाल्यास एखाद्या विभागातील कर्मचारी संख्या कमी करणे अथवा वाढविणेस कुठलाही तंत्रशुध्द आधार शिल्लक राहत नाही. तसेच त्यांचेकडे प्रत्येक कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाचा सविस्तर माहिती (Job Chart) वेळोवेळी लेखी पत्राव्दारे मागीतलेला असतांना, अद्याप त्यांनी कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाचे जॉब

चार्ट सादर केलेले नाहीत. याचाच अर्थ परिक्षण अहवालामध्ये सादर केलेल्या कर्मचा-यांची विभागनिहाय बदल करावयाची कमी व अधिक संख्या परिक्षणाच्या प्राथमिक अंदाजानुसार ढोबळमनाने / अंदाजे सादर करण्यात आलेल्या आहेत हे सिध्द होते.

**(इ)** तसेच, मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांनी सुधारीत आकृतीबंधातील पदे आणि पदसंख्या यांचा तक्ता दोन पर्यायामध्ये दिला आहे. त्यानुसार पर्याय १ नुसार यामध्ये संस्थानमधील अनावश्यक व अतिरिक्त पदे कमी करुन, आवश्यक असलेली पदे वाढविण्यात आली आहे. पर्याय २ मध्ये संस्थानमधील काही विभागांचे संपूर्ण कामे आऊटसोर्स माध्यमातुन चालविली जावी अशी शिफारस करुन त्यानुसार पदसंख्या निर्धारित केली आहे.

त्यानुसार आकृतीबंध बदल शिफारस विश्लेषण तक्ता खालीलप्रमाणे दिला आहे.

| विभाग | पर्याय १ (सद्यपरिस्थीतीनुसार) | पर्याय २ (काही विभाग आऊटसोर्स) |
|---|---|---|
| जनसंपर्क | प्रसिध्दी अधिकारी तसेच मार्गदर्शक आवश्यक आहे. | - |
| मंदिर | पुजारी आणि सहाय्यक पुजारी पुरेसे भरती केले जावे. | - |
| विद्युत | केवळ मदतनीस न भरता इलेक्ट्रीकल हेल्पर भरले जावे. ऑटोकॅड ऑपरेटर आवश्यक आहे. | - |
| कॅन्टीन | पुरेशा प्रमाणात पर्यवेक्षक आणि मुकादम आवश्यक आहे. कुपन विक्रेत्यांची कामे लिपीक / मुकादम करु शकतात. | अधिक्षक, पर्यवेक्षक आणि एक लिपीक वगळता इतर कर्मचारी वर्ग आऊटसोर्सने भरला जावा. |
| साईबाबा भक्तनिवास | उप अधिक्षक पद आवश्यकता नाही. पर्यवेक्षक तीनही शिफ्टला असावेत. | अधिक्षक, पर्यवेक्षक आणि एक लिपीक वगळता इतर कर्मचारी वर्ग आऊटसोर्सने भरला जावा. |
| साईप्रसाद निवासस्थान | उप अधिक्षक पद आवश्यकता नाही. पर्यवेक्षक तीनही शिफ्टला असावेत. | अधिक्षक, पर्यवेक्षक आणि एक लिपीक वगळता इतर कर्मचारी वर्ग आऊटसोर्सने भरला जावा. |
| वाहन | उप अधिक्षक पद आवश्यकता नाही. पर्यवेक्षक तीनही शिफ्टला असावेत. वाहन चालक वाहनांच्या संख्येनुसार असावेत. वाहन विभाग प्रमुख तांत्रिकदृष्टया कुशल असावा. | अधिक्षक, सहाय्यक अभियंता, पर्यवेक्षक, काही वाहनचालक आणि एक लिपीक वगळता इतर कर्मचारी वर्ग आऊटसोर्सने भरला जावा. |
| ध्वनीक्षेपन आणि टेलिफोन | मुळ आकृतीबंधातील सीसीटीव्ही कर्मचारी सीसीटीव्ही विभागात वर्ग केले आहेत. | - |
| पाणी पुरवठा | आवश्यकता असलेली पदांची संख्या वाढविण्यात आलेली आहे. | - |
| संरक्षण | अधिक्षक /उप अधिक्षक पदाची आवश्यकता नाही. डयुटीपॉईंटनुसार पदे दर्शविली आहेत. अतिरिक्त मनुष्यबळ स्वतंत्र एजन्सी मार्फत अथवा / आणि स्वयंसेवकांमार्फत पुरविले जावे. | - |
| आरोग्य | पर्यवेक्षक तीनही शिफ्टला पुरवले जावे. | विभाग प्रमुख, पर्यवेक्षक आणि लिपीक वगळता इतर कर्मचारी आऊटसोर्सने पुरवले जावे. |
| मेकॅनिकल | आवश्यक ते मनुष्यबळ पुरविले जावे. | - |
| फायर ॲण्ड सेफ्टी | फायर विषयातील तज्ञ व्यक्ती प्रमुखपदी असावी. शासकीय नियमांनुसार अग्नीशमन केंद्र असावे. | - |
| लेखाशाखा | लेखा विषयातील तज्ञ उमेदवारांची भरती केली जावी. लेखा विभागातील कर्मचा-यांची इतर विभागामध्ये बदली न करता | - |

| | | |
|---|---|---|
| | लेखा विभागातील उप विभागांमध्ये कालबध्द बदली केली जावी. | |
| श्री साई प्रसादालय | अन्न विषयातील तज्ञ व्यक्तीला व्यवस्थापक पदाची जबाबदारी दिली जावी. दोन शिफ्टला प्रत्येकी एक अधिक्षक असावा. पर्यवेक्षक आणि किचन पर्यवेक्षकांची भरती केली जावी. कुशल, निष्णांत आणि अनुभवी आचा-यांची भरती केली जावी. | - |
| श्री साई प्रसादालय प्रयोगशाळा | आवश्यक असलेले मनुष्यबळ पुरविले जावे. | - |
| प्रकाशने | संस्थानाचा स्वतःचा डीटीपी ऑपरेटर, डिझाईनर असावा. | - |
| सामान्य प्रशासन | उदी प्रसाद विभागातील कर्मचारी सामान्य प्रशासन विभागात दर्शविले आहेत. योग्य आणि तज्ञ व्यक्तींची भरती केली जावी. | - |
| विधी | योग्य आणि तज्ञ व्यक्तींची भरती केली जावी. | - |
| सभा कामकाज | योग्य आणि तज्ञ व्यक्तींची भरती केली जावी. | - |
| कामगार | वेलफेअर आणि ट्रेनिंग ऑफीसर्सची भरती केली जावी. मनुष्यबळ विकास विभागाची निर्मिती करुन सामान्य प्रशासन आणि कामगार विभागातील संबंधीत कर्मचारी मनुष्यबळ विकास विभागात वर्ग करावेत. योग्य आणि तज्ञ व्यक्तींची भरती केली जावी. | कर्मचारी मूल्यमापन, भरतीपूर्व परिक्षण, बदलीपूर्व पात्रता चाचणी, कर्मचारी व्यक्तीगत माहिती पूर्तता इत्यादी विभाग कंत्राटदारामार्फत केले जावे. |
| खरेदी | योग्य आणि तज्ञ व्यक्तींची भरती केली जावी. | - |
| भांडार | योग्य आणि तज्ञ व्यक्तींची भरती केली जावी. | - |
| बांधकाम | पुरेसे मनुष्यबळ आहे. | - |
| बगीचा | पुरेसे मनुष्यबळ आहे. | कृषी अधिकारी, लिपीक आणि माळी वगळता इतर सर्व कर्मचारी आऊटसोर्सने पुरवले जावेत. |
| अभिलेख | योग्य आणि तज्ञ व्यक्तींची भरती केली जावी. | - |
| माहीती तंत्रज्ञान | काही पदांचे एकत्रीकरण केले आहे. योग्य आणि तज्ञ व्यक्तींची भरती केली जावी. | - |
| मुंबई कार्यालय | योग्य आणि तज्ञ व्यक्तींची भरती केली जावी. | - |

वर नमूद तक्त्यात मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.), लि.नाशिक यांनी प्ररिक्षण अहवात नमूद केलेला आकृतीबंध बदल शिफारस विश्लेषण ही माहीती कार्यस्थळावर जाऊन पहाणी करुन, पहाणीवेळी निर्दशनास आलेल्या विविध मुद्दयांच्या तपशिलासह, पुराव्यासह व कारणासह विस्तृत स्वरुपात दिलेली नसून, प्रथम दर्शनी तेथील परिस्थीतीचा अंदाज घेऊन ढोबळ मानाने दिलेली दिसून येते. तसेच काही विभागात कार्यालयीन कर्मचारी वगळता, इतर कर्मचारी आऊटसोर्सने भरले जावे. व काही विभागात योग्य आणि तज्ञ व्यक्तींची भरती केली जावी असा अभिप्राय दिलेला आहे. सदर बाबींचा विचार करता, संस्थान प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने अशा प्रकारे आऊटसोर्स पध्दतीने कर्मचारी भरती केल्यास, संबंधित कर्मचा-यावर कोणतीही जबाबदारी टाकता येणार नाही. तसेच कोणतेही काम जबाबदारीने केले जाणार नाही. त्यामुळे संबंधीत विभागातील कामाची प्रतवारी ढासाळली जाईल. कामे वेळेत पूर्ण केली जातील याची शाश्वती देता येणार नाही. तसेच कोणतेही कामे जबाबदारीने केले जाणार नाहीत. त्यामुळे मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांनी सादर केलेला कर्मचारी आकृतीबंध संस्थानकरीता लागू करणे, संस्थानच्या हितावह ठरणार नाही, असे मत आहे.

सबब, मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांनी सादर केलेला परिक्षण अहवालानुसार संस्थान कर्मचारी विषयक धोरणाबाबत बदल करणे संस्थानचे हितावह ठरणार नसून तो स्विकारणेत येवू नये असे मत आहे. तसेच मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांना विषयांकित कामापोटी जी रक्कम रु.७,००,०००/-

(अक्षरी रुपये सात लाख मात्र) अगाऊ आदा करणेत आलेली आहे, ती रक्कम त्यांनी आजपावेतो केलेल्या कामकाजाचा मोबदला म्हणून विषयांकित कामापोटी अंतिम करुन जमा नावे करता येईल, असेही मत आहे.

तरी मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.)लि.नाशिक यांनी संस्थानचे मनुष्यबळ व्यवस्थापनासंबधी केलेल्या कर्मचारी मनुष्यबळ परिक्षण अहवालाबाबत उपरोक्त परिच्छेदामध्ये नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस अथवा इतर अनुषंगिक यथोच्च कार्यवाही करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.६९८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि. नाशिक यांनी परिक्षण अहवालात नमुद केलेली आकृतीबंध बदलाची शिफारस व त्याबाबत दिलेले विश्लेषण हे संबधीत विभागामध्ये जाऊन प्रत्यक्ष पाहणी करुन तेथील प्रथम दर्शनी परिस्थीतीचा अंदाज घेऊन ढोबळ मानाने दिल्याचे दिसून येते. संबधीत संस्थेस निर्देश देवुनही परिक्षण अहवालात नमुद केलेल्या विविध मुद्दयांच्या तपशिलासह, पुराव्यासह व कारणासह विस्तृत स्वरुपात माहिती दिलेली नाही. सबब, मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि. नाशिक यांनी सादर केलेल्या परिक्षण अहवालानुसार संस्थान कर्मचारी विषयक धोरणामध्ये बदल करणे संस्थानचे हितावह ठरणार नसून तो स्विकारणेत येवू नये, असे ठरले.**

**संस्थानमधील मनुष्यबळाचे व्यवस्थापनाबाबत परिक्षण करण्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबवून संस्थेची नेमणूक करण्यात यावी व त्यांचेमार्फत संस्थानमधील मनुष्यबळाचे परिक्षण करण्यात यावे, असे ठरले.**

**तसेच मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.), लि.नाशिक यांना जी रक्कम रु.७,००,०००/- मात्र (अक्षरी रुपये सात लाख) अगाऊ आदा करणेत आलेली आहे, ती रक्कम त्यांनी आजपावेतो केलेल्या कामकाजाचा मोबदला म्हणून सदर कामापोटी अंतिम करुन जमा नावे करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग)**

---

विषय नं.०३ **केंद्र शासनामार्फत चलनातून बाद करणेत आलेल्या परंतू संस्थान व्यवस्थापनाकडे जमा होत असलेल्या रुपये १०००/- व रु. ५००/- च्या जुन्या चलनी नोटांबाबत.**

प्रस्ताव- विषयाची पूर्वपीठीका -

(अ) श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंचे समाधी दर्शनाकरीता दररोज हजारो साईभक्त येत असतात. हे साईभक्त श्री साईंवरील श्रध्देपोटी देणगी रुपाने विविध स्वरुपात रोख रक्कम, मौल्यवान अलंकार आदि श्री साईंना अर्पण करीत असतात. यापैकी बहुतांशी भक्त रोख स्वरुपात गुप्तदान करीत असतात, अशा गुप्तदानासाठी समाधी मंदिरासह मंदिर परिसरात व संस्थानचे परिसरात विविध ठिकाणी सिलबंद देणगी पेटया बसविणेत आलेल्या आहेत. या देणगी पेटयांमधील रक्कमेची मोजणी शक्यतो दर मंगळवार व दर शुक्रवार या दोन दिवशी करणेत येत असते. सदरहू देणगी पेटीतील रक्कम मोजणीकामी संस्थान अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचेसह मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांचे व बॅंकेचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत सर्वसामान्य भक्तांचे सहकार्याने करणेत येत आहे. या देणगी पेटयांमधून रोख रक्कमेच्या स्वरुपात विविध किंमतीच्या भारतीय चलनासह विदेशी चलनातील नोटा प्राप्त होत असतात. या गुप्तदानाने प्राप्त होणारे भारतीय अथवा विदेशी चलनातील नोटांच्या मुल्यांवर कुठल्याही प्रकारचे नियंत्रण ठेवणे शक्य नाही.

(ब) वित्त विभाग, भारत सरकार यांनी दिनांक ०८ नोव्हेंबर,२०१६ रोजीचे शासन निर्णयानुसार, रुपये १०००/- मात्र व रुपये ५००/- मात्र या मुल्यांच्या जुन्या चलनी नोटा व्यवहारातून बाद (बंद) केलेल्या आहेत. सदरहू केंद्र शासनाचे निर्णयानुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत मा. शासनाचे वेळोवेळीचे निर्देशानुसार कार्यवाही करणेत आलेली आहे. यामध्ये दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१६ ते दिनांक ३० डिसेंबर, २०१६ या कालावधीत संस्थान व्यवस्थापनास दानाव्दारे / देणगी पेटी व्दारे तसेच रुग्णालय विभागांस रुग्णांव्दारे प्राप्त झालेल्या एकूण रक्कम रुपये ६,४६,२०,५००/- मात्रच्या जुन्या बाद (बंद) नोटांचा भरणा संबंधित बॅंकांकडे करणेत आलेला असून, हिशोब पूर्ण करणेत आलेला आहे.

त्यानंतर, म्हणजेच दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ (म्हणजेच दिनांक ०१ जानेवारी, २०१७) ते दिनांक ३० सप्टेंबर २०१८ अखेर निश्चलनीकरण करण्यात आलेल्या रुपये १०००/- व रुपये ५००/- च्या परंतु दानपेटीतून जमा झालेल्या एकत्रित रक्कम रुपये २,३०,९९,५००/- च्या नोटा तारीखवार स्वतंत्ररित्या कापडी पिशवीत सिलबंद करुन, लेखाशाखेच्या सुरक्षागृहात (स्ट्रॅांग रुम) ठेवणेत आलेल्या आहेत. सदर रक्कमेचा कुठल्याही आर्थीक लेख्यांमध्ये समावेश करणेत आलेला नाही अथवा सदर रक्कम आर्थिक व्यवहारात गृहीत धरणेत आलेली नाही.

(क) उपरोक्त दानपेटीतून जमा झालेल्या रक्कमेबाबत संस्थान प्रशासनाचे स्तरावरुन मा. महाव्यवस्थापक, चलन व्यवस्थापन विभाग, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांना दिनांक ११ जानेवारी, २०१७ व दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७ रोजी मार्गदर्शन-वजा-निर्देश मिळणेसाठी पत्र देणेत आलेले आहे, परंतु त्याबाबत रिझर्व्ह बँकेकडून कुठल्या प्रकारचा प्रतिसाद मिळालेला नाही. सदर पत्रांची प्रत मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनाही माहितीस्तव अग्रेषित करणेत आलेली आहे.

तसेच, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना दिनांक २९ मार्च, २०१७ व १० एप्रिल, २०१७ रोजी स्वतंत्ररित्या पत्र देणेत आलेले होते. यास अनुसरुन, कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजीचे पत्राने असे कळविले आहे की,“ निश्चलनीकरणाच्या धोरणाच्या अनुषंगाने अधिक मार्गदर्शनाची आवश्यकता असल्यास आपण भारतीय रिझर्व्ह बँकेकडे परस्पर संपर्क करावा. ”

(ड) दरम्यानचे कालावधीत, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे प्रतिनिधी श्री. पी. विजयकुमार यांचेशी दूरध्वनीवरुन केलेल्या चर्चेतील संदर्भानुसार, श्री. सौरभ गर्ग, (भाप्रसे), सचिव, वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना दिनांक १६ मार्च,२०१७ रोजी विषयांकित बाबत अर्धशासकीय पत्र देणेत आलेले होते.

श्री. सौरभ गर्ग, (भाप्रसे), सचिव, वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी विषयांकित बाबीबाबत दिनांक ०२ मे, २०१७ रोजी अर्धशासकीय पत्राव्दारे खालीलप्रमाणे कळविले आहे –

“.. .. In this connection, I would like to take this opportunity to inform you that on 30.12.2016, i.e., at the end of the stipulated period to deposit the above mentioned banknotes in the respective bank accounts, an Ordinance was promulgate, which has since been replaced by an Act, passed by the Parliament whereby only Indian Nationals (residents or non-residents), who were abroad during 08.11.2016 to 30.12.2016, are allowed to deposit such notes No such grace period has been allowed to any other Indian entity, to deposit such bank notes.”

थोडक्यात, केंद्र शासनाने दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१६ रोजीचे अधिसूचनेचे कायद्यात रुपांतर झालेले असून, या कायद्यातील तरतुदीनुसार कोणत्याही भारतीयांस चलनातून बाद (बंद) केलेल्या नोटा जमा करता येणार नाहीत.

तद्-नंतर, पुनःश्च मा. संयुक्त सचिव, वित्त मंत्रालय, आर्थिक कार्य विभाग, भारत सरकार यांना दिनांक ३१ मे, २०१७ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे स्वाक्षरीने अर्धशासकीय पत्र देणेत आलेले आहे. तथापि त्यास प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक २८५ अन्वये, विषयांकित बाद (बंद) चलनी नोटांबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे पाठपुरावा करणेत यावा, तसेच विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचेही मार्गदर्शन घेण्यात यावे,असे ठरले.

त्यास अनुसरुन, दि.१३/१०/२०१७ व दि.१३/०१/२०१८ रोजी मा.मुख्य व्यवस्थापक,रिझर्व बँक ऑफ इंडिया,मुंबई यांना पुन:श्च पत्र देण्यात आले होते. दि.१३/०१/२०१८ चे पत्रास अनसरुन रिझर्व बँक ऑफ इंडिया,मुंबई यांचेकडील दि.०२/०४/२०१८ रोजीचे पत्र दि.१८/४/२०१८ रोजी प्राप्त झाले असून त्यामध्ये खालीलप्रमाणे उल्लेख आहे.

Please refer to your letter dated January 13,2018 on the captioned subject.We are not in a position to accede to your request as no relaxation is possible in the extant guidelines.

सदयःस्थिती -

(इ) वित्त विभाग, भारत सरकार राजपत्र क्र.२६५२ / ३४०७ (अ), दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१६. अन्वये रुपये १०००/- व रुपये ५००/- मात्र दर्शनी मुल्यांच्या नोटा चलनातून निश्चलनीकरण (बंद) केलेल्या आहेत. त्या आज रोजी सुध्दा दान पेटीतून प्राप्त होत आहेत.

आज म्हणजेच, दिनांक ०१ जानेवारी २०१७ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ अखेर दानपेटी व्दारे प्राप्त झालेल्या जुन्या बंद नोटांचा तपशील पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशील | रुपये १०००/- | | रुपये ५००/- | |
|---|---|---|---|---|---|
| | | नोट संख्या | रक्कम | नोट संख्या | रक्कम |
| ०१ | दिनांक ०१ जानेवारी, २०१७ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ अखेर | ८,३३८ | ८३,३८,०००/- | २९,५२३ | १,४७,६१,५००/- |
| दिनांक **३० सप्टेंबर** २०१८ अखेर जमा एकत्रित एकूण रक्कम रुपये २,३०,९९,५००/- मात्र. | | | | | |

उपरोक्त रुपये १०००/- व रुपये ५००/- मात्र दर्शनी मुल्यांच्या चलनातून निश्चलनीकरण (बंद) केलेल्या परंतु दानपेटी मधून प्राप्त होत असलेल्या नोटांबाबत शासन स्तरावरुन मा.वित्त विभाग,केंद्र सरकार यांचेकडून निर्देश प्राप्त करुन घेणेकामी दि.१३/१०/२०१८ रोजी मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांना विनंती पत्र देण्यात आलेले आहे.

दि.२८ फेब्रुवारी, २०१७ रोजी प्रकाशित झालेल्या भारताचे राजपत्रात खालीलप्रमाणे उल्लेख आहे.

THE SPECIFIED BANK NOTES (CESSATION OF LIABILITIES ) ACT.2017

THE GAZETTE OF INDIA EXTRAORDINARY

Prohibition on holding transferring or receving specified bank notes.

5. On and from the appointed day, no person shall, knowingly or voluntarily, hold, transfer or receive any specified bank notes.

Provided that nothing contained in this section shall prohibit the holding of specified bank notes— (a) by any person—

(i) up to the expiry of the grace period; or

(ii) after the expiry of the gace period—

(A) not more than ten notes in total,irrespective of the denomination,

**Penalty for contravention of section 5.**

7. Whoever contravenes the provisions of section 5 shall be punishable with fine which may extend to ten thousand ruppes or five times the amount of the face value of the specified bank notes involved in the contravention,which ever is higher.

दि.२८ फेब्रुवारी, २०१७ रोजी प्रकाशित झालेल्या भारताचे राजपत्रात उपरोक्तप्रमाणे उल्लेख आहे. तथापि, चलनातून निश्चलिकरण (बंद ) करण्यात आलेल्या रु.५००/- रु.१०००/- मुल्याच्या नोटा अद्यापही दान पेटीतून प्राप्त होत आहेत.

प्रस्ताव– उपरोक्त प्रमाणे रुपये १०००/- व रुपये ५००/- मात्र दर्शनी मुल्यांच्या चलनातून निश्चलनीकरण (बंद) केलेल्या नोटा दि.०१ जानेवारी २०१७ ते दि.३० सप्टेंबर २०१८ अखेर एकूण रक्कम रु.२,३०,९९,५००/- (अक्षरी रु. दोन कोटी तीस लाख नव्व्यान्नव हजार पाचशे मात्र.) दान पेटीतून प्राप्त झालेल्या असून सदर नोटा स्वतंत्ररित्या कापडी पिशवीत सिलबंद करुन लेखाशाखेकडील सुरक्षा गृहात (स्ट्रॉंग रुम) ठेवणेत आलेल्या आहेत. सदर रक्कमेचा समावेश कुठल्याही आर्थिक लेख्यांमध्ये करणेत आलेला नाही अथवा सदर रक्कम कुठल्याही आर्थिक हिशोबात गृहीत धरणेत आलेली नाही.

तरी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर अवलोकनार्थ पुढील निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, केंद्र शासनामार्फत चलनातून बाद करण्यात आलेल्या रु. १०००/- व रु. ५००/- च्या जुन्या नोटा स्विकारणेबाबत रिझर्व्हे बँकेला निर्देश देण्यासाठी मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करुन मा.न्यायालयाचे निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले. तसेच याप्रकरणी समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली याचिका दाखल करणेस व त्यासाठी येणाऱ्या अनुशंगिक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी,लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.०४** **देणगी काऊंटरकडील स्वाईप मशिनमार्फत American Express Card व्दारे प्राप्त झालेल्या देणगीच्या अहवालाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.पंतप्रधान, भारत सरकार यांनी दि.८ नोव्हेंबर,२०१६ पासून रु.१००० व रु.५०० नोटा चलनातून बंद केलेल्या आहेत. याचा परिणाम आर्थिक व्यवहारावर होऊ नये म्हणून, कॅशलेस व्यवहार या संकल्पनेकडे

शासनाचा कल असून, जास्तीत जास्त व्यवहार कॅशलेस करावेत म्हणून शासनाने नागरीकांना आवाहन केले आहे.

त्याअनुषंगाने, श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या श्री साईभक्तांना चलनासंबंधी कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये आणि भक्तांना कॅशलेसची सुविधा उपलब्ध व्हावी मूहणून, संस्थानमध्ये देणगी काऊंटरसह इतर आवश्यक त्या ठिकाणी स्वाईप मशीन बसविण्यात आले आहेत. परंतु, सदर स्वाईप मशिनवर फक्त भारतीय चलनातील देणगी स्विकारली जाते.

तथापि, श्री साईंच्या दर्शनासाठी देश-परदेशातून भक्तगण येत असतात. परदेशातील भक्तांना जर स्वाईप मशिनव्दारे संस्थानला परकीय चलनामध्ये देणगी द्यावयाची असल्यास, ती सहज देता यावी म्हणून, दि.०७.०३.२०१८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.१६९ अन्वये, संस्थानच्या देणगी कांऊंटरवरील स्वाईप मशिनपैकी दोन स्वाईप मशिनला अमेरिकन एक्सप्रेस कार्ड व डिस्कव्हर कार्डची सुविधा देण्यात आलेली आहे.

सदर सुविधा सुरु केल्यापासून दि.१५ सप्टेंबर २०१८ अखेर एकूण ०४ श्री साईभक्तांनी लाभ घेतला असून, त्याव्दारे एकूण रककम रु.२२,०००/- मात्र (अक्षरी रक्कम रुपये बावीस हजार मात्र) जमा झालेली आहे. आणि त्यासाठी बॅंकेस कमिशन २.५०% व त्यावरील १८% जीएसटी (कमीशन २.५०% प्रमाणे ५५०/- व जीएसटी १८% प्रमाणे ९९/-) असे एकूण रक्कम रुपये ६४९/- मात्र कमिशन द्यावे लागणार आहे. म्हणजेच देणगी काऊंटरकडील स्वाईप मशिनमार्फत अमेरिकन एक्सप्रेस कार्डव्दारे दि.१५ सप्टेंबर, २०१८ अखेर निव्वळ रक्कम रु.२१,३५१/- मात्र देणगी प्राप्त झालेली आहे.

सदर अहवालाची नोंद घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.७००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, देणगी काऊंटरकडील स्वाईप मशिनमार्फत अमेरिकन एक्सप्रेस कार्डव्दारे प्राप्त झालेल्या देणगीची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी,लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.०५** **श्री साई प्रसादालय विभागामध्ये साईभक्तांना प्रसाद-भोजन देणेकामी लागणारी पानांची पत्रावळ खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद:- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमंक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालवणे.

प्रस्ताविक:- श्री साई प्रसादालयात दररोज सरासरी ४० ते ४५ हजार साईभक्त प्रसाद- भोजनाचा लाभ घेतात. श्री साईबाबांचे उत्सव तसेच गर्दीचे कालावधीमध्ये प्रसाद- भोजन घेणा-या साईभक्तांची संख्या ७० ते ८५ हजारापर्यंत जाते. प्रसाद भोजन घेणा-या साईभक्तांना प्रसाद- भोजन देण्यासाठी स्टील ताटांचा वापर करण्यात येतो. तथापि, उत्सव कालावधीमध्ये व गर्दीचे कालावधीमध्ये साईभक्तांची होणारी गर्दी लक्षात घेता साईभक्तांना लवकरात लवकर प्रसाद- भोजन मिळावे यासाठी सदर कालावधीमध्ये स्टील ताटांऐवजी पत्रावळीचा (चार कप्पे असलेली) वापर केला जातो. तसेच स्टील ताटे धुणेसाठी वापरात असलेले डिश वॉशर भांडी मशीनमध्ये बिघाड झाल्यास स्टील ताटांऐवजी पत्रावळीचाच वापर केला जातो. तसेच कामगार कमी असतांना सुद्धा ताटांऐवजी पत्रावळीचा वापर करणेत येतो.

उपरोक्त संदर्भिय क्र.०१ अन्वये सन २०१८-१९ करीता वार्षिक किराणा माल मागणीपत्रकाव्दारे एकुण १० लाख नग सिल्व्हर कोटेड पत्रावळीची मुख्य भांडार विभागाकडे मागणी करणेत आलेली होती. सन २०१८-१९ करीता सदर पत्रावळीचा मान्य दर रु.१.२५ पैसे इतका असून त्यास एकुण रु.१२,५०,०००/- इतका खर्च अपेक्षीत होता. आज अखेर खरेदी करणेत आलेल्या ८.१० लाख नग पत्रावळीस रुपये १०,१२,५००/- इतका खर्च आलेला आहे. तसेच एकुण मागणी करणेत आलेल्या १० लाख नग पत्रावळीपैकी ८.१० लाख नग पत्रावळी प्राप्त झालेली असून ५.२३ लाख नग पत्रावळी वापरणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे २.८७ लाख नग पत्रावळी शिल्लक असून १.९० लाख नग पत्रावळ व्यापा-याकडून येणे बाकी आहे.

महाराष्ट्र शासन अधिसुचना दि.२३.०३.२०१८ क्र.प्लास्टिक-२०१८/प्र.क्र.२४/ता.क.-४ मधील परिच्छेद क्र.३,महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा,२००६ च्या कलम २ (एच) व कलम ४ चे उपकलम १ व २ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांतर्गत संपूर्ण राज्यात प्लॅस्टिक बंदी करणेत आलेली आहे.

खरेदी विभागाने दि.१९/०७/२०१८ रोजीचे पत्रान्वये मा.उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर यांचेकडे संस्थानचे प्रसादालयात पत्रावळ व द्रोण वापरण्याची परवानगी मागितली असता त्यांनी सदर पत्रावळी वापरणेबाबद स्पष्ट सुचना दिलेली नाही अथवा अद्यापपावेतो कुठलाही पत्रव्यवहार केलेला नाही. सदरील कार्यवाही खरेदी विभागामार्फत केली जात आहे. तथापि, पुरवठाधारकाला शासनाचे सक्षम विभागाकडून सदर पत्रावळ अधीसूचनेनुसार वापरासाठी योग्य असल्याचे प्रमाणपत्र मागवून घ्यावे किंवा पर्यावरण विभागाची याबाबत तज्ञ कमिटी असल्यास त्यांचेकडे नमुना पाठवून पत्रावळी वापराबाबत खात्री करुन घ्यावी. त्यानंतरच पुरवठा आदेशाबाबत निर्णय घ्यावा असे वाटते अशाप्रकारे सुचना मा. उपकार्यकारी अधिकारी श्री बाबासाहेब घोरपडे यांनी खरेदी विभागाकडील दि.०२.०८.२०१८ चे टिप्पणीवर केलेली आहे. तसेच उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर यांचे देखील मार्गदर्शन घेण्यात यावे असे सुचीत केलेले आहे.

त्याकरीता साईभक्तांना प्रसाद-भोजन देणेस अडचण होऊ नये यासाठी विघटनशील व विल्हेवाटीस सोपी अशी झाडांच्या पानांपासून बनविलेली व चार कप्पे असलेली पत्रावळ वापरणेस हरकत नाही असे इकडील विभागाचे मत आहे. त्यानुसार झाडांच्या पानांपासुन बनविलेली व चार कप्पे असलेली चांगल्या प्रतीची १० लाख नग पत्रावळ खरेदी विभागामार्फत खरेदी करणे आवश्यक वाटते. याबाबत ओम साई एन्टरप्रायझेस, दौंड यांचेकडे सदर पत्रावळीबाबत दुरध्वनीव्दारे चौकशी केली असता त्यांनी संदर्भिय क्र.०२ अन्वये ०१ नग पत्रावळीकरीता रु.१.९० पैसे (GST सह) इतका दर कळविलेला आहे. त्यानुसार सन २०१८-१९ करीता १० लाख नग पत्रावळी खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु.१९,००,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

मागणी:- साईभक्तांना प्रसाद- भोजन सुविधा देतांना अडचण निर्माण होऊ नये याकरीता श्री साई प्रसादालयास झाडांच्या पानांपासून बनविलेली १० लाख नग पत्रावळ (चांगल्या प्रतीची,चार कप्पे असलेली) खरेदी करणे आवश्यक वाटते.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:- आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साई प्रसादालयामध्ये साईभक्तांना प्रसाद- भोजन सुविधा देणेकामी मा.उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर यांची प्रचलित पत्रावळी वापरण्यास परवानगी न मिळाल्यास त्यांच्या नियमात बसणारी झाडांच्या पानांपासून बनविलेली साधारणत: १० लाख नग पत्रावळ (चांगल्या प्रतीची, चार कप्पे असलेली) खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रुपये १९,००,०००/- (अक्षरी रुपये एकोणावीस लाख मात्र) चे अपेक्षीत खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामध्ये साईभक्तांना प्रसाद-भोजन सुविधा देणेकामी झाडांच्या पानांपासून बनविलेली १० लाख नग पत्रावळ (चांगल्या प्रतीची, चार कप्पे असलेली) विहीत पध्दतीने निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.१९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.०६** **वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र यांचे प्रतिनिधींचे निवासी शिबीरकामी अल्पोपहार व भोजन व्यवस्थेकामी आलेल्या खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव दि.०१ ऑक्टोबर,२०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत आयोजीत करण्यात येत आहे. या कालावधीत विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाचा समावेश आहे. याचाच एक भाग म्हणून, संपुर्ण भारत वर्षातील आदिवासी, जनजाती व दुर्गम लोकवस्तीमध्ये त्यांचे अस्मिता व अस्तित्वासाठी काम करणा-या कार्यकर्त्यांचे व जनजाती प्रतिधींचे संमेलन दि.२६/०९/२०१८ ते ०५/१०/२०१८ या कालावधीत साईआश्रम धर्मशाळा येथे आयोजीत करणेस मा.व्यवस्थापन समिती दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४१५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५०२ नूसार , वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र यांचे दि.३०/०९/२०१८ ते ०२/१०/२०१८ असे ०३ दिवस कालावधीसाठी निवासी संमेलन आयोजीत करणेत मान्यता देण्यात आलेली आहे. परंतू सदर संमेलनासाठी येणारे कार्यकर्ते व जनजाती प्रतिनिधी हे कार्यक्रमाचे अगोदर १ ते २ दिवस अगोदर येणार असल्याने त्यांना दि.२६/०९/२०१८ ते ०५/१०/२०१८ या कलावधीकरीता भोजनव्यवस्था उपलब्ध करुन देण्यात यावी असे ठरलेले आहे.

जा.नं.एसएसएसटी/शताब्दी/२८६/२०१८ दि.०३/०८/२०१८ रोजीचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशान्वये, उपरोक्त वनवासी कल्याण आश्रमातील प्रतिनिधींची दि.२६/०९/२०१८ ते ०५/१०/२०१८ या कालावधीत साई आश्रम धर्मशाळा येथे खालीलप्रमाणे अल्पोपहार व प्रसादभोजनाची व्यवस्था मोफत करणेबाबत कळविलेले आहे.

| दिनांक | सकाळ अल्पोपहार (संख्या) | दुपार भोजन (संख्या) | दुपारचा अल्पोपहार (संख्या) | रात्री भोजन (संख्या) |
|---|---|---|---|---|
| २६/०९/२०१८ | -- | -- | -- | ७५ |
| २७/०९/२०१८ | ७५ | ७५ | १२५ | १२५ |
| २८/०९/२०१८ | १२५ | १२५ | १२०० | १२०० |
| २९/०९/२०१८ | ७०० | १००० | २५०० | २५०० |
| ३०/०९/२०१८ | ३२५० | ३२५० | ३२५० | ३२५० |
| ०१/१०/२०१८ | ३२५० | ३२५० | ३२५० | ३२५० |
| ०२/१०/२०१८ | ३२५० | ३२५० | ३२५० | ३२५० |
| ०३/१०/२०१८ | १५०० | १००० | ७०० | ७०० |
| ०४/१०/२०१८ | ५०० | ५०० | ३०० | ३०० |
| ०५/१०/२०१८ | २०० | १२५ | १२५ | १२५ |
| **एकूण संख्या** | **१२८५०** | **१२५७५** | **१४७००** | **१४७७५** |

उपरोक्तप्रमाणे मा.व्यवस्थापन समिती निर्णयानूसार, वनवासी कल्याण आश्रमातील प्रतिनिधींची दोन वेळ अल्पोपहार व्यवस्था श्री साई प्रसादालयामार्फत करण्यात आलेली आहे. तसेच दोन वेळ जेवणाची व्यवस्थाही श्री साई प्रसादालयामार्फत मोफत करण्यात आलेली आहे. दि.२६/०९/२०१८ ते ०५/१०/२०१८ अखेर सदर कार्यक्रमाचे ठिकाणी एकूण १२५७५+१४७७५ = २७३५० व्यक्तींना मोफत प्रसादभोजन पुरविणेत आलेले आहे. श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजन तयार करणेकामी सन २०१७-२०१८ चे प्रती ताटास अंदाजे रु. २२.४६ इतका उत्पादन खर्च येत असून २७,३५० व्यक्तीस अंदाजे एकूण रक्कम रु.६,१४,२८१/- इतका खर्च झालेला आहे. मा.व्यवस्थापन समिती निर्णयानूसार ०१ जानेवारी,२०१७ पासून श्री साई प्रसादालयात भक्तांना मोफत भोजन देण्यात येत असल्याने सदरचे जेवणाचा खर्च सोबतचे परिशिष्ट अ) मध्ये दर्शविणेत आलेला नाही.

सोबतचे परिशिष्ट अ) प्रमाणे अल्पोपहारकामी लागणा-या किराणा मालाचे साहीत्यास प्रत्यक्ष खर्चाची रक्कम रु.२,८०,३०८/- (अक्षरी रक्कम रु.दोन लाख ऎंशी हजार तीनशे आठ मात्र) इतका खर्च आलेला आहे. तरी सदरचा खर्च मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.७०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र यांचे प्रतिनिधींचे निवासी शिबीरासाठी अल्पोपहार व भोजन व्यवस्था करणेकामी आलेल्या रक्कम रु.२,८०,३०८/-मात्र खर्चाचे अवलोकन करुन सदर झालेल्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.०७** **संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये, श्री साईप्रसादालय येथील लिफ्टचे CAMC करीता ई – निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतूद : (१) कलम १४(२)(घ) – भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे. (२) कलम १७(२)(झ) - सर्व साधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा गोष्टी करील.

प्रस्तावना:- साईभक्तांना अधिकाधिक सेवा-सुविधा उपलब्ध करुन देणेकरीता साईआश्रमभक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास, व्दारावती निवासस्थान, श्री साई प्रसादालय तसेच रुग्णांकरीता श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटल येथे विविध क्षमतेच्या एकूण ३५ लिफ्ट बसविण्यात आलेल्या आहेत. सदरचे ठिकाणी बसविणेत आलेल्या लिफ्टचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| अ.नं. | ठिकाण | लिफ्टचा तपशील | कंपनी | नग | खरेदी दिनांक रुपये | खरेदी किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | साई आश्रम भक्तनिवासस्थान | ॲटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १३. G+3 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | १२ | २०/७/२०१२ | १,६९,००,०००/- |
| | | मालवाहतुक, कोलॅप्सीबल गेट, क्षमता – १ टन, G+3 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | १ | | |
| २. | साई धर्मशाळा | ॲटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १३, G+3 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | ६ | २८/०७/२०१२ | ९१,००,०००/- |
| | | मालवाहतुक, कोलॅप्सीबल गेट, क्षमता – १ टन, G+3 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | १ | | |
| ३. | नविन भक्तनिवासस्थान | ॲटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १०, G+3 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | ४ | ३०/०६/२०१४ | ६९,५२,१५२/- |
| ४. | व्दारावती | ॲटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १०, G+4 | कोने इलेव्हेटर प्रा. लि. | ४ | १५/८/२००९ | ६४,००,०००/- |
| ५. | श्री साई प्रसादालय | एस.एस. ॲटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १०, G+1 | ओटीस इलेव्हेटर कंपनी लि. | १ | ०१/१०/२००८ | ३०,४१,१००/- |
| | | मालवाहतुक, कोलॅप्सीबल गेट, क्षमता – २.५ टन, G+1 | ओटीस इलेव्हेटर कंपनी लि. | १ | | |
| ६. | साईनाथ रुग्णालय | ॲटोमॅटीक डोअर, हायड्रोलीक, प्रवासी क्षमता – २०, G+2 | पावरलिंक इंजिनिअर्स | २ | ११/०८/२००७ | २०,२८,७७९/- |
| ७. | साईबाबा हॉस्पीटल | एस.एस. ॲटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १५, G+2 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | ३ | ३०/०६/२०१४ | २१,५७,९६०/- |
| | | | **एकूण लिफ्ट :** | **३५** | | |

उपरोक्त ३५ लिफ्ट पैकी अ.नं. २ चे लिफ्ट बसविणेत आलेली इमारत बांधकाम परवाना घेणेकामी कार्यवारी चालू असलेने सदरचे लिफ्ट वापराकरीता लायसन्स मिळालेले नसलेने, त्यांचा वापर करण्यात येत नाही. सदरचे लिफ्ट वगळून उर्वरित २८ लिफ्टकरीता मे. व्हिक्टोरा लिफ्ट प्रा. लि. मुंबई यांना दिनांक १.३.२०१८ ते दिनांक २८.०२.२०१९ याकालावधी करीता रु.११,४०,०००/- मात्र रक्कमेस CAMCकार्यादेश देणेत आलेला आहे.

मागणी:- सदर CAMC कालावधी दिनांक २८.२.२०१८ रोजी संपणार असलेने त्यापुढिल एक वर्ष कालावधी करीता सर्व लिफ्ट CAMCकरावी लागणार आहे. याकामी येणा-या अपेक्षित खर्चा करीता तत्सम प्रकारचे कामे करणारे कंपनी / फर्म यांचेकडून दरपत्रके घेतली होती. सदरचे दरपत्रके व मागील वर्षाचे प्राप्त दर यानुसार पुढिल वर्ष CAMCकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | ठिकाण | उत्पादक कंपनी | लिफ्ट संख्या | सन २०१९- २० वर्षाकरीता CAMC देणेकामी अपेक्षीत खर्च रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | साईआश्रम भक्तनिवास | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | १३ | ११,९७,०००/- |
| २ | साईबाबा भक्तनिवास | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | ०४ | |
| ३ | साईबाबा हॉस्पीटल | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | ०३ | |
| ४ | व्दारावती भक्तनिवास | कोने इलेव्हेटर प्रा. लि. | ०४ | |
| ५ | साईनाथ हॉस्पीटल | पावरलिंक इंजिनिअर्स | ०२ | |
| ६ | साईप्रसादालय | ओटीस इलेव्हेटर कं. लि. | ०२ | |
| | | **एकुण रक्कम** | **२८** | ११,९७,०००/- |

उपरोक्त प्रमाणे २८ लिफ्टचे दिनांक २८.२.२०१८ रोजी कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टसंपत असल्याने पुढिल एक वर्ष कालावधी करीता एकत्रितकॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टदेणेकामी अंदाजे रक्कम रु. ११,९७,०००/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्राय:- सर्व लिफ्ट सुरळीत कार्यरत राहणेकामी त्यांची CAMCदेणे आवश्यक आहे. याकरीता सर्व लिफ्टचे एकत्रित CAMC चे कॉन्ट्रॅक्ट देणे करीता महाराष्ट्र शासनाच्या www\mahatenders.gov.in या वेबसाईटवर तसेच संस्थानचे संस्थान वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस तसेच CAMC करीता येणा-या अंदाजे रक्कम रु. ११,९७,०००/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समिती सभेत मान्यता घेणे आवश्यक आहे.

प्रस्ताव:- तरी श्री साईभक्तांचे तसेच रुग्णालयातील रुग्णाचे सोई सुविधेकरीता भक्तनिवास, रुग्णालये व साईप्रसादालय येथील लिफ्ट सुरुळीत कार्यान्वित राहणे आवश्यक आहे. त्यामुळे संस्थानमधील सध्या कार्यरत असलेल्या २८ नग लिफ्टचे एकत्रित कॉम्प्रेसिव्हवार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या रुपये ११,९७,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७०३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईभक्तांचे तसेच रुग्णालयातील रुग्णांचे सोई सुविधेकरीता भक्तनिवास, रुग्णालये व साईप्रसादालय येथील लिफ्ट सुरळीतपणे कार्यान्वित राहणेसाठी तेथे सध्या कार्यरत असलेल्या २८ नग लिफ्टचे एकत्रित कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या रक्कम रु.११,९७,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)**

---

विषय नं.०८ **साई आश्रम १ व २, साई उद्यान व साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ हॉस्पीटल इमारत येथील सौर उर्जा सयंत्रणेचे सन २०१९-२० या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :कलम २१(१)(क) – मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

प्रस्तावना:- श्री साईबाबा संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान, साईधर्मशाळा, साईउद्यान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान येथे साईभक्तांना स्नानाकरीता गरम पाण्याची सोय व्हावी तसेच साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ हॉस्पीटल मध्ये रुग्णांना स्नानासाठी गरम पाण्याची सोय होणेसाठी खालील तपशीलाप्रमाणे सोलर वॉटर हिटींग सिस्टीम्स बसविण्यात आलेल्या आहेत.

| अ.नं. | तपशील | खरेदी वर्ष | प्रति सिस्टीम क्षमता लिटरमध्ये | कलेक्टर संख्या | सिस्टीम संख्या | एकुण क्षमता (लिटरमध्ये) | सिस्टीमची किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | साईआश्रम भक्तनिवासस्थान | २०१२ | १२५० | १९३० | १९३ | २४१२५० | २,९१,१९,०३६/- |
| २. | साईधर्मशाळा | २०१२ | १२५० | ९७० | ९७ | १०१२५० | १,४७,८०,०२१/- |
| ३. | साईउदयान | २०१२ | १२५० | १३० | १३ | १६२५० | २२,६७,९३३/- |
| ४. | शांतिनिकेतन इमारत | २०१३ | १२५० | २० | २ | २५०० | ७,१५,७७१/- |
| ५. | साईबाबा भक्तनिवासस्थान | २०१२<br>२०१२ | १२५०<br>२२५० | ३३०<br>१०८ | ३३<br>०६ | ५४७५० | ३८,९९,५०२/-<br>११,४५,५४४/- |
| ६. | द्वारावती भक्तनिवासस्थान | | १००० | २५६ | ३२ | ३२००० | |
| ७. | साईप्रसाद गेस्ट हाऊस | २००२ | १५००<br>१००० | २४<br>१६ | २<br>२ | ५००० | २,३४,८४०/- |
| ८. | साईबाबा हॉस्पीटल | २००६ | २५००<br>२०००<br>१००० | ४०<br>९६<br>८ | २<br>६<br>१ | १८००० | १४,८८,६२०/- |
| ९. | साईनाथ हॉस्पीटल | २००८ | १५००<br>१००० | १४४<br>१६ | १२<br>२ | २०००० | ३०,४७,२६०/- |
| | एकुण | | | ४०८८ | ४०३ | **५,११,०००** | **५,६६,९८,५२७/-** |

वरीलप्रमाणे प्रति दिन ५,११,००० लिटर वॉटरची सोलर वॉटर हिटींग सिस्टीम बसविण्यात आलेल्या आहेत. या यंत्रणेमध्ये काचेचे सोलर रिफ्लेक्टर, पाण्याच्या स्टोअरेज टॅंक व जी.आय. पाईप यांचा समावेश असतो. या यंत्रणेमध्ये काही बिघाड झाल्यास तो त्वरीत दुरुस्त करुन घ्यावा लागतो. सोलर वॉटर हिटर सिस्टीम

यंत्रणा सतत कार्यान्वित राहण्यासाठी साईबाबा संस्थानच्या सर्व ठिकाणच्या सोलर वॉटर हिटींग सिस्टीमचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे गरजेचे असते. या सर्व्हीस कालावधीत कलेक्टरची काच फुटली तर ती बदलण्यात येते. तसेच इतर लिकेज काढणे, व्हॉल्व मेन्टेनंन्स करणे, दैनंदिन सोलर रिफ्लेक्टर क्लिनींग करणे इत्यादी कामे करण्यात येतात. ही सर्व कामे करणेकरीता मेकॅनिकल विभागाकडे पुरेशे मनुष्यबळ नसल्याने वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेत येत आहे. यासाठी दिनाक १.३.२०१८ ते दिनांक २८.२.२०१९ या कालावधी करीता मे. साई एजन्सी शिर्डी यांनारक्कम रु. ९,२५,६००/- मात्र रक्कमेस कार्यादेश देणेत आलेला आहे.

मागणी:- सदर AMC ची कालावधी दिनांक २८.२.२०१९ रोजी संपणार असलेने त्यापुढील एक वर्ष कालावधी करीता सर्व सोलर हॉट वॉटर सिस्टीमचे AMC करावी लागणार आहे. याकामी येणा-या अपेक्षित खर्चा करीता तत्सम प्रकारचे कामे करणारे कंपनी/ फर्म यांचेकडून दरपत्रके घेतली होती. सदरचे दरपत्रके व मागील वर्षाचे प्राप्त दर यानुसार पुढिल वर्ष AMCकरीता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | सोलर हॉट वॉटर क्षमता | सन २०१९-२० वर्षा करीता AMC देणेकामी अपेक्षीत खर्च रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | साई आश्रम १ व २, साईउदयान व साईबाबा भक्तनिवासस्थान,द्वारावती भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ हॉस्पीटल | ५,११,००० | ९,७१,८८०.०० |

उपरोक्त प्रमाणे एकुण ५,११,००० लिटर क्षमतेच्या सोलर हॉट वॉटर सिस्टीमचे दिनांक २८.२.२०१९ रोजी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट संपत असल्याने पुढिल एक वर्षाकरीता सोलर हॉट वॉटर सिस्टीम रक्कम रु. ९,७१,८८०/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

विभागाचे स्पष्ट मत:- विभागाचा श्री साईबाबा संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान, साईधर्मशाळा, साईउद्यान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान तसेच साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ हॉस्पीटल येथील रुग्णांना स्नानांनाकरीता गरम पाण्याची सोय व्हावी याकरीता एकुण ५,११,००० लिटर क्षमतेच्या सोलर हॉट वॉटर सिस्टीमचे एकवर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC)देणेकामी रक्कम रुपये ९,७१,८८०/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. याकामी महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.inया संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुनसंबंधीत कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवाव्या लागतील. सदरील प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी श्री साईबाबा संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान, साईधर्मशाळा, साईउद्यान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान तसेच साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ हॉस्पीटल येथील सोलर हॉट वॉटर यंत्रणेचे एक वर्ष (कार्यादेश दिलेपासून पुढील एक वर्ष) करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणेकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७०४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासस्थान, साईधर्मशाळा, साईउद्यान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान तसेच साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ रुग्णालय येथील सोलर हॉट वॉटर यंत्रणेचे एक वर्ष कालावधीकरीता (कार्यादेश दिल्यापासून पुढील एक वर्ष) वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या रक्कम रु.९,७१,८८०/-मात्र अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)**

---

विषय नं.०९ **श्री रामनवमी उत्सव -२०१८ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत श्री रामनवमी,श्री गुरुपौर्णिमा, व श्री पुण्यतिथी हे मुख्य उत्सव साजरे करण्यात येतात.

मा. व्यवस्थापन समितीचे दि ०२.०२.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.७९

श्री रामनवमी उत्सव-२०१८ दि.२४.०३.२०१८ ते दि.२६.०३.२०१८ या कालावधी मधील खर्चाकरीता मा. व्यवस्थापन समितीचे दि ०२.०२.२०१८ व दि.०७.३.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.७९,१४५

अन्वये एकुण रुपये १,०३,१७,५९०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. प्रत्यक्षात श्री रामनवमी उत्सव २०१८ साठी खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

श्री रामनवमी उत्सव -२०१८ अंदाजपत्रक

| अ.नं | तपशील | अंदाजपत्रकातील मंजूर रक्कम | प्रत्यक्ष खर्च | तरतूदी पेक्षा जादा खर्च | तरतूदी पेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मंडप,कमानी स्टेज व साऊंड सिस्टम खर्च | ८,६३,९४७.०० | १५,१०,०७५.०० | ६४६१२८.०० | - |
| ०२ | कलाकार, बिदागी | १५,००,०००.०० | ७,५१,९७६.०० | - | ७४८०२४.०० |
| ०३ | भक्तांना मिष्टान्न मजुरीसह | ८,४४,२४३.०० | ६,५२,८१२.०० | - | १९१४३१.०० |
| ०४ | विद्युत रोषणाई | १०,५०,०००.०० | १०,३७,२३७.०० | - | १२७६३.०० |
| ०५ | निमत्रंण पत्रिका छपाई, पत्रिका उदीप्रसाद पाठविणेसह पोस्टेज व जाहिरात | २०,००,०००.०० | २३,९४,३५२.०० | ३९४३५२.०० | - |
| ०६ | एल.ई.डी पडदा | १५,०००.०० | - | - | १५०००.०० |
| ०७ | फुल सजावट | २,००,०००.०० | - | - | २०००००.०० |
| ०८ | जादा कामगार | ६,००,०००.०० | ३,०८,२३५.०० | - | २९१७६५.०० |
| ०९ | पाणी व्यवस्था (टॅंकर डिझेल व भाडे) | ९,००,०००.०० | १,८९,२५६.०० | - | ७१०७४४.०० |
| १० | कुस्ती हगामा | २०,००,०००.०० | १६,१९,७७७.०० | - | ३८०२२३.०० |
| ११ | इतर खर्च | ३,४४,४००.०० | ५२,३६३.०० | - | २९२०३७.०० |
| | **एकूण रुपये** | **१,०३,१७,५९०.००** | **८५,१६,०८३.००** | **१०,४०,४८०.००** | **२८,४१,९८७.००** |

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त तपशीलात नमुद केलेप्रमाणे श्री रामनवमी उत्सव-२०१८ करिता रक्कम रु.१,०३,१७,५९०/- (रु.एक कोटी तीन लाख सतरा हजार पाचशे नव्वद) मात्र मंजूर करण्यात आलेले होते,या रकमेतून उत्सवाकरीता प्रत्यक्षात एकूण रुपये रु.८५,१६,०८३/-(रु.पंच्याऐंशी लाख सोळा हजार त्र्याऐंशी) मात्र इतका खर्च झालेला आहे.

प्रस्ताव- तरी सदरचे प्रत्यक्षात झालेल्या एकूण रु. ८५,१६,०८३/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर .

**निर्णय क्र.७०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव-२०१८ करीता झालेल्या रक्कम रु.८५,१६,०८३/- मात्र खर्चाचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली. तसेच यापुढे प्रत्येक उत्सवाचे खर्चाचा तपशिल तीन महिन्याचे आत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा असे निर्देश देण्यात आले.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्षप्रमुख)**

---

**विषय नं.१०** **श्री साईबाबा संस्थान परिसरात महिला व बाल सुरक्षा कक्ष सुरु करण्यासाठी जागा मिळणेबाबत डॉ. गिरीश कुलकर्णी, स्नेहालय, अहमदनगर यांचे दि. ०७/०५/२०१८ रोजीचे पत्र.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मध्ये "विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता,राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून,एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही,किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,"अशी तरतूद आहे.

प्रस्तावना–डॉ. गिरीश कुलकर्णी,स्नेहालय,अहमदनगर यांनी त्यांचेकडील उपरोक्त जा.क्रं./स्नेह/२४९/१८/५ दि.०७/०५/२०१८ अन्वये श्री साईबाबा संस्थान परिसरात महिला व बाल सुरक्षा कक्ष सुरु करण्यासाठी जागा मिळणेबाबत मा.अध्यक्ष,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना उद्देशून पत्र सादर केले असून त्यात त्यांनी "श्री साईबाबा संस्थान परिसरात दररोज हजारोंच्या संख्येने भक्त व भाविक येत असतात. त्यांच्यासाठी सर्व सोयी सुविधा आपले संस्थान देत आहे. तथापि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या महिला व बालकांसाठी सुरक्षा कक्ष सुरु करण्याबाबत मात्र अद्याप कुठलीही ठोस कारवाई झालेली नाही. मागील ३० वर्षात आम्ही (स्नेहालय संस्थेने आणि अहमदनगर चाईल्ड लाईनने) साधारणत: ४०० प्रकरणामध्ये थेट हस्तक्षेप करुन काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या महिला व बालकांना तातडीची मदत केली. त्यात बाल कामगार,बाल भिक्षेकरी,बाल लैंगिक शोषण,बाल गुन्हेगारी,सोडून दिलेली मतीमंद-गतीमंद-मुकबधिर-अंध-एडस बाधीत आणि इतर अस्थिव्यंग असलेली बालके,मानसिक आजारी व बलात्कारीत महिला यांचा समावेश होता. या सर्व हस्तक्षेपासाठी आम्हाला अहमदनगर येथून ८० किमी. वरुन धावत यावे लागते. श्री साईबाबा संस्थानच्या

परिसरात महिला व बालकांच्या सुरक्षा कक्षासाठी सुमारे ४०० चौ.फुटांची जागा स्नेहालय संस्थेला विनामुल्य उपलब्ध करुन दिल्यास अशा प्रश्नात स्वयंस्फूर्त,थेट आणि दैनंदिन हस्तक्षेप स्नेहालय करील. या संदर्भात कर्मचारी नेमणे, त्यांचे आर्थिक व प्रशिक्षणाची जबाबदारी स्नेहालय संस्था घेईल. आजवर साईबाबा संस्थानच्या अनेक माजी अध्यक्ष, विश्वस्त आणि मुख्य कार्यकारी अधिका-यांना याविषयी निवेदने दिली. परंतु अशा प्रकारच्या मुलभूत कामात कोणीही रस दाखविला नाही. आपण संवेदनशील असल्याने या मुद्यांवर कारवाई कराल,अशी खात्री वाटते," असे नमूद केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय– स्नेहालय संस्थेच्या उपरोक्त दि.०७/०५/२०१८ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता त्यात संरक्षणाची गरज असलेल्या महिला व बालकांसाठी सुरक्षा कक्ष सुरु करणेचा उक्त संस्थेचा मानस असलेचे दिसून येते. तथापि साईबाबा संस्थानचे विविध भक्तनिवास हे भक्तांचे रहिवासासाठी वापरले जातात. या सर्व भक्तनिवासांमध्ये २४ तास सुरक्षा रक्षक नियुक्त केलेले असून काही ठिकाणी सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत व उर्वरित ठिकाणी सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसविण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. संस्थानचे परिसरात महिला व बालकांची सुरक्षेची काळजी प्रशासनामार्फत घेतली जाते. यास्तव संस्थान परिसरात याच कामासाठी त्रयस्थ संस्थेची आवश्यकता नसावी,अशी धारणा आहे. याशिवाय संस्थान परिसरात अशा त्रयस्थ संस्थेस अथवा व्यक्तीस जागा वापरास दिल्यास भविष्यात इतर संस्था अथवा व्यक्ती देखील संस्थानकडे संस्थान परिसरात जागा वापरासाठी मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान परिसरात महिला व बाल सुरक्षा कक्ष सुरु करण्यासाठी जागा मिळणेबाबत डॉ.गिरीश कुलकर्णी,स्नेहालय, अहमदनगर यांचे दि.०७/०५/२०१८ रोजीच्या पत्रावर निर्णय होणेबाबत.

**निर्णय क्र.७०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.११** **सन-२०१९ साठी श्री साईलिला व्दैमासिके नियतकालिके मराठी व हिंदी-इंग्रजी छपाई करणे व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम तरतुद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.१७ (२) ठ मध्ये " श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील," अशी तरतूद आहे.

प्रस्तावीक- श्री साईबाबा संस्थानमार्फत विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत श्री साईबाबांचे जीवन कार्य, त्याच्या लिला व त्यांची शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने श्री साईलिला द्वैमासिक सन-१९२३ पासून प्रकाशित करून वर्गणीदार साईभक्तांना पाठविले जातात. वर्षानुवर्ष साईभक्त श्रींचे दर्शनासाठी दुरवरून श्री क्षेत्र शिर्डी येथे येत असतात. त्यात त्यांना आलेल्या अनुभवाचा व प्रसादाचा ते आवर्जुन उल्लेख करत असतात. श्री साईलिला अंकांमध्ये अशाच प्रकारे साईबाबांचे भक्तांना आलेले अनुभव, त्याचा घटनाक्रम तसेच श्री साईबाबा संस्थानमार्फत राबविणेत आलेल्या तसेच राबविणेत येत असलेल्या नवनवीन योजना, सुधारणा तसेच संस्थानकडील वर्षभरातील कार्यक्रम व उत्सव आदी विशेष घटनांचा वार्तालेप यात छपाई करण्यात येत असल्याने त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे अधिकृत नियतकालिक असेही म्हटले जाते.

आज अखेर श्री साईलिला अंकाचे सभासद होणेकरिता (०६ अंकासाठी) भारतात वार्षिक रू.५०/- व अजीवन सभासदासाठी रू.१,०००/- व विदेशात वार्षिक रू.१,०००/- देणगी मूल्य आकारणी केली जाते.

उपरोक्त संदर्भ क्र.३ नुसार मागील सन-२०१८ मध्ये माहे जानेवारी-२०१८ ते माहे डिसेंबर-२०१८ या कालावधीसाठी श्री साईलिला अंक छपाईचा कार्यादेश मे.टॅको व्हिजन प्रा.लि.मुंबई यांना देण्यात आलेला होता, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | द्वैमासिक छपाई संख्या | एकूण वार्षिक प्रती छपाई संख्या | मागील मंजूर दर (सर्व करांसह) रूपये पैसे | एकूण रूपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री साईलिला अंक मराठी (०५ अंक) ३२ + ४ पाने = ३६ पाने | ७,००० | ३५,००० | १३.०४ | ४,५६,४००/- |
| २. | श्री पुण्यतिथी (दसरा) विशेषांक मराठी (०१ अंक) ६४+४ पाने = ६८ पाने | ७,००० | ७,००० | २१.७७ | १,५२,३९०/- |
| ३. | श्री पुण्यतिथी (दसरा) विशेषांक मराठी | ९,००० | ९,००० | ३८.२० | ३,४३,८००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (०१ अंक) ९६+४ पाने = १०० पाने | | | | |
| ४. | श्री साईलिला अंक हिंदी-इंग्रजी (०५ अंक) ३२ + ४ पाने = ३६ पाने | १५,००० | ७५,००० | ११.६४ | ८,७३,०००/- |
| ५. | श्री पुण्यतिथी (दसरा) विशेषांक हिंदी-इंग्रजी (०१ अंक) ६४+४ पाने = ६८ पाने | १५,००० | १५,००० | २०.१५ | ३,०२,२५०/- |
| ६. | श्री पुण्यतिथी (दसरा) विशेषांक हिंदी-इंग्रजी (०१ अंक) ९६+४ पाने =१०० पाने | १५,००० | १५,००० | ३४.४१ | ५,१६,१५०/- |

प्रस्तावः- उपरोक्त तक्त्यातील संदर्भानुसार मुंबई कार्यालय, यांचेकडून दि.०१.११.२०१८ चे ई-मेल पत्रान्वये, ' संस्थान प्रकाशित साईलिला(मराठी) व श्री साईलिला (हिंदी-इंग्रजी) या द्वैमासिक नियतकालिकांच्या जानेवारी-२०१८ ते डिसेंबर-२०१८ या कालावधीतील अंकाच्या छपाईकामाची मुदत डिसेंबर-१८ अखेर संपत असलेने, जानेवारी २०१९ ते डिसेंबर २०१९ या कालावधीत प्रकाशित करावयाच्या अंकांच्या छपाईकामाकरिता तजवीज होणे आवश्यक असलेने, त्याबाबत कार्यवाही व्हावी', असे कळविलेले आहे. तसेच मराठी द्वैमासिकाच्या सभासदांची संख्या सुमारे ७५०० असून, हिंदी-इंग्रजी द्वैमासिकाच्या सभासदांची संख्या सुमारे १५,५०० आहे. त्यानुसार छपाई करावयाच्या साईलिला द्वैमासिकांचा तपशिल खालीलप्रमाणे सादर केलेला आहे.

| अ.नं. | तपशिल | द्वैमासिक/पाकीटे छपाई नग/संख्या | एकूण वार्षिक प्रती छपाई संख्या | अंदाजे दर रक्कम (सर्व करांसह) रूपये पैसे | एकूण रूपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री साईलिला अंक मराठी (०५ अंक) ३२ + ४ पाने = ३६ पाने | ७,५०० | ३७,५०० | १७.०० | ६,३७,५००/- |
| २. | श्री पुण्यतिथी (दसरा) विशेषांक मराठी (०१ अंक) ६४+४ पाने = ६८ पाने | ७,५०० | ७,५०० | २३.०० | १,७२,५००/- |
| ३. | श्री साईलिला अंक हिंदी-इंग्रजी (०५ अंक) ३२ + ४ पाने = ३६ पाने | १५,५०० | ७७,५०० | १६.०० | १२,४०,०००/- |
| ४. | श्री पुण्यतिथी (दसरा) विशेषांक-,हिंदी-इंग्रजी (०१ अंक) ६४+४ पाने = ६८ पाने | १५,५०० | १५,५०० | २२.०० | ३,४१,०००/- |
| ५. | पाकीटे (Envelope)-१<br>पाकीटाचा आकार- ११.५ x८.५+१.७ फ्लॅप<br>वापरावयाचा कागद- ८० जीएसएम क्राफ्ट ब्राऊन पेपर, एक रंगात छपाई | १,५०,००० | १,५०,००० | २.०० | ३,००,०००/- |
| | | | | **एकूण रक्कम रूपये-** | **२६,९१,०००/-** |

(अक्षरी रक्कम रूपये सव्वीस लाख एक्क्यान्नव हजार मात्र )

प्रस्तावित छपाईकामी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करून ई-निविदा मागणीवरून निम्नत्तम दर देऊ केलेल्या निविदाकारांना छपाई कार्यादेश पारीत करण्यात येईल. याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू. **२६,९१,०००**/-खर्च अपेक्षित आहे.

सन-२०१८ चे अंदाजपत्रकात श्री साईलिला अंक छपाईसाठी केलेल्या रक्कम रू.३०,००,०००/- अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आलेली आहे.

विभागाचा अभिप्रायः- प्रस्तावित सन-२०१९ साठी श्री साईलिला अंक छपाईकामी खालील बाबींवर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर करणेस मान्यता असावी.

१) छपाईकामी येणा-या अंदाजे रक्कम रू. **२६,९१,०००**/- (अक्षरी रक्कम रूपये सव्वीस लाख एक्क्यान्नव हजार मात्र) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

२) श्री साईलिला मुं,कार्यालय यांचेकडून दि.०१.११.२०१८ चे ई-मेल पत्रान्वये, ' सध्या संस्थान प्रकाशित साईलिला(मराठी) नियतकालिकांच्या सभासदांची संख्या सुमारे ७५०० असून, हिंदी-इंग्रजी

द्वैमासिकाच्या सभासदांची संख्या सुमारे १५,५०० अशी कळविलेप्रमाणे दोन्ही अंकामध्ये प्रत्येकी ५०० नग जादा छपाई करण्यास मान्यता असावी.

३) जनसंपर्क विभागामार्फत वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणे व त्यासाठी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता असावी.

४) आयटी विभागामार्फत संस्थान संकेतस्थळावर ई-निविदा सूचना प्रसिध्द करणेस मान्यता असावी.

५) विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबवून त्याप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करणेस मान्यता असावी.

सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेत मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.७०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे श्री साईलिला व्दैमासिके, नियतकालिके मराठी व हिंदी-इंग्रजी अंक छपाई करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रू.२६,९१,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

| अ.नं. | तपशिल | सन २०१८ मधील व्दैमासीक/पाकीटे छपाई नग/संख्या | सन २०१९ मधील व्दैमासीक/पाकीटे छपाई नग/संख्या | सभासद संख्येत झालेली वाढ | सन-२०१९ साठी एकूण वार्षिक प्रती छपाई संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री साईलिला अंक मराठी (०५ अंक)<br>३२ + ४ पाने = ३६ पाने | ७,००० | ७,५०० | ५०० | ३७,५०० |
| २. | श्री पुण्यतिथी (दसरा) विशेषांक मराठी (०१ अंक) ६४+४ पाने = ६८ पाने | ७,००० | ७,५०० | ५०० | ७,५०० |
| ३. | श्री साईलिला अंक हिंदी-इंग्रजी (०५ अंक)<br>३२ + ४ पाने = ३६ पाने | १५,००० | १५,५०० | ५०० | ७७,५०० |
| ४. | श्री पुण्यतिथी (दसरा) विशेषांक-,हिंदी-इंग्रजी (०१ अंक) ६४+४ पाने = ६८ पाने | १५,००० | १५,५०० | ५०० | १५,५०० |
| ५. | पाकीटे (Envelope)-१<br>पाकीटाचा आकार- ११.५ x८.५+१.७ फ्लॅप<br>वापरावयाचा कागद- ८० जीएसएम क्राफ्ट ब्राऊन पेपर, एक रंगात छपाई | १,५०,००० | १,५०,००० | --- | १,५०,००० |

**छपाईसाठी वापरण्यात येणारा कागद (आतील पाने) चांगल्या प्रतीचा साधारणपणे ९० जीएसएम चा वापरणेत यावा.**

**तसेच श्री साईलिला द्वैमासिकामध्ये अध्यात्मिक विषयांचा समावेश मोठया प्रमाणात असावा. श्री साईलीला अंक छपाई बाबतचा विषय सादर करतांना त्यामध्ये मागील वर्षी छपाई केलेल्या अंकाची संख्या व छपाई खर्च तसेच चालू वर्षीच्या अंकाची छपाई संख्या व खर्चाचा तुलनात्मक तक्त्याचा समावेश करावा, अशा सुचना यावेळी देण्यात आल्या.** **(कार्यवाही-प्र.अधिक्षक,प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, HMIS संगणकीय प्रणालीकरीता व इतर विभागांकरीता 10 MBPS Internet Lese Line सुविधा खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये उपचार घेणकामी आलेल्या गरीब व गरजू रुग्णांना तातडीची सेवा देणेसाठी, विविध शासकीय संकेतस्थळांद्वारे हॉस्पिटलचे विविध विभागांमध्ये इंटरनेट सुविधेची आवश्यकता असते.

इंटरनेटद्वारे संबंधीत विभागात चालणारे दैनंदिन कामकाज खालीलप्रमाणे,

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य् योजना विभागामार्फत गरीब व गरजू रुग्णांना तातडीची सेवा देणेसाठी सदर योजनेचे कामकाज ऑनलाईन पद्धतीने करणेसाठी इंटरनेटची आवश्यकता असते.

मेडीकल रेकॅार्ड विभागामार्फत दोन्ही हॉस्पिटलमधील जन्म् मृत्युच्या नोंदी ऑनलाईन पद्धतीने करणेसाठी इंटरनेटची आवश्यकता असते.

सोशल वर्कर विभागामार्फत गरीब व गरजू रुग्णांच्या बिलात ऑनलाईन पद्धतीने सवलत (चॅरीटी) देणेसाठी इंटरनेटची आवश्यकता असते.

रेडीओलॉजी विभागात ऑनलाईन पद्धतीने टेलिरेडीओलॉजी प्रणालीद्वारे रिपोर्ट करणेकामी इंटरनेटची आवश्यकता असते.

श्री साईनाथ रुग्णालयातील ICTC या शासकीय विभागास दैनंदिन कामकाज करणेकामी इंटरनेटची आवश्यकता असते.

तसेच, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमधील विविध विभागाचे दैनंदिन कामकाज करणेकामी इंटरनेटची आवश्यकता असते.

उपरोक्त नमुद विभागांचे ऑनलाईन पद्धतीचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालणेकामी यापुर्वी M/s. Gazon Communication India Ltd Pune यांचेकडून 6 MBPS इंटरनेट सुविधेकरीता रक्कम रु. 1,00,900/- मात्र निम्नत्तम दर स्विकारणेत येऊन त्यांना दि. 07/12/2017 कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कार्यादेशाचा कालावधी 1 वर्षाचा असून तो दि. 01/01/2017 पासून ते 31/12/2018 पर्यंत आहे.

तसेच सद्यस्थितीला दोन्ही रुग्णालयांकरीता नविन HMIS संगणकीय प्रणाली कार्यान्वित करणेचे कामकाज सुरु असून, सदरहू कंपनीने ई-मेलअन्वये HMIS संगणकीय प्रणालीकरीता 4 MBPS इंटरनेट सुविधा आवश्यक असलेबाबत कळविलेले आहे.

त्यामुळे, रुग्णालयांमधील उपरोक्त नमुद विविध विभागांमधील ऑनलाईन कामकाज करणेकामी 6 MPBS व HMIS संगणकीय प्रणालीकरीता 4 MBPS अशी एकत्रीत 10 MBPS इंटरनेट सुविधेची आवश्यकता संस्थान रुग्णालयांस आहे.

त्यानुसार, इकडील विभागाने विविध पुरवठाधारकांकडून सध्याचे इंटरनेट सुविधेचा कालावधी संपृष्ठात आलेनंतर पुढील 3 वर्ष कालावधीकरीता 10 MBPS इंटरनेट सुविधेचे एक वर्षाचे, दोन वर्षाचे व तीन वर्षाचे अंदाजीत दरपत्रके घेतलेली असून त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे,

**एक वर्ष कालावधीचे अंदाजीत दर खालीलप्रमाणे,**

| Sr. No. | Vendor Name | Item description | Approximate One Time Installation charges (OTC) | ApproximateAnnual Recurring Bandwidth Charges | Approximate Annual all Taxes etc. | Approximate 10 Static IP Inclusive of all Taxes | Approximate Total Amount with All Taxes and 10 Static IP |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Gazon Communication | Bandwidth Charges/ Annual Port Charges for 10 MBPS Premium Uncompressed Internet lease line (1:1 Ratio, Full Duplex), for a period of One Year to be terminated on Ethernet Port at Shri Saibaba Hospital of SSST. | 10,000/- | 1,74,000/- | 34,920/- | 10,000/- | 2,28,920/- |
| 2. | Speedmaxx Digital Networks Pvt.ltd. | | 15,000/- | 2,04,000/- | 43,020/- | 20,000/- | 2,82,020/- |
| 3 | Vikram Teleinfra Pvt.Ltd | | 18,000/- | 2,16,000/- | 45,720/- | 20,000/- | 2,99,720/- |

**दोन वर्ष कालावधीचे अंदाजीत दर खालीलप्रमाणे,**

| Sr. No | Vendor Name | Item description | Approximate One Time Installation charges (OTC) | ApproximateAnnual Recurring Bandwidth Charges | Approximate Annual all Taxes etc. | Approximate 10 Static IP Inclusive of all Taxes | Approximate Total Amount with All Taxes and 10 Static IP |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Gazon Communication | Bandwidth Charges/ Annual Port Charges for 10 MBPS Premium Uncompressed Internet lease line (1:1 Ratio, Full Duplex), for a period of One Year to be terminated on Ethernet Port at Shri Saibaba Hospital of SSST. | 10,000/- | 3,36,000/-/ | 64,080/- | 10,000/- | 4,20,080/- |
| 2. | Speedmaxx Digital Networks Pvt.ltd. | | 15,000/- | 3,96,000/- | 77,,580/- | 20000/- | 5,08,580/- |
| 3 | Vikram Teleinfra Pvt.Ltd | | 18,000/-/ | 4,20,000/- | 82,440/- | 20,,000/- | 540,440/- |

तीन वर्ष कालावधीचे अंदाजीत दर खालीलप्रमाणे,

| Sr. No | Vendor Name | Item description | Approximate One Time Installation charges (OTC) | ApproximateAnnual Recurring Bandwidth Charges | Approximate Annual all Taxes etc. | Approximate 10 Static IP Inclusive of all Taxes | Approximate Total Amount with All Taxes and 10 Static IP |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Gazon Communication | Bandwidth Charges/ Annual Port Charges for 10 MBPS Premium Uncompressed Internet lease line (1:1 Ratio, Full Duplex), for a period of One Year to be terminated on Ethernet Port at Shri Saibaba Hospital of SSST. | 10,000/- | 4,86,000/- | 91,080/- | 10,000/- | 5,97,080/- |
| 2. | Speedmaxx Digital Networks Pvt.ltd. | | 15,000/- | 5,58,000/- | 1,06,740/- | 20,000/- | 6,99,740/- |
| 3 | Vikram Teleinfra Pvt.Ltd | | 18,000/- | 5,94,000/- | 87,480/- | 20,000/- | 7,19,480/- |

एक वर्ष कालावधीकरीताची सरासरी अंदाजीत किंमत –

| | |
|---|---|
| सरासरी अंदाजीत रक्कम | 2,70,220/- |

दोन वर्ष कालावधीकरीताची सरासरी अंदाजीत किंमत –

| | |
|---|---|
| सरासरी अंदाजीत रक्कम | 4,89,700/- |

तीन वर्ष कालावधीकरीताची सरासरी अंदाजीत किंमत –

| | |
|---|---|
| सरासरी अंदाजीत रक्कम | 6,72,100/- |

श्री साईनाथ व श्री साईबाबा या दोन्ही हॉस्पिटलकरीता नव्याने सुरु करण्यात येणारे HMIS संगणकीय प्रणाली करीता 10 MBPS Internet Lease Line सुविधा 3 वर्षांकरीता घेणे आवश्यक असल्यामुळे, सध्याचे इंटरनेट सुविधेचा कालावधी संपृष्ठात आलेनंतर पुढील 3 वर्ष कालावधीसाठी 10 MBPS Internet Lease Line सुविधा खरेदी करणेकामी अंदाजीत एकूण रक्कम रु. 6,72,100/- अक्षरी – सहा लाख बाहत्तर हजार शंभर रुपये (कर सहीत) इतका खर्च अपेक्षीत आहे.

मागणी- दोन्ही हॉस्पिटलकरीता सध्याचे इंटरनेट सुविधेचा कालावधी संपृष्ठात आलेनंतर पुढील 3 वर्ष कालावधीसाठी 10 MBPS Lease Line इंटरनेट सुविधा खरेदी करणेकामी अंदाजीत एकूण रक्कम रु. 6,72,100/- (कर सहीत) मात्रचे खर्चास मान्यता देता येईल, तसेच सदरची कार्यवाही संस्थानचे विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रीयेद्वारे करता येईल, असे नम्र मत आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– तरी, उपरोक्त विषयांकीत प्रकरणी दोन्ही हॉस्पिटलकरीता सध्याचे इंटरनेट सुविधेचा कालावधी संपृष्ठात आलेनंतर पुढील 3 वर्ष कालावधीसाठी 10 MBPS Internet Lease Line सुविधा खरेदी करणेकामी अंदाजीत एकूण रक्कम रु. 6,72,100/- अक्षरी – सहा लाख बहात्तर हजार शंभर रुपये (कर सहीत) मात्रचे येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच सदरची कार्यवाही संस्थानचे विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रीयेद्वारे करणेकामी, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णय होणेस्तव सादर.

**निर्णय क्र.७०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे दोन्ही रुग्णालयातील HMIS संगणकीय प्रणालीकरीता 4 MBPS व दोन्ही रुग्णालयातील विविध विभागांमधील ऑनलाईन कामकाज करणेकामी 6 MPBS असे एकुण 10 MBPS Internet Lese Line सुविधा दि.०१.०१.२०१९ पासुन पुढील तीन वर्ष कालावधीसाठी खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.6,72,100/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१३** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकरीता ०८ नग ECG Machine खरेदीकामी रु.१५,१०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता विविध मशिन्स बदलणेकामी बायोमेडीकल विभागामार्फत ठेवण्यात आलेल्या प्रस्तावात श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वार्ड / विभागाकरीता एकूण १२ नग ECG Machine खरेदी करणेकामी एकूण रक्कम रु.८,२०,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली होती. परंतू त्यामध्ये घेण्यात आलेल्या १२ मशिन्सपैकी ०४ नग मशिन देणगी स्वरुपात प्राप्त झालेले असून ०८ नग मशिन खरेदी करावयाचे आहेत.

सदर ०८ नग ECG Machine खरेदीकामी०५ वर्ष वॉरंटी कालावधीकरीता अंदाजे खर्चाकरीता M/s. Pravara Life Care Services, Loni Bk व M/s.Precision Medicare Services, Kopargaon यांचेकडून दूरध्वनीद्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानूसार त्यांनी ई मेल पत्राद्वारे दरपत्रक दिलेले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| Description | Qty. | M/s. Pravara Life Care Services, Loni | | M/s. Precision Medicare, Kopargaon | | Rate Total Rs. | Average Rate Per Unit Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. | | |
| 12 Channel ECG Machine With Storage, Interpretation & With All Standard Accessories With 5 Years Warranty | 8 | 165000.00 | 1320000.00 | 135000.00 | 1080000.00 | 2400000.00 | 1200000.00 |
| CMC Cost For | | | | | | | |
| 6th Year | 8 | 5500.00 | 44000.00 | 10000.00 | 80000.00 | 124000.00 | 62000.00 |
| 7th Year | 8 | 5500.00 | 44000.00 | 10000.00 | 80000.00 | 124000.00 | 62000.00 |
| 8th Year | 8 | 5500.00 | 44000.00 | 10000.00 | 80000.00 | 124000.00 | 62000.00 |
| 9th Year | 8 | 5500.00 | 44000.00 | 10000.00 | 80000.00 | 124000.00 | 62000.00 |
| 10th Year | 8 | 5500.00 | 44000.00 | 10000.00 | 80000.00 | 124000.00 | 62000.00 |
| | | | | Total Amt. in Rs. | | | **1510000.00** |

उपरोक्त ०८ नग ECG Machine ०५ वर्ष वॉरंटी कालावधीसह खरेदीकामी अंदाजे रक्कम रू.१५,१०,०००/- (अक्षरी रू. पंधरा लाख दहा हजार मात्र ) इतकी येते.

मागणी– संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१६ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड / विभागामध्ये वापराकरीता असलेले ECG Machineहे १० वर्षे जुने असल्यामुळे सदर मशिन बदलून नविन मशिन घ्यावयाचे ठरलेले आहे. त्यानूसार ०८ नग नविन ECG Machineविहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करुन देता येतील असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड / विभागाकरीता ०८ नग ECG Machineविहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रू.१५,१०,०००/- (अक्षरी रू. पंधरा लाख दहा हजार मात्र ) चे खर्चास मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी, ही विनंती.

प्रस्ताव- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड / विभागाकरीता ०८ नग ECG Machine खरेदीकामी रु.15,10,000/-चे खर्चास प्रशासकिय मान्यता असावी.

**निर्णय क्र.७०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकरीता ०८ नग ECG Machine खरेदीकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू.१५,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१४** **श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता जुने Refrigerated Blood bag Centrifuge Machine Buyback (परत) करुन नवीन मशिन खरेदीकामी रु.१४,८६,८८५/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक:- श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाने ०१ नग Refrigerated Blood bag Centrifuge Machine ची मागणीपत्रकान्वये मागणी केलेली आहे. श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकडे सध्या ०२ मशीन आहेत. त्यापैकी ०१ मशिन १९९९ साली रक्कम रु.१,४५,१११/- (अक्षरी रुपये – एक लाख पंचेचाळीस हजार एकशे अकरा मात्र) इतक्या किंमतीत खरेदी केली होती. त्याची Capacity ४ Cup ची होती. सध्या सदर मशिन जुने असून कामाचा बोजा बघता त्यांना नविन मशिनची आवश्यकता आहे. तसेच दुसरे मशीनची Capacity ६ Cup ची असून ते सन २००९ मध्ये रु. ७६३८१८/- (अक्षरी रुपये – सात लाख त्रेसष्ट हजार आठशे अठरा मात्र) इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आले होते. सध्या त्यांना नवीन Techonologyची आवश्यकता आहे. सध्या पेशंटची संख्या वाढल्यामुळे रक्ताचे वेगवेगळे घटक Platelet,White Blood Cells, Red Blood Cells,Platelet Cells, तसेच रक्तातील Granulocytes. Lymtrocultes, Monocytes मोजण्यासाठी व रक्तातील इतर घटक मोजण्यासाठी होतो. सदर घटक हे रक्तदात्याकडून रक्त मिळाल्यानंतर या उपकरणात ठेवून अति शीत तापमानाला अवश्यकतेनुसार वेगवेगळे केले जातात व ते रुग्णांना दिले जातात.

उपरोक्त Refrigerated Blood bag Centrifuge Machine ची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१८ अखेर किंमत रु.१२७९.७८ पूर्णाकींत रक्कम रु. १२८०/- (अक्षरी रुपये – एक हजार दोनशे ऐंशी मात्र) इतकी आहे. सदरची रक्कम ही रु. ५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनिय, २००४मधील कलम १७ (४) अन्वये खरेदीपूर्वी शासनाची मान्यता घ्यावी लागणार नाही. त्यामुळे नवीन Refrigerated Blood bag Centrifuge Machine खरेदी करणेस व जुनी Refrigerated Blood bag Centrifuge Machine बायबॅक (Buyback) करणेस हरकत नाही.

त्यामुळे जुने Refrigerated Blood bag Centrifuge Machine बायबॅक (Buyback) परत करुन नवीन Refrigerated Blood bag Centrifuge Machine विहित पद्धतीने ई - निविदा मागवून खरेदी करता येईल.

| Sr. No. | Name of Item | Qty | M/s. Labtop Instrument Pvt. Ltd., Vasai | M/s. Remi Sales & Engineering Ltd., Vasai | M/s. Imperial Biotech LLP. New Delhi. |
|---|---|---|---|---|---|
| | | | Rate Per in Rs. | Rate Per in Rs. | Rate Per in Rs. |
| 1 | Refrigerated Blood bag Centrifuge Machine | 1 | 771750.00 | 1127500.00 | 800000.00 |
| | | GST | GST 18% - 138915.00 | GST 18% - 202950.00 | GST 12% - 144000.00 |
| | | Total Amt. in Rs. + GST | 910665.00 | 1330450.00 | 944000.00 |
| | | Warranty | 5 Year | 5 Year | 5 Year |
| | | Packing | 15435.00 | | |

| | | | |
|---|---|---|---|
| Installation | 15435.00 | | |
| CMC | 77175.00 | 90200.00 | 80000.00 |
| | 77947.00 | 90200.00 | 80000.00 |
| | 78726.00 | 90200.00 | 80000.00 |
| | 79513.00 | 90200.00 | 80000.00 |
| | 80309.00 | 90200.00 | 80000.00 |
| | 393670.00 | 451000.00 | 80000.00 |
| Total Amt in Rs. | 1335205.00 | 1781450.00 | 1344000.00 |
| Total Amt in Rs. | 4460655.00 | | |
| Total Average in Rs. | 1486885.00 | | |

उपरोक्त प्रमाणे Refrigerated Blood bag Centrifuge Machine खरेदीकामी सरासरी किंमत रक्कम रू.१४८६८८५/- (अक्षरी रू. चौदा लाख शहांशी हजार आठशे पंच्याशी मात्र ) इतका खर्च अपेक्षित आहे.

मागणी:– श्री साईनाथ रक्तपेढी याविभागाने मागणीपत्रकान्वये ०१ नग Refrigerated Blood bag Centrifuge Machine ची मागणी केलेली आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४/प्र.क्र.८२/भाग – ३/उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु.३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

३) सन १९९९ मध्ये खरेदी केलेल्या मशीनची ३१/०३/२०१८ अखेर घसारा किंमतरु.१२८०/- इतकी आहे. सदरची किंमत ही रु. ५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची मान्यता घ्यावी लागणार नाही.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाने ०१ नग Refrigerated Blood bag Centrifuge Machine ची मागणीपत्रकान्वये मागणी केलेली आहे. श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकडे सध्या ०२ मशीन आहेत. त्यापैकी ०१ मशिन १९९९ साली रक्कम रु.१,४५,१११/- (अक्षरी रुपये – एक लाख पंचेचाळीस हजार एकशे अकरा मात्र) इतक्या किंमतीत खरेदी केली होती, त्याची Capacity ४ Cup ची होती. सध्या सदर मशिन जुने असून कामाचा बोजा बघता त्यांना नविन मशिनची आवश्यकता आहे. तसेच दुसरे मशीनची Capacity ६ Cup ची असून ते सन २००९ मध्ये रु.७६३८१८/- (अक्षरी रुपये – सात लाख त्रेसष्ट हजार आठशे अठरा मात्र) इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आले होते.
सध्या त्यांना नवीन Techonologyची आवश्यकता आहे. सध्या पेशंटची संख्या वाढल्यामुळे रक्ताचे वेगवेगळे घटक Platelet,White Blood Cells, Red Blood Cells,Platelet Cellsतसेच रक्तातील Granulocytes. Lymtrocultes, Monocytes मोजण्यासाठी व रक्तातील इतर घटक मोजण्यासाठी होतो.

सदर घटक हे रक्तदात्याकडून रक्त मिळाल्यानंतर या उपकरणात ठेवून अति शीत तापमानाला अवश्यकतेनुसार वेगवेगळे केले जातात व ते रुग्णांना दिले जातात. त्यामुळेश्री साईनाथ रक्तपेढी या विभागाने जुने ०१ मशीन बायबॅक करुन ०१ नग नवीनRefrigerated Blood bag Centrifuge Machine चीमागणी केलेली आहे. त्यामुळे त्यांना नवीन मशीन विहीत पध्दतीने ई निविदा मागवून खरेदी करून देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता ०१ नग Refrigerated Blood bag Centrifuge Machine विहीत पध्दतीने ई निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. रू.१४८६८८५/- (अक्षरी रू. चौदा लाख शहांशी हजार आठशे पंच्याशी मात्र ) चे खर्चास व जुने ०१ नग मशीन Buyback करणेस मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी, ही विनंती.

प्रस्ताव- श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता जुने Refrigerated Blood bag Centrifuge MachineBuyback( परत) करून नवीन मशिन खरेदीकामी रु.१४,८६,८८५/-चे खर्चास प्रशासकिय मान्यता असावी.

**निर्णय क्र.७१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता ०१ नग Refrigerated Blood bag Centrifuge Machine खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१४,८६,८८५/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच जुने ०१ नग Refrigerated Blood bag Centrifuge Machine Buyback करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१५** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.३,९५,८४५/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद –

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –१) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक – खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी – पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | चालु आर्थिक वर्षात यापुर्वी अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले | | | | | | | |
| १ | श्री अभयकुमार शांताराम दुनाखे<br>विभाग- औ.प्र. सं.<br>हुददा – निर्देशक | स्वतः | HTN रक्तदाब | डॉ. जाधवर | साईबाबा हॉस्पिटल | ५६७३.०० | ५६७३.०० | ४९२०६९.०० |
| | | | | | अ - एकूण रक्कम | ५६७३.०० | ५६७३.०० | |
| | ब. संस्थान रुग्णालयात उपचार न झाल्याने संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते. | | | | | | | |
| २ | श्री. अशोक नामदेव झुरंगे<br>विभाग- भांडार<br>हुद्दा- अधिक्षक | स्वतः | Diabetes/ blood pressure/CKD मधुमेह रक्तदाब किडनी संसर्ग | डॉ. जाधवर | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे | ७७७८.०० | ७७७८.०० | १८००५.०० |
| ३ | श्री अभयकुमार शांताराम दुनाखे<br>विभाग- औ.प्र. सं.<br>हुददा – निर्देशक | पत्नी | Ca कर्करोग | डॉ.बो-हाडे | सहयाद्री हॉस्पिटल, नासिक | १७८४५९.०० | १४३२७१.०० | ४९२०६९.०० |
| ४ | श्री.अशोक हरीभाऊ शेळके<br>विभाग- बांधकाम<br>हुद्दा – मदतनीस | पत्नी | Pet Scan पोटाची तपासणी | डॉ.अमोल जोशी | रुबीहॉल क्लिनिक, पुणे | २३०००.०० | २३०००.०० | ३१९७४५.०० |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | चालु आर्थिक वर्षात यापुर्वी अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | शकिला सलीम शेख<br>विभाग- आया<br>हुद्दा-साईनाथ रुग्णालय | पती | Ca<br>कर्करोग | डॉ.राम नाईक | रुबीहॉल क्लिनिक, पुणे | ७१८१५.०० | ६५७११.०० | ००.०० |
| | | | | | **ब - एकूण रक्कम** | २८१०५२.०० | २३९७६०.०० | |
| | **क. संस्थान रुग्णालयात उपचार न घेतलेले व रेफर न केलेले** | | | | | | | |
| ६ | श्री. मधूकर जयराम महाजन<br>विभाग- मुंबई कार्यालय<br>हुद्दा- प्र. कार्यालय अधिक्षक | स्वतः | HTN/Diabetes रक्तदाब /मधुमेह | डॉ.मिर्झा, डॉ.पाटील, डॉ.ढोक | अपोलो हॉस्पिटल, मुंबई संजीवन सर्जिकल मॅटनिर्टी हॉस्पि.मुंबई | २१९३१०.०० | १५०४१२.०० | रुग्णाचे वास्तव्य बाहेरगावी असल्यामुळे ८०% रक्कम द्यावी असे मत आहे.<br>००.०० |
| | | | | | **क - एकूण रक्कम** | २१९३१०.०० | १५०४१२.०० | |
| | | | | **अ+ब +क - एकूण रक्कम** | | ५०६०३५.०० | ३९५८४५.०० | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.३,९५,८४५/-इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले आहेत.

प्रस्ताव–उपरोक्त०६ कर्मचारी/कर्मचा-यांवर अवलंबित व्यक्ती यांचे वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.३,९५,८४५/- मात्र अदा करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त प्रस्तावातील ०६ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.३,९५,८४५/- मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१६** **संस्थानच्या रुग्णालये विभागात महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वेतनबॅन्ड १५६००- ३९१०० ग्रेड पे ५४०० या वेतनश्रेणीतील एक पद प्रतीनियुक्तीव्दारे भरणेसाठी निर्माण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम कलम २००४ तरतुद – कलम १३(४) मधील समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-याची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ –"सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी." तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

प्रस्तावना- श्री साईबाबांनी त्यांच्या जीवनात गोरगरीबांवर इलाज करून त्यांना व्याधीमुक्त केले आहे. तशी त्यांची शिकवण आहे. या शिकवणीस अनुसरून संस्थानमार्फत सन १९६६ पासून जनरल हॉस्पिटल चालविले जाते. शिर्डी हे ठिकाण औरंगाबाद, नाशिक,पुणे, मुंबई इ. सर्वच महात्वाच्या ठिकाणांपासून ३ ते ७ तासांच्या अंतरावर आहे. तसेच रूग्णांना पुणे, नाशिक, मुंबई इत्यादी ठिकाणी जाऊन महागडे उपचार घ्यावे लागतात. या सर्व बाबींचा विचार करून शिर्डी येथे सुपरस्पेशालिटी साईबाबा हॉस्पिटल सुरू करणेत आले. आता

३०० बेडसंख्या असलेले श्री साईनाथ जनरल हॉस्पिटल व २५० बेड असलेले श्री साईबाबा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल पुर्ण क्षमतेने सुरू आहेत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम १३(४) मधील तरतूदीनुसार व सदर शासन निर्णयात नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून साईबाबा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलकरीता पदांचा आकृतीबंध दि. १३ जून २००७ रोजी मंजुर झालेला आहे. तदनंतर दि. ०७/०८/२००९ रोजी साईबाबा हॉस्पिटलसाठी ७४४ पदांचा व श्री साईनाथ रूग्णालयासाठी ४४३ पदांचा सुधारीत आकृतीबंध मंजुर झालेला आहे. सदर दोन्ही रूग्णालयांवर नियंत्रण ठेवणेकरीता आकृतीबंधामध्ये वैद्यकीय संचालक, उपवैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक, वैद्यकीय प्रशासक इत्यादी पदांचा समावेश केलेला आहे.

वैद्यकीय संचालक यांचे नियंत्रणाखाली श्री साईबाबा हॉस्पिटलकडील तज्ञ वैद्यकीय अधिकारी, अपघात कक्ष वैद्यकीय अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी तसेच एच आर विभाग, वित्त विभाग, बायोमेडीकल विभाग, खरेदी विभाग, पीआरओ विभाग, इत्यादी विभाग कार्यान्वीत असुन श्री साईनाथ रूग्णालय विभाग वैद्यकीय अधिक्षक यांचे नियंत्रणाखाली असुन त्यांचेमार्फत रूग्णालयात तज्ञ वैद्यकीय अधिकारी, अपघात कक्ष वैद्यकीय अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी तसेच अधिक्षक कार्यालय, अनुदान विभाग, रक्तपेढी, इत्यादी विभाग कार्यान्वीत असुन त्यांचेमार्फत खालीलप्रमाणे कामकाज केले जाते.

१. रूग्णालयाचे आकृतीबंधानुसार जाहीरात प्रसिध्द करून मुलाखतीद्वारे रिक्त जागा भरल्या जातात. दोन्ही हॉस्पिटलमध्ये सध्या ४६८ कायम कर्मचारी व ५४० बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी कर्मचारी असे एकुण १००८ कर्मचारी कार्यरत आहेत. कायम कर्मचा-यांचे आस्थापनेविषयक सर्व कामकाज करणेत येते.
२. रूग्णालय आस्थापनेवरील कर्मचा-यांचे वेतन अदा करणे, पीएफची कार्यवाही करणे, प्रोत्साहन भत्ता अदा करणे इ. कामे केली जातात. कायम कर्मचा-यांचे माहे ०१ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ अखेर श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रू. २६,२५,४५,०००/- तसेच श्री साईनाथ रूग्णालयातील रू. १३,६४,८४,२००/- वेतन अदा करणेत आलेले आहे. तसेच कंत्राटी कर्मचा-यांचे साईबाबा हॉस्पिटलमधील रू. ९,५४,४८,६५२/- व श्री साईनाथ रूग्णालयातील रू. ४,३७,९५,२२०/- वेतन अदा करणेत आलेले आहे.
३. हॉस्पिटल मशिनरी खरेदीसाठी वार्षीक सरासरी रू. ३,४७,९१,२६४/- खर्च होतो.
४. रूग्णालयातील रूग्णांसाठी औषधे खरेदी करणेसाठी साधारणपणे वार्षीक रू. १९,६५,६६,४३६/- इतका खर्च होत आहे.
५. संस्थानच्या खरेदी करावयाच्या मशिनरी, औषधी इ. पुरवठादारांची देयके नियमानुसार अदा करणे.
६. जीएसटी, आयकर इत्यादी कराविषयक बाबी पहाणे.
७. हॉस्पिटलच्या विविध विभागांसाठी करावयाच्या खरेदीसाठी खरेदी समितीमध्ये सदस्य म्हणून काम पहाणे, इत्यादी अत्यंत महत्वाची व वित्तीय बाबींशी निगडीत कामेही मोठ्या प्रमाणावर आहेत.
८. गरजु व गरीब रूग्णांसाठी अनुदान पुरविण्याचे कामकाज चालते. त्यानुसार वार्षीक सरासरी रूग्णांना अंदाजे रू. ९७,०९,०००/- आर्थिक अनुदान देणेत आले.

माहे ०१ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ या आर्थिक वर्षात श्री साईबाबा हॉस्पिटलकडून ५३,१४,६९,७६४/- रूपये व श्री साईनाथ रूग्णालयाकडून ४,२५,२७,४९९/- तसेच साईनाथ रक्तपेढीकडून २४,४५,४६०/- रूपयांची आवक श्री साईबाबा संस्थानला झालेली आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलचे सन २०१७-१८ ची जमा रू. ५७,६४,४२,७२३/- असुन खर्च रू. ९९,५६,२२,४०६/- आहे. तसेच भविष्यात कॅन्सर हॉस्पिटल, वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय सुरू करणे प्रस्तावित आहे. त्यामुळे या खर्चात मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे. उपरोक्त सर्व आर्थीक बाबींचा तसेच यापुढे वाढणा-या जबाबदारीचा विचार करता आर्थीक बाबींवर नियंत्रण ठेवणेकरीता लेखाविषयक कार्यपध्दती व शासनाच्या खरेदीविषयक नियमांचे सखोल ज्ञान असणा-या अधिका-यांचे पर्यवेक्षण असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत रूग्णालये विभागात असा कोणताही अधिकारी कार्यरत नाही. त्यामुळे सदर पर्यवेक्षणीय जबाबदारीसाठी शासनाच्या वित्त व लेखा सेवेतील वेतन बॅन्ड १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० या वेतनश्रेणीतील अधिका-यांच्या प्रतिनियुक्तीचे नियुक्तीसाठी एक पद निर्माण करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव- यास्तव संस्थानच्या रूग्णालये विभागात महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वेतनबॅन्ड १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० या वेतनश्रेणीतील एक पद प्रतीनियुक्तीद्वारे भरणेसाठी निर्माण करणेस मान्यता असावी.

मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.७१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलची आर्थिक उलाढाल मोठया प्रमाणात असुन भविष्यात कॅन्सर हॉस्पिटल, वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय सुरू करणे प्रस्तावित असल्याने या खर्चात मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे. या सर्व आर्थीक बाबींचा तसेच वाढणा-या जबाबदारीचा विचार करता आर्थीक बाबींवर नियंत्रण ठेवणेकरीता लेखाविषयक कार्यपध्दतीचे सखोल ज्ञान असणा-या अधिका-यांचे पर्यवेक्षण असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत रूग्णालये विभागात असा कोणताही अधिकारी कार्यरत नाही. उपरोक्त परिस्थितीचा विचार करता दोन्ही रुग्णालयाकडील आर्थिक बाबींच्या पर्यवेक्षणीय जबाबदारीसाठी शासनाच्या वित्त व लेखा सेवेतील वेतन बॅन्ड १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० या वेतनश्रेणीतील अधिका-यांच्या प्रतिनियुक्तीचे नियुक्तीसाठी एक पद निर्माण करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१७** **सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा यापुर्वी लाभ लागु केलेल्या कर्मचाऱ्यांचे गोपनीय अभिलेख्यांच्या प्रतवारीचे निकष दि. २३ डिसेंबर, २००२ चे शासन निर्णयानुसार पडताळणी करुन पुर्वलक्षी प्रभावाने कार्यवाही करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शासन निर्णय क्रमांक – वेतन ११९९/ प्र.क्र.२/९९/ सेवा -३ दि. २०/०७/२००१ अन्वये, राज्य शासकीय कर्मचा-यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागु करण्यात आलेली आहे. सदर निर्णयातील कलम २(५) मध्ये या योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय ठरविली असल्याने वरीष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता, पात्रता, जेष्ठता ,अर्हता परिक्षा, विभागीय परिक्षा या सर्व बाबीची पुर्तता करणे तसेच पदोन्नतीची कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक राहील. जेथे या शासन निर्णया सोबतच्या परिशिष्टातील वेतनश्रेणी मंजूर करण्यात येईल तेथे गोपनीय अहवालाच्या आधारे पात्रता तपासण्यात यावी. असे नमुद आहे. त्यानुसार केवळ पात्र तारखेच्या लगतच्या मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवालाची प्रतवारी विचारात घेऊन तत्कलीन मा. व्यवस्थापन समितीचे सभेत वेळोवेळी झालेल्या निर्णयानुसार संस्थान कर्मचा-यांना ही योजना लागु करण्यात आलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे नमुद,राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी कार्यान्वीत असलेली " सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" सुधारीत स्वरुपात यापुढें शासन निर्णय क्रमांक - वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दिनांक ०१एप्रील २०१० अन्वये, राज्य शासकीय कर्मचा-यांना "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" या नावाने दि. ०१ ऑक्टोबंर २००६ पासून लागू करण्यात आलेली आहे.

सुधारीत आश्वासित प्रगती योजना सन २०१३ पर्यंत संस्थान कर्मचा-यांना वेळोवेळी तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने प्रंसगी नियमात शिथीलता देऊन लागु करण्यात आलेली आहे. मा. व्यवस्थान समितीचे दि. १०.११.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४५१ अन्वये, अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवाविषयक प्रस्तावांवर कार्यकारी अधिकारी यांनी शासन निर्णय व सेवा नियमास अनुसरुन प्रशासकीय स्तरावर निर्णय घ्यावेत, असे ठरले. त्यानुसार कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने संस्थान कर्मचा-यांना सुधारीत आश्वासीत प्रगती योजना लागु करण्यात येत आहे.सन २०१६ पर्यंत सुधारीत सेवातंर्गत अश्वासीत प्रगती योजनेचा कर्मचा-यांना लाभ देताना गोपनीय अहवलाचे प्रतवारीची निश्चिती प्रचलीत मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात आलेली आहे.

मात्र सन २०१७ चा प्रस्ताव शासन निर्णय क्रंमाक – एस आरव्ही -२००२/ प्र.क्र.२०/०२/१२ दि. २३ डीसेंबर, २००२ निर्णयानुसार सादर करण्यात आलेला आहे.

शासन निर्णय क्रंमाक – एस आरव्ही -२००२/ प्र.क्र.२० /०२/१२ दि. २३ डीसेंबर, २००२ अन्वये , पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणीच्या झालेल्या पुनर्रचनेच्या अनुंषगाने, दि २२ सप्टेंबर १९९४ च्या शासन निर्णयानुसार विहित केलेले वेतनश्रेणीचे किमान टप्पे सुधारीत करण्याचे अनुषगांने पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीचा दि. ०१ जानेवारी १९९६ पासुन झालेल्या वेतनश्रेणीच्या पूर्नरचनेनंतर पदोन्नतीसाठी गोपनीय अहवालाच्या सरासरीचे सर्वसाधारण निकष आणि वेतनाचे टप्पे खालील प्रमाणे विहीत केलेले आहेत.

शासन सेवेतील गट- अ मधील पहिल्या टप्प्यापर्यंतच्या पदावरील पदोन्नती ही ‘ जेष्ठता अधिन पात्रता ’ या तत्वावर होत असल्याने या पदोन्नतीसाठी गोपनीय अहवालांच्या सरासरी प्रतवारीचा निकष 'ब ' (चांगला) असा निश्चित करणेत आलेला आहे.

१)     गट – अ मधील पहिल्या टप्यानंतरच्या सर्व पदोन्नत्या जेष्ठता अधिन निव्वळ गुणवत्ता (Strict Selection / गुणवत्ता व जेष्ठता (Strict Selection with due regard seniority) या तत्वावर करण्यात येत असल्याने त्यासाठी गोपनीय अहवालाच्या सरासरी प्रतवारीचे निकष खालील प्रमाणे राहतीलः-

अ)     गट – अ मधील ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान (Minimum) टप्पा रुपये १६,३९९ पर्यन्त आहे, त्या पदावरील पदोन्नतीसाठी ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी किमान " ब +" अशी असावी.

ब) गट – अ मधील ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान (Minimum) टप्पा रुपये १६, ४०० किंवा त्यापेक्षा अधिक आहे त्या पदावरील पदोन्नतीसाठी ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांची सरासरी प्रतवारी किमान अ अशी असावी.

क) मात्र ज्या पदांसाठी शासनाने स्वतंत्र आदेशान्वये गोपनीय अहवालाच्या सरासरीचे विविक्षीत निकष विहित केले असतील असे स्वतंत्र निकष ते वरील सर्वसाधारण निकषानुरुप नसलेतरी अमंलात राहतील.

सौ. कल्पना बोधक इतर ०२, परिसेविका श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी दि.२९/०३/२०१८ रोजी चे अर्जान्वये, त्यांची २४ वर्षाची नियमित सेवा ही सन २०१६ साली पुर्ण झालेली असुन सेवा आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ सन २०१६ पासुन देय असताना सन २०१७ पासुन देण्यात आला आहे. सबब विनंती की सदर आदेशात योग्य ती दुरुस्ती करुन सदरहु लाभ सन २०१६ पासुन देण्यात यावा, अशी विनंती केलेली आहे.

सन २०१६ अखेरचे प्रस्ताव प्रचलीत मार्गदर्शक तत्वानुसार गोपनीय अहवालाचे आवश्यक प्रतवारी नसल्याने अपात्र ठरलेल्या आहेत. मात्र सन २०१७ चे प्रस्ताव दि.२३ डीसेंबर,२००२ चे सुधारीत शासन निर्णयानुसार गोपनीय अहवालाच्या प्रतवारीची निश्चितीकरण्यात आली असल्याने दुस-या लाभासाठी त्या पात्र ठरलेल्या आहेत . सौ. बोधक व इतर ०२, परिसेविका श्री साईबाबा हॉस्पिटल यांना सन २०१७ पासुन दुसरा लाभ देण्यात आलेला आहे.

उपरोक्त कर्मचां-याना विनंती अर्ज पाहता सर्व कर्मचा-यांना समान न्याय मिळण्यासाठी शासन निर्णय क्रंमाक–एसआरव्ही-२००२/प्र.क्र.२०/०२/१२ दि.२३ डीसेंबर,२००२ नुसार रुग्णालयाकडील अपात्र प्रकरणाची छाननी केली असता खालील कर्मचा-यांना पहिला / दुसरा लाभ उशिराने दिलेल्या कर्मचा-यांना लाभासाठी पात्र / अपात्र ठरविल्याबाबतची वस्तुस्थिती खालील प्रमाणे.

| अ.क्र | कर्मचा-यांचेनाव व पदनाम | योजनेच्या लाभासाठी पात्र / अपात्र ठरविल्याबाबतची वस्तुस्थितीती |
|---|---|---|
| १. | श्रीमती कुलकर्णी मानिनी नंदकुमार, परिसेविका | पहिल्या लाभासाठीचा कालावधी दि.२७/११/२००५ रोजी पुर्ण होतो. तथापी लगतच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची निर्धारीत केलेली प्रतवारी पुर्ण होत नसल्याने (प्रतवारी B+ अशी होती) तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने नियमात शिथीलता आणून दि.०१/०३/२००९ पासुन पहिला लाभ देण्यात आला आहे |
| २. | श्रीमती गायकवाड कमल छबुराव, परिसेविका | पहिल्या लाभासाठीचा कालावधी दि .१६ / ०१ /२०१२ रोजी पुर्ण होतो. तथापी लगतच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची निर्धारीत केलेली प्रतवारी पुर्ण होत नसल्याने (प्रतवारी B+ अशी होती) लाभ देण्यात आलेला नाही. तथापी सन २०१७ चा प्रस्ताव दि.२३ डिंसेबर २००२ चे शासन निर्णयानुसार सादर करुन. करुन दि.१६ /०१/२०१७ रोजी लाभ लागु केलेला आहे. (सन २०१७ ची प्रतवारी B+). |
| ३. | श्रीमती सलगरकर निर्मला दिगंबर, परिसेविका | पहिल्या लाभासाठीचा कालावधी दि.२२/ ०२/२००५रोजीपुर्ण होतो. तथापी लगतच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची निर्धारीत केलेली प्रतवारी पुर्ण होत नसल्याने (प्रतवारी B अशी होती) तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने नियमात शिथीलता आणून दि.०१/०३/२००९ पासुन पहिला लाभ देण्यात आला आहे. |
| ४. | श्रीमती बारसे निशा मधुकर, परिसेविका | पहिल्या लाभासाठीचा कालावधी दि .०८ / ०१/२००४ रोजी पुर्ण होतो. तथापी लगतच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची निर्धारीत केलेली प्रतवारी पुर्ण होत नसल्याने (प्रतवारी B अशी होती) तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने नियमात शिथीलता आणून दि.०८/०१/२००६ रोजी लाभ |

| | | |
|---|---|---|
| | | देण्यात आलेला आहे. |
| ५. | श्रीमती मुसमाडे कल्पना रघूनाथ, परिसेविका | दुस-यां लाभासाठीचा कालावधी दि.१८/०५ /२०१३ रोजी पुर्ण होतो. तथापी लगतच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची निर्धारीत केलेली प्रतवारी पुर्ण होत नसल्याने (प्रतवारी B अशी होती) ) लाभ देण्यात आलेला नव्हता. सन २०१५ मध्ये आवाश्यक असलेली निर्धारीत केलेली गोपनीय अहलाची प्रतवारी A असल्याने दि.१८/०५/२०१५ रोजी लाभ लागु केलेला आहे. |
| ६. | श्रीमती देव पुजा सुनिल परिसेविका | दुस-या लाभासाठीचा कालवधी दि.०९/०१/२०१६रोजी पुर्ण होत होतो. तथापी लगतच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची निर्धारीत केलेली प्रतवारी पुर्ण होत नसल्याने (प्रतवारी B+ अशी होती) लाभ देण्यात आलेला नव्हता.तथापी सन २०१७चा प्रस्ताव दि.२३ डिंसेबर २००२ चे शासन निर्णयानुसार सादर करुन दि.०९/०१/२०१७ पासुन लाभ देण्यात आलेला आहे. (सन २०१७ ची प्रतवारी B+ अशी आहे ) |
| ७. | श्रीमती रोकडे आशा तुळशीराम, परिसेविका | दि.०१.०१.१९९३ ते०१.०१. १९९४ हा कालावधी निलंबन धरण्यात आलेला असल्याने,पहिल्या लाभासाठीचा कालावधी दि.११/०१/२००५ रोजी पुर्ण होतो. तथापी लगतच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची निर्धारीत केलेली प्रतवारी पुर्ण होत नसल्याने (प्रतवारी B अशी होती) ) लाभ देण्यात आलेला नव्हता तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने नियमात शिथीलता आणून दि.०१/०३/२००९ पासुन पहिला लाभ देण्यात आला आलेला आहे. |
| ८. | श्रीमती कांडेकर उषाक्राती दशरथ , परिसेविका | दुस-या लाभासाठीचा कालवधी दि.०१/०३/२०१६रोजी पुर्ण होत होतो. तथापी लगतच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची निर्धारीत केलेली प्रतवारी पुर्ण होत नसल्याने (प्रतवारी B+ अशी होती) लाभ देण्यात आलेला नव्हता.तथापी सन २०१७चा प्रस्ताव दि.२३ डिंसेबर २००२ चे शासन निर्णयानुसार सादर करुन दि.०१/०३/२०१७ पासुन लाभ देण्यात आलेला आहे . (सन २०१७ ची प्रतवारी B+ अशी आहे ) |
| ९. | श्रीमती बोधक कल्पना प्रकाश , परिसेविका | दुस-या लाभासाठीचा कालवधी दि.११/०१/२०१६रोजी पुर्ण होत होतो. तथापी लगतच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची निर्धारीत केलेली प्रतवारी पुर्ण होत नसल्याने (प्रतवारी B+ अशी होती) लाभ देण्यात आलेला नव्हता.तथापी सन २०१७ चा प्रस्ताव दि.२३ डिंसेबर २००२ चे शासन निर्णयानुसार सादर करुन दि.११/०१/२०१७ पासुन लाभ देण्यात आलेला आहे . (सन २०१७ ची प्रतवारी B+ अशी आहे ) |
| १०. | श्रीमती कदम कमल थॉमस, परिचारीका | पहिल्या लाभासाठीचा कालावधी दि.०१/०८/२०१२ रोजी पुर्ण होतो. तथापी लगतच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची निर्धारीत केलेली प्रतवारी पुर्ण होत नसल्याने (प्रतवारी B अशी होती) लाभ देण्यात आलेला नाही. निर्धारीत केलेली प्रतावारी सन २०१३ मध्ये (B+) असल्याने दि. ०१/०८/२०१३ पासुन पहिला लाभ देण्यात आलेला आहे . |
| ११. | श्रीमती कडू मंदाकीनी सिताराम, परिचारीका | पहिल्या लाभासाठीचा कालावधी दि.०९/१०/२०१२ रोजी पुर्ण होतो. तथापी लगतच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची निर्धारीत केलेली प्रतवारी पुर्ण होत नसल्याने (प्रतवारी B अशी होती) लाभ देण्यात आलेला नाही. निर्धारीत केलेली प्रतावारी सन २०१३ मध्ये (B+) असल्याने दि.०९/१०/२०१३ पासुन पहिला लाभ देण्यात आलेला आहे |
| १२. | श्री दाभाडे बळीराम बंडु, परिचारक | पहिल्या लाभासाठीचा कालावधी दि.१३/१०/२०१२ रोजी पुर्ण होतो. तथापी लगतच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची निर्धारीत केलेली प्रतवारी पुर्ण नसल्याने (प्रतवारी B अशी होती) लाभ देण्यात आलेला नाही. निर्धारीत केलेली पुर्ण होत प्रतावारी सन २०१३ मध्ये (B+) असल्याने दि.०१/०८/२०१३ पासुन पहिला लाभ देण्यात आलेला आहे . |

उपरोक्त कर्मचा-यांना पहिला/दुसरा लाभ उशिराने दिलेला आहे लाभ देय होत असलेल्या तारखेनुसारची माहिती खालील प्रमाणे (सदरची पदे – गट ब वर्गामध्ये येतात)

| अ.क्र. | कर्मचा-यांचेनाव व पदनाम | लाभ | लाभ देण्यात आलेली दिनांक | लाभ देय होत असलेली दिनांक | पाच वर्षाचे गोपनीय अहवालाच्या प्रतवारीची सरासरी |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्रीमती कुलकर्णी मानिनी नंदकुमार, परिसेविका | पहिला लाभ | ०१-०३-२००९ | २७-११-२००५ | B + |
| २. | श्रीमती गायकवाड कमल छबुराव, परिसेविका | पहिला लाभ | १६-०१-२०१७ | १६-०१-२०१२ | B + |
| ३. | श्रीमती सलगरकर निर्मला दिगंबर परिसेविका | पहिला लाभ | ०१-०३-२००९ | २२-०२-२००५ | B |
| ४. | श्रीमती बारसे निशा मधुकर, परिसेविका | पहिला लाभ | ०८-०१-२००६ | ०८-०१-२००४ | B |
| ५. | श्रीमती मुसमाडे कल्पना रघूनाथ , परिसेविका | दुसरा लाभ | १८-०५-२०१५ | १८-०५-२०१३ | B |
| ६. | श्रीमती देव पुजा सुनिल परिसेविका | दुसरा लाभ | ०९-०१-२०१७ | ०९-०१-२०१६ | B + |
| ७. | श्रीमती रोकडे आशा तुळशीराम, परिसेविका | पहिला लाभ | ०१-०३-२००९ | ११-०१-२००५ | B |
| ८. | श्रीमती कांडेकर उषाक्राती दशरथ, परिसेविका | दुसरा लाभ | ०१-०३-२०१७ | ०१-०३-२०१६ | B + |
| ९. | श्रीमती बोधक कल्पना प्रकाश , परिसेविका | दुसरा लाभ | ११-०१-२०१७ | ११-०१-२०१६ | B + |
| १०. | श्रीमती कदम कमल थॉमस परिचारीका | पहिला लाभ | ०१-०८-२०१३ | ०१-०८-२०१२ | B |
| ११. | श्रीमती कडू मंदाकीनी सिताराम , परिचारीका | पहिला लाभ | ०९-१०-२०१३ | ०९-१०-२०१२ | B |
| १२. | श्री दाभाडे बळीराम बंडु परिचारक | पहिला लाभ | ०१-०८-२०१३ | १३-१०-२०१२ | B |

तरी, सेवा आश्वासित प्रगती योजनेचे लाभास यापुर्वी अपात्र झाल्याने उशीरा लाभ मिळालेल्या रुग्णालयाकडील उपरोक्त १२ कर्मचा-यांची वरील नमुद दि. २३ डिसेंबर २००२ चे शासन निर्णयानुसार त्यांचे पात्र तारखेच्या लगतच्या मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवालाचे पडताळणी केली असता त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या तारखेपासुन सेवा आश्वासित प्रगती योजनेचा पहिला व दुसरा लाभ देय होईल .

तरी शासन निर्णय दि. २३ डिसेंबर २००२ नुसार उपरोक्त १२ कर्मचा-यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या तारखेपासुन सेवा आश्वासित प्रगती योजनेचा पहिला व दुसरा लाभ देण्यास व त्यांची पुर्वलक्षी प्रभावाने कार्यवाही करणेस निर्णय होणेकामी सादर.

निर्णय क्र.७१३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२३ डिसेंबर २००२ रोजीचे शासन निर्णयानुसार प्रस्तावात नमुद १२ कर्मचा-यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या तारखेपासुन सेवा आश्वासित प्रगती योजनेचा पहिला व दुसरा लाभ देण्यास व त्यांची पुर्वलक्षी प्रभावाने कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **श्री राजेंद्र सोपानराव जगताप, (विद्युत पर्यवेक्षक), प्र. पाणी पुरवठा विभाग प्रमुख (अतिरीक्त कार्यभार प्र. अधिक्षक, मंदिर विभाग) यांचे विरोधात शिर्डी पोलिस स्टेशनला दाखल झालेला प्रथम माहिती अहवाल व निवेदनांबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) **विषयाची पूर्वपीठीका -**

०१. सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्रमांक एसएसएस / साप्रशा / आस्था / ३२५५ /२०१५, दिनांक ०१ डिसेंबर, २०१५ अन्वये श्री. राजेंद्र सोपानराव जगताप, विद्युत पर्यवेक्षक (प्र. पाणीपुरवठा विभागप्रमुख) यांचेकडेस प्र. अधिक्षक, मंदिर विभाग या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविणेत आलेला होता. या आदेशानुसार श्री. राजेंद्र सोपानराव जगताप यांनी प्र. अधिक्षक, मंदिर विभाग (अतिरिक्त कार्यभार) या पदाचा कार्यभार दिनांक ०१ डिसेंबर, २०१५ रोजी स्वीकारुन, मंदिर विभागाकडील दैनंदिन कामकाज, नियोजन व नियंत्रणाचे कामकाज पहात होते.

०२. पोलिस निरीक्षक, शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी यांनी जा.क्र. ४१९५/२०१८, १६ नोव्हेंबर, २०१८ अन्वये खालीलप्रमाणे कळविलेले आहे-

".. .. .. वरील विषयान्वये (दाखल गुन्हेच्या माहितीबाबत) सविनय सादर की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी चे आस्थापनेत कार्यरत असणारे राजेंद्र सोपान जगताप, रा. जोशी हॉस्पीटल, शिर्डी ता. राहाता हे समाधी मंदिर प्रमख म्हणून कार्यरत असल्याचे समजते. राजेंद्र सोपान जगताप यांचे विरुध्दात फीर्यादी सौ. सुनिता राजेंद्र वाबळे रा. राहाता यांनी शिर्डी पोलिस स्टेशनला दिलेल्या तक्रारीवरुन दि. १५/११/२०१८ रोजी गु र न २४९/२०१८ भादंवि कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे दाखल करण्यात आला असून सदरील गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे.

वरील व्यक्ती ही श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथील आस्थापनेवर कार्यरत असल्याने दाखल गुन्हयाची उपरोक्त माहिती योग्य ती कार्यवाही करीता सविनय सादर. "

तसेच, पोलिस निरीक्षक, शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी यांनी त्यांचे उपरोक्त दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ रोजीचे पत्रासोबत एफआयआर क्रमांक ०५०३ दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ रोजीचा प्रथम माहिती रिपोर्ट या संगणकीय अहवालाची छायांकित प्रत जोडलेली आहे. या एफआयआरमध्ये भारतीय दंड विधान, १८६० अन्वये कलम ३५४, ३२३, ५०४ व ५०६ अन्वये तक्रारदार / माहिती देणार सुमनताई राजेंद्र वाबळे, राहाता यांनी श्री. राजु जगताप, शिर्डी, ता. राहाता, जि. अहमदनगर यांचे विरुध्द तक्रार करणेत आली असल्याचे नमुद केलेले आहे.

०३. सौ. सुमन राजेंद्र वाबळे, अध्यक्षा, राहाता तालुका महिला कॉंग्रेस, राहाता यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारीयांना दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८रोजी अग्रेषित केलेल्या पत्रात (नोटीशीत) खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे –

*"…. दिनांक १५/११/२०१८ रोजी मंदिर प्रमुख राजु जगताप याने माझे व माझी जाव जयश्री वाबळे हिचे हात धरुन ओढून गाभा-याचे बाहेर नेले. शिवीगाळ केली. मारण्याची धमकी दिली. म्हणून त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. राजु जगतापला अटक करुन त्याचेवर त्वरीत कार्यवाही व्हावी व राजु जगताप याला मंदीर प्रमुख पदावरुन हटवावे. त्याचे निलंबन करुन कार्यवाही करावी. अन्यथा दि. २६/११/२०१८ पासुन आम्ही सर्व महिला साईबाबा मंदीरासमोर आमरण उपोषणाला बसणार आहोत. त्यासाठी ही नोटीस देत आहोत."*

०४. सौ. सुमन राजेंद्र वाबळे व इतर सर्वपक्षीय नागरीक यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित करणेत आलेल्या दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ रोजीचे निवेदनात खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे -

"…. (मंदिर प्रमुख राजु जगताप यांचे निलंबन करुन कार्यवाही करणेबाबत उपोषणाची नोटीस) विषयान्वये आम्ही खालील सह्या करणारे नागरीक आपणांस कळवू इच्छितो की, दि. १५/११/२०१८ रोजी मंदीर प्रमुख राजु जगताप याने महिला भाविकांचे हात धरुन ओढून गाभा-याचे बाहेर नेले. शिवीगाळ केली. मारण्याची धमकी दिली म्हणून त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. राजु जगतापला अटक करुन त्याचेवर त्वरीत कार्यवाही व्हावी व राजु जगताप याला मंदीर प्रमुख पदावरुन हटवावे. त्याचे निलंबन करुन कार्यवाही करावी. अन्यथा दि. २६/११/२०१८ पासुन आम्ही सर्व श्री साईबाबा मंदिरासमोर आमरण उपोषणाला बसणार आहोत. त्यासाठी ही नोटीस देत आहोत."

०५. समस्त शिर्डी ग्रामस्थ यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित केलेल्या दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ रोजीचे निवेदनात खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे –

"…. (मंदिर प्रमुख राजेंद्र जगताप यांची त्वरीत कायमस्वरुपी बदली आणि निलंबन करणेबाबत) विषयांन्वये समस्त शिर्डी ग्रामस्थांतर्फे निवेदन की, गुरुवार दि. १५/११/२०१८ या दिवशी मंदिरप्रमुख राजेंद्र जगताप या अधिका-याने बाबांच्या पालखीच्या वेळी गावातील व तेथे उपस्थित महिलांसोबत गैरवर्तणूक करत, त्या महिलांना अश्लिल भाषेत शिवीगाळ केली. सदर घटनेची फीर्याद शिर्डी पोलिस स्टेशन मध्ये दाखल झालेली आहे. तसेच सदर राजू जगताप (मंदिरप्रमुख) या पदावर असतानाही अनेक फौजदारी केसेस दाखल झालेले आहेत. सदर व्यक्ती हा पुर्णपणे गुन्हेगार व्यक्तीचाअसून तो मंदिरप्रमुख या मुख्य पदावर राहणे उचित नाही त्यांना राजेंद्र जगताप यांना त्वरीत बडतर्फ करण्यात यावे. या निवेदनाव्दारे समस्त शिर्डी गावक-यांचे विनंती की,

१. सदर मंदिर प्रमुख राजेंद्र जगताप यांना त्वरीत मंदीर प्रमुख पदावरुन बडतर्फ करण्यात यावे, त्यांचे त्वरीत निलंबन करण्यात यावे

२. सदर व्यक्तीच्या गैरवर्तणूकीची, मनमानी कारभार याची सखोल चौकशी करण्यात यावी व संस्थान प्रशासनाकडून कठोरात कठोर कारवाई व्हावी.

साईंच्या पवित्र दरबारात अश्या कोणताही अधिकारी मुख्य पदावर राहता कामा नये.

समस्त शिर्डी ग्रामस्थांतर्फे या निवेदनाव्दारे वरील प्रमुख मागण्या आहेत. या मान्य व्हावेत ही विनंती नाहीत समस्त शिर्डी आणि पंचक्रोशीतील महिलांसोबत गावकरी गेट साई संस्थान येथे ठिय्या जनआंदोलन करण्यात येईल व होणा-या परिणामास साई संस्थानप्रशासन पूर्णपणे जबाबदार राहील."

०६. सद्यःस्थितीत,उपरोक्त अ. नं. ०२ ते ०५ मध्ये नमुद केलेल्या घटना तसेच भक्त, ग्रामस्थ यांचा दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी घडलेल्या घटनेबाबतचा रोष व जनभावना लक्षात घेऊन, समाधी मंदिर व परिसरात कुठल्याही प्रकारची अप्रिय घटना घडू नये या प्रशासकीय कारणास्तव श्री. राजेंद्र सोपानराव जगताप प्र. पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचेकडील प्र. अधिक्षक, मंदिर विभाग हा अतिरिक्त कार्यभार दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ रोजीचे आदेशानेकाढून घेणेत आलेला आहे.

**(ब)** पोलिस निरीक्षक, अहमदनगर यांचेकडील दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ रोजीचे पत्रासोबत जोडलेल्या प्रथम माहिती अहवालात, श्री साईबाबा मंदीर गाभारा, शिर्डी, राहाता येथे श्री. राजु जगताप, शिर्डी यांचेकडून दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी रात्रौ ८.३० वाजता घडलेल्या घटनेचा भारतीय दंडविधान कायदा, १८६० तील कलम ३५४, ३२३, ५०४ व ५०६ अन्वये, गुन्हा क्रमांक आय-२४९/२०१८ दाखल करणेत आला असलेबाबत कळविणेत आलेले आहे.

**परिच्छेद अ** मधील अ.नं. ०२ ते ०५ मध्ये नमुद केलेप्रमाणे, श्री. राजेंद्र सोपानराव जगताप, विद्युत पर्यवेक्षक (प्र.पाणी पुरवठा विभागप्रमुख) यांचेकडून प्र. अधिक्षक, मंदिर विभाग म्हणून कार्यरत असतांना, श्री साईबाबा समाधी मंदिर गाभा-यात दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी गैरवर्तन केलेबाबतचे तक्रार अर्ज प्रशासनास प्राप्त झालेले आहेत.

**(क)** पोलिस निरीक्षक,शिर्डी यांनी श्री. राजेंद्र सोपानराव जगताप यांचे विरुध्द वैयक्तिक दाखल करणेत आलेल्या प्रथम माहिती अहवालात भारतीय दंडविधान कायदा, १८६० अन्वये कलम ३२३, ३५४, ५०४ व ५०६ यांचा उल्लेख केलेला आहे.

**(ड)** श्री. राजेंद्र सोपानराव जगताप, विद्युत पर्यवेक्षक (सध्या प्र. पाणीपुरवठा विभाग प्रमुख) यांनी प्र. अधिक्षक, मंदिर विभाग या पदावर कार्यरत असतांना, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी रात्रौ ८.३० वाजेचे दरम्यान श्री साईबाबा समाधी मंदिर गाभा-यात केलेल्या गैरवर्तनास अनुसरुन व त्याकामी त्यांचेविरुध्द दाखल करणेत आलेल्या वैयक्तिक गुन्हयाचे स्वरुप व व्याप्ती याचा पोलिस यंत्रणेमार्फत अद्याप तपास सुरु आहे.

उपरोक्त **परिच्छेद अ, ब** व **क** मध्ये नमुद केलेल्या बाबी व विवेचनास अनुसरुन, श्री. राजेंद्र सोपानराव जगताप, विद्युत पर्यवेक्षक (प्र. पाणीपुरवठा विभागप्रमुख) यांचेकडून दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ पासून मंदिर विभागाचा कार्यभार काढून घेणेत आलेला आहे. उपरोक्तप्रमाणे वस्तुःस्थिती मा. व्यवस्थापन समितीचे अवलोकनार्थ व मार्गदर्शन/निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. राजेंद्र सोपानराव जगताप, विद्युत पर्यवेक्षक (प्र.पाणीपुरवठा विभागप्रमुख) यांचेकडून दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ पासून मंदिर विभागाचा कार्यभार काढून घेणेत आलेला आहे. त्यांचेवर दाखल करण्यात आलेल्या गुन्हयाचा तपास शिर्डी पोलीस स्टेशनमार्फत चालू असुन सदर गुन्हयाचा निकाल संस्थानला प्राप्त झाल्यानंतर तो व्यवस्थापन समितीचे सभेसमोर ठेवण्यात यावा व त्यानंतर प्रस्तुत प्रकरणी पुढील निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच श्रींचे मंदिरात व व्दारकामाई येथे दर्शनासाठी, आरतीचे वेळी, पालखी मिरवणूकीसाठी तसेच संस्थानचे उत्सवाचे कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थित असणाऱ्या स्थानिक ग्रामस्थ व साईभक्तांसाठी नियमावली तयार करुन मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेमध्ये मान्यतेसाठी सादर करावी, असे ठरले. तसेच पुढील पालखीचे दरम्यान होणाऱ्या गर्दीचे वेळी सुरक्षाव्यवस्था चोख ठेऊन कोणताही अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी.**

**(कार्यवाही-प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग/संरक्षण विभागप्रमुख/मंदिर विभागप्रमुख/ प्र.विधी अधिकारी,विधी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१९८,१९९,२०० व २०१ मधील जागेत साईनॉलेज पार्क प्रकल्प 'Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)' तत्वावर राबविणेकामी RFP (Request for Proposal) मागविणे प्रस्तावास मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :-

अ) कलम १७(समितीची कर्तव्ये व अधिकार)पोटकलम- (२) खंड (ठ)- समिती श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील;

ब) कलम २१ (समितीकडून विश्वस्त निधीचा विनियोग) -

१ पोटकलम(१) खंड(ङ) - श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे;

२ पोटकलम(१)खंड(झ)-विश्वस्तव्यवस्थेच्यामालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे;

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :

१ दिनांक ०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२२. –" साईसृष्टी, प्लॅनेटोरियम व वॅक्स म्युझियम (Sai Knowledge Park) प्रकल्पासाठी सल्लागार संदीप शिक्रे ॲन्ड असोशिएट्स, मुंबई यांचे प्रतिनीधीनी आजचे सभेत सदरहु प्रकल्पाचे सादरीकरण केले. यावर चर्चा होवून असे ठरले की, सल्लागार संदीप शिक्रे ॲन्ड असोशिएट्स, मुंबई यांनी शिर्डी येथे येवून, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसमोर सदर प्रकल्पाचे सविस्तर सादरीकरण करावे व त्यानंतर या प्रकल्पासाठी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेबाबत पुढील कार्यवाही करणेत यावी."

२ दिनांक ०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७१. - सदहु प्रकल्पास येणारे अंदाजे रु.१४१.०० कोटीचे कामास शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस तसेच शासन मान्यतेनंतर "Design, Build, Finance, Operation & Transfer (DBFOT)" तत्वावर ई-निविदा मागविणेबाबतचे प्रस्तावावर *"...सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली."*

दिनांक ०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५६. - "..यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं. १९८, १९९, २०० व २०१ मधील जागेत साई नॉलेज पार्क प्रकल्प "Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)" तत्वावर राबविणेकामी एकुण रक्कम रु.१६६.३९ कोटी इतके सुधारीत प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात आली. व सदरचा प्रकल्प अहवाल मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा, असे ठरले."

दिनांक ०१/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६४७.-" साई नॉलेज पार्क प्रकल्प 'Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)'तत्वावर राबविणेकामीच्या प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांचे प्रतिनिधी आजचे सभेपुढे उपस्थित होते. सदस्यांनी सदरच्या प्रकल्पासंदर्भात विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देता आली नाही. तरी साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांना चर्चेसाठी व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविण्यात यावे, असे ठरले."

शासन मान्यता:- महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, निर्णय क्र. सासवि-१०१८/१०४७/प्र.क्र.११२/का. १६ दि. १६/१०/२०१८ अन्वये मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१९८,१९९, २०० व २०१ मधिल जागेत साई नॉलेज पार्क DBFOT तत्वावर राबविणेस मान्यता देण्यात आली आहे.

प्रस्तावना:- मौजे निमगांव को-हाळे येथील उपरोक्त जागेतील प्रस्तावित साई नॉलेज पार्क प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांना इकडील दि. ०९/१०/२०१७ अन्वये नेमणूकपत्र देण्यात आले आहे. सल्लागार यांनी दि.०९/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रकल्पाचा रु.१६६.३९ कोटी मात्र रकमेचा DPR सादर केला आहे. त्यास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५६ अन्वये मान्यता देणेत आली आहे. सदर मान्यतेनुसार साई नॉलज पार्क प्रकल्प "Design, Build, Finance, Operate& Transfer (DBFOT)" तत्वावर राबविणेकामी शासन मान्यता मिळणेसाठी दि.११/०६/२०१८ अन्वये सादर केलल्या प्रस्तावास वर नमुद दि. १६/१०/२०१८ रोजीचे शासन आदेशान्वये मान्यता मिळालेली आहे. या प्रकल्पासाठी सल्लागार संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांनी सादर केलेला e-RFP Document चा मसुदा मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष व मा. सदस्यांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आला आहे.

विभागाचा अभिप्राय:- दि.०१/११/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील उपरोक्त निर्णय क्र.६४७ अन्वये ठरलेनुसार साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे, मुंबई यांना आजचे सभेपुढे बोलाविण्यात आले आहे. तरी सदरहू प्रकल्पासाठी "Design, Build, Finance, Operate& Transfer (DBFOT)" तत्वावरील Request for Proposal चा मसुदा सल्लागार यांचेशी चर्चा करुन अंतिम करता येईल असे मत आहे.

प्रस्ताव:- तरी मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१९८,१९९, २०० व २०१ मधिल जागेत साई नॉलेज पार्क प्रकल्प "Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)" तत्वावर राबविणेकामी सल्लागार यांनी सादर केलेल्या RFP (Request for Proposal) मसुद्याचे अवलोकन होवून निविदाकारांच्या पुर्वपात्रतेचे निकष व इतर अटी व शर्ती निश्चित करून त्यानुसार e-RFP मसुद्यास अंतिम स्वरुप देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.७१५ **साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे ॲंड असोशिएट्स, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री. प्रसाद सावंत व श्री. सागर रांगणेकर यांनी आजचे सभेपुढे सदरहू प्रकल्पासाठी "Design, Build, Finance, Operate& Transfer (DBFOT)" तत्वावरील Request for Proposal च्या मसुद्याचे सादरीकरण केले. यावेळी खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या.**

1. **सदरचा ई-प्रस्ताव DBFOT तत्वावरील असल्याने प्रकल्पाचे किंमतीत सल्लागार फी, कॉटिन्जन्सीज, WCE व २ वर्षातील भाववाढ इत्यादी बाबी समाविष्ट न करता प्रकल्पाची निव्वळ किंमत रु.१३५.०० कोटी गृहीत धरणेत यावी.**
2. **संस्थानला प्रती दिवस ३०० तिकीटे विनामुल्य देण्यात यावे.**
3. **e-RFP फी व bid security चे पेमेंट online करणेबाबत e-RFP मध्ये नमूद करावे.**
4. **तिकिटाचे दर खालीलप्रमाणे असावेत.**
   - **फक्त साईसृष्टी साठी रु.१५०/ प्रती व्यक्ती**
   - **सायन्स प्लॅनेटोरियम व वॅक्स म्युझियमसाठी एकत्रित रु.२०० / प्रती व्यक्ती**
   - **सर्व समावेशक एकत्रित रु.२५०/ प्रती व्यक्ती**
   - **शैक्षणिक सहली व १२ वर्षाखालील मुलांसाठी ५०% सुट असावी.**
5. **निविदा सादरकर्त्याचे पुर्वपात्रतेचे निकषामध्ये खालील अटींचा समावेश करावा.**
   - Experience of having successfully completed similar works during last 10 years ending 31st March, 2017 should be either of the following.

a) One similar completed work costing not less than the amount equal to Rs. 85 crores.

b) Or two similar completed works each costing not less than the amount equal to Rs.71 crores.

c) Or three similar completed works each costing not less than the amount equal to Rs.57 crores.

- Bidder should have average annual financial turnover of value not less than Rs.85 Crores.
- Bidder should have a solvency of value not less than Rs.71 Crores. The bidder will be required to submit the bank certificate.

6. Mandatory Consession fee रु.1.00 कोटी करावी.

**यावर सविस्तर चर्चा होवून, वरील बाबींचा व आवश्यक अटीशर्तींचा समावेश करून जाहिरात व ई-निविदांच्या सुधारीत प्रस्तावाच्या मसुदयाचे सल्लागार यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादरीकरण करावे. व त्यानंतर सदरचा मसुदा मान्यतेसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **शिर्डी शहरातील १८ शाळांना अंदाजे रक्कम रु.५४ लक्ष खर्चाच्या डिजिटल क्लास व सीसीटीव्ही उपलब्ध करुन देणेच्या प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** फोरम शिर्डी यांनी मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना पत्र पाठवून शिर्डी शहरातील शाळांना डिजिटल क्लास व सीसीटीव्ही कॅमेरे उपलब्ध करून देणेबाबत विनंती केली आहे.

सदर पत्रात त्यांनी शिर्डी शहरात आज रोजी जवळजवळ १६ विद्यालयात ११५०० पेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना ज्ञानदान करतांना अधुनिक सुविधा म्हणून डिजिटल क्लास होणे गरजेचे वाटते परंतु बहुतांश शाळांत ते उपलब्ध नाहीत ते संस्थानच्या मदतीतून प्रत्येक शाळास मिळाल्यास शिर्डी शहरातील सर्वच शाळांची गुणवत्ता व दर्जा सुधारण्यास मदत होईल.

त्याचप्रमाणे मुलामुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून प्रत्येक शाळेच्या प्रवेशद्वार व परिसरामध्ये सीसी टीव्ही मिळाल्यास टार्गट मुलांचा होणारा त्रास पोलिसांच्या मदतीने कमी होऊ शकेल. हा विषय शिर्डी शहरातील विद्यार्थ्यीनींच्या दृष्टीने महत्वाचा आहे.

तरी शिर्डी शहरातील सर्व शाळांना समानतेच्या तत्वाने डिजिटल क्लास व सीसीटीव्ही मिळणेबाबत विनंती केली आहे.

तसेच त्यांनी दि. १९.११.२०१८ रोजी शिर्डी शहरातील शाळांची संख्या व अंदाजीत रक्कम बाबत तपशील सादर केला आहे.

| अ.न. | शाळेचे नाव | डिजीटल क्लास साठी लागणारी अंदाजे रक्कम (अ) | सीसीटीव्ही अंदाजे रक्कम (ब) |
|---|---|---|---|
| १ | आदर्श प्राथिमिक विद्या मंदीर | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| २ | आदर्श इंग्लीश मेडीयम स्कूल | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| ३ | आदर्श माध्यमिक विद्यालय | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| ४ | साईनिर्माण इंग्लीश मेडीयम स्कूल | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| ५ | साई गुरूकुल इंग्लीश मेडीयम स्कूल | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| ६ | श्री साईबाबा इंग्लीश मेडीयम स्कूल | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| ७ | श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| ८ | श्री साईबाबा ज्युनिअर कॉलेज | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| ९ | श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| १० | अ. ए. सो. प्राथ. शाळा | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| ११ | सिल्वर ओक अकॅडमी | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| १२ | जि. प. शाळा शिर्डी (मराठी) | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | जि. प. शाळा मोठेबाबा | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| १४ | जि. प. शाळा बिरेगाव | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| १५ | जि. प. शाळा शिर्डी (उर्दु) | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| १६ | इकरा उर्दु प्राथमिक | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| १७ | उर्दु हायस्कूल शिर्डी | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| १८ | साई श्रद्धा मुकबधीर विद्यालय | रु. २,००,०००/- | १,००,०००/- |
| | एकूण | **रु. ३६,००,०००/-** | **१८,००,०००/-** |
| | | **एकूण अ + ब** | **५४,००,०००/-** |

विभागाचा अभिप्राय:- प्रस्तावातील शाळांच्या यादीत खाजगी शाळा, जिल्हा परिषद शाळा, संस्थानच्या शाळांचा समावेश आहे. या शाळांना डिजिटल क्लास व सीसीटीव्ही साठी अनुदान देणेबाबत मा. व्यवस्थापन समितीने मान्यता दिल्यास छाननी समितीचे शिफारसीने विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेऊन अनुदान अदायगीची कार्यवाही करता येईल.

प्रस्ताव:- शिर्डी शहरातील १८ शाळांना अंदाजे रक्कम रु. ५४ लक्ष खर्चाच्या डिजिटल क्लास व सीसीटीव्ही उपलब्धे करून देणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७१६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०४ **श्री विरभद्र मंदिर शिर्डी (बिरोबा बन) येथील श्री विरभद्र यात्रेतील कुस्त्याकरीता रु. १,२५,०००/- रक्कम देणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयी संदर्भीय अर्जान्वये श्री. हरीभाऊ हेमाजी बनकर व समस्त भक्त मंडळ,शिर्डी (बिरेगांव बन) यांनी, "सालाबादप्रमाणे बिरोबा बन, शिर्डी येथील ग्रामदैवत श्री विरभद्र महाराजयात्रेच्या निमित्ताने दि.०४/११/२०१७ रोजीचे कुस्ती हगाम्यासाठी पहिलवानांना बिदागी देणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फेरु.१,२५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पंचवीस हजार) मात्र मंजुर करणेत आलेले होते. त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत.

त्याचप्रमाणे दि.२१.११.२०१८ ते दि. २३.११.२०१८ अखेर या कालावधीत श्री विरभद्र महाराज बिरेगाव बन, शिर्डी येथे यात्रा साजरी करणेत येणार आहे. दि.२३.११.२०१८ रोजी कुस्ती हगामा आयोजित करणेत आलेला आहे.

तरी याही वर्षी दि. २३.११.२०१८ रोजी आयोजित कुस्ती हगाम्यातील पहिलवानांना बिदागी देणेकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडुनरु.१,२५०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पंचवीस हजार) मिळणेस विनंती." असे कळविले आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७.११.२००४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.११९ नुसार एक विशेष बाब म्हणून श्रीविरभद्रमहाराजयात्रा बिरेगांवबन, शिर्डी यांना दि.२६.११.२००४ रोजी होणा-या कुस्त्यांच्या हगाम्यासाठी रु.२५०००/- रक्कम श्री.रामनवमी उत्सवाप्रमाणे संस्थान प्रतिनिधी नेमून देण्यात यावी, असे ठरले होते. त्याप्रमाणे त्यांना रक्कम देणेत आली होती. तसेच त्यानंतरही दरवर्षी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार रक्कम मंजूर करुन वाटणेत आलेली आहे.

श्री विरभद्र महाराज यात्रा, बिरेगांव बन, शिर्डी यांना सन २०१३ ते सन २०१७ पर्यंत दिलेल्या रक्कमेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | सभेची तारीख व निर्णय क्र. | मंजुर रक्कम | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| १ | दि.२७/१०/२०१३,निर्णय क्र.८७२ | ७५,०००-०० | ७०,२७०-०० |
| २ | दि.०६/११/२०१४,निर्णय क्र.९३७ | ७५,०००-०० | ६८,४९०-०० |
| ३ | दि.२७/१०/२०१५,निर्णय क्र.४२७ | ७५,०००-०० | ७२,६९०-०० |
| ४ | दि.०७/११/२०१६,निर्णय क्र.८४४(२५) | १,२५,०००-०० | १,००,०३०-०० |
| ५ | दि.०४/११/२०१७,निर्णय क्र.८९७ | १,२५,०००-०० | १,०६,०२०-०० |

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३.१०.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८९७ नुसार मागील वर्षी सदर कामी रु.१,२५,०००/-मात्रची रक्कमसंस्थानमार्फत देण्यात यावी असे ठरले होते. त्यापैकी रु.१,०६,०२०/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख सहा हजार वीस) इतकी रक्कम बिदागी म्हणून वाटली असून उर्वरीत रक्कम लेखाशाखेत जमा-नांवे करण्यात आलेली होती.

श्री.विरभद्र यात्रा कमिटी, बिरेगांव बन, शिर्डी यांनी यात्रेनिमित्ताने कुस्ती हगामासाठी रु. १,२५,०००/- ची मागणी केलेली आहे. सदरची रक्कम ही मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन, दरवर्षीप्रमाणे संस्थानचा प्रतिनिधी (लेखाशाखेतील कर्मचारी) नियुक्त करुन विजयी पहिलवानांना बिदागी म्हणून अदा करता येईल.

प्रस्ताव- तरी श्री विरभद्र यात्रेनिमित्त श्री.विरभद्र यात्रा कमिटी, बिरेगांव बन, शिर्डी यांचे मागणीनुसार कुस्ती हगाम्यासाठी रु.१,२५,०००/- (अक्षरी- रुपये एक लाख पंचवीस हजार) मात्र इतकी रक्कम श्री रामनवमी उत्सव प्रथेप्रमाणे संस्थानचे प्रतिनिधी (लेखाशाखेतील कर्मचारी) नियुक्त करुन पहिलवानांना बिदागी म्हणून खर्च करणेस व उर्वरीत रक्कम लेखाशाखेत जमा करणेस निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

**निर्णय क्र.७१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री विरभद्र यात्रेनिमित्त श्री विरभद्र यात्रा कमिटी, बिरेगांव बन, शिर्डी यांचे मागणीनुसार कुस्ती हगाम्यासाठी रक्कम रु.१,२५,०००/- मात्र इतकी रक्कम देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदरची रक्कम पहिलवानांना बिदागी म्हणून आदा करणेकामी संस्थानचे प्रतिनिधी (लेखाशाखेतील कर्मचारी) नियुक्त करणेत यावा. बिदागी रक्कम आदा केलेनंतर उर्वरीत रक्कम संस्थानचे लेखाशाखेत जमा करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- शताब्दी कक्षप्रमुख, मुख्यलेखाधिकारी)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.०५** **मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१७२ मधील साईधर्मशाळा परिसरात साईभक्तांचे सोयीसाठी टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणेस व त्यासाठी येणारे रक्कम रु.१,३८,६९,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूदः-

अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्स्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम कलम २१ (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

प्रस्तावनाः- मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं.१७२ मधील श्री साईधर्मशाळा परिसरात गर्दीचे वेळी साईभक्तांचे सोयीसाठी तसेच मोठया कार्यक्रमासाठी वेळोवेळी आवश्यक्तेनुसार पार्किंगच्या ठिकाणी मंडप टाकण्यात येतो. याकरीता सदरहू ठिकाणी टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणेसाठी प्रस्ताव सादर करणे बाबत दि.०१/११/२०१८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सुचना देण्यात आली आहे. सदरहू जागेत २७४ फुट लांब व ८२फुट रुंद (२०८९ चौ.मि., २२४७८चौ.फुट) इतक्या मोजमापाचे टेन्साईल फॅब्रीक शेड उभारता येईल. साईआश्रम येथे टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणे कामासाठीचे कार्यादेशातील दरात १०% वाढ गृहीतधरून विषयांकित कामासाठी अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. त्यानुसार सदरहूकामी खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| S. No | Item | Qty. | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1) | Design, supply, structural calculations, fabrication and erection (vertical column, horizontal ring beam, main steel Arch. inclined Arch. etc.) tensile structure roof with fabric (Serg Ferrari, Mehler Valmex) with white colour / translucent tensile polyester fabric of 900 Gsm both side coated with PVDF coating lacquer system on both sides, titaniumdioxide front side primer, low-wick, protected against microbal and fungai attack, UV-protected top coat of membrane type - 2 grade of required colour and shape and deign including necessary M. S. tensile steel structure of hollow section, gusset plates, trusses, pipes, base plates, bolts nuts, screws etc. complete. | 2272.56 | Sqm | 5,243.68 | 1,19,16,577.42 |
| 2) | RCC IN FOUNDATIONS, SUB-STRUCTURE, PEDESTAL:<br>(Including Reinforcement Steel, RCC M25 Concrete, Form Work / Shuttering, Excavation, PCC etc. complete). Excavation in all types of soils, including existing PCC, Tiling, Rubble soling, etc. complete. | 36.00 | Nos. | 16,500.00 | 5,94,000.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3) | Providing and Erecting Box type Welcome Arch / Gate (Size : 20 Ft. Wide and 20 Ft. Height) including Designing, supplying, structural calculations, fabrication and erection (vertical box type columns, horizontal beam / main steel Arch. inclined Arch. at top etc.) tensile structure with fabric (Serg Ferrari, Mehler Valmex) with white colour / translucent tensile polyester fabric of 900 Gsm both side coated with PVDF coating lacquer system on both sides, titanium dioxide front side primer, low-wick, protected against microbal and fungai attack, UV-protected top coat of membrane type - 2 grade of required colour and shape and deign including necessary M. S. tensile steel structure of hollow section, gusset plates, trusses, pipes, base plates, bolts nuts, screws etc. complete. | 3.00 | Nos. | 2,75,000.00 | 8,25,000.00 |
| | Total Rs.: | | | | 1,33,35,577.00 |
| | Add 4% Contingency: | | | | 5,33,423.00 |
| | **Total Amount Rs.:** | | | | **1,38,69,000.00** |

विभागाचा अभिप्राय- श्री साई धर्मशाळा इमारतींचे बांधकाम नियमानुकूल करणेसाठी तडजोड शुल्काची रक्कम तहसीलदार, राहाता यांचेकडे जमा केलेले आहे. सदरहु बांधकाम नकाशे छाननी साठी सहाय्यक संचालक नगररचना, अहमदनगर यांचेकडे पाठविण्यात आले आहे. उप विभागीय अधिकारी, शिर्डी यांचेकडून सदरहू प्रकल्पास बांधकाम परवानगी प्राप्त झालेनंतर पार्किंगचे ठिकाणी करावयाचे टेन्साईल फॅब्रीक शेडला उप विभागीय अधिकारी, शिर्डी यांचेकडून बांधकाम परवानगी घेणे आवश्यक राहील.

मागणी- तरी सदरहूकामी येणारे रक्कम रु.१,३८,६९,०००/-मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१७२ मधील साईधर्मशाळा परिसरात साईभक्तांचे सोयीसाठी टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु.१,३८,६९,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.०६** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने शिर्डी शहरामधुन जाणाऱ्या कोपरगाव-कोल्हार (प्र.रा.मा.८) या राष्ट्रीय महामार्गावर उत्तर बाजुस तात्पुरत्या स्वरुपात स्वागत कमान उभारणे कामाचे ठेकेदार यांचे देयक आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः- अधिनियमाचे कलम १७ (१) नुसार राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मीक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील, अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठरावः- मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३१ अन्वये खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आलेला आहे.

“ संस्थानमार्फत नगर-मनमाड हायवेवर देणगीदारामार्फत तात्पुरत्या स्वरुपात स्वागत कमानी तयार करण्याचे काम चालू आहे. सदर कमानी उभारणेकामी देणगीदाराने रक्कम न दिल्यास ती संस्थानमार्फत अदा करणेस मान्यता देण्यात आली, तसेच शक्य होईल तेवढी कामे संस्थानचे संबधीत विभागामार्फत करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच स्वागत कमानीचे ठिकाणी लाईटींग व फुलांची सजावट करण्यात यावी. ”

प्रस्तावना- श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षा निमीत्त कोपरगाव-कोल्हार (प्र.रा.मा.८) यावर तात्पुरत्या स्वरुपात स्वागत कमानी उभारणीकरीता साईभक्त डॉ.सुमनजी, चेअरमन, साईधाम फौंडेशन, मुंबई यांनी त्यांचे दि.०४/०७/२०१८ रोजीचे व्हॉटस्‌ॲप व्दारे प्राप्त झालेल्या पत्राने देणगी दाखल स्वागत कमान उभारणे बाबत

ईच्छा प्रदर्शीत केली होती. त्यानुसार त्यांना देणगीदाखल कमान उभारणीचे काम सुरु करणेसाठी दि.११/०७/२०१८ रोजीच्या पत्राने कळविणेत आले होते.

साईधाम फौंडेशन, मुंबई यांचे मार्फत सदरहू कमानीचे कामातील सिव्हील व फॅब्रीकेशनचे काम अरिहंत इंजिनीअरींग वर्क्स, औरंगाबाद यांना देण्यात आले होते. ठेकेदार यांचेमार्फत सदरहू काम पुर्ण करण्यात आले आहे. ठेकेदार अरिहंत इंजिनीअरींग वर्क्स, औरंगाबाद यांनी त्यांचे दि.२४/१०/२०१८ रोजीचे पत्राने साईधाम फौंडेशन यांचेमार्फत सदरहू कामाचे पेमेंट केले जात नसलेबाबत कळविले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३१ अन्वये स्वागत कमानी उभारणेकामी देणगीदाराने ठेकेदार यांचे बिलाची रक्कम आदा न केल्यास ती संस्थानमार्फत अदा करणेस मान्यता देण्यात आली आहे.

आता, ठेकेदार अरिहंत इंजिनीअरींग वर्क्स, औरंगाबाद यांनी त्यांचे दि.२०/११/२०१८ रोजीचे पत्राने सदरहू कामाचे रु.१६,५५,५४०/- मात्रचे बिलापोटी रु.३,००,०००/- मात्र साईधाम फौंडेशन यांनी आदा केली असुन उर्वरीत बिलाची रक्कम रु.१३,५५,५४०/- मात्र मिळावी अशी विनंती केली आहे.

विभागाचा अभिप्राय- उपरोक्तप्रमाणे ठेकेदार अरिहंत इंजिनीअरींग वर्क्स, औरंगाबाद यांना बिलाची रक्कम आदा करणेपुर्वी साईधाम फौंडेशन व श्री.विलास महाडीक, प्रॉडक्शन डिझाईनर व आर्ट डायरेक्टर यांना सदरचे काम ठेकेदारास किती रक्कमेचे दिले होते व त्यापैकी त्यांना किती रक्कम आदा केलेली आहे याची विचारणा करुन उर्वरीत रक्कम ठेकेदार अरिहंत इंजिनीअरींग वर्क्स, औरंगाबाद यांना आदा करता येईल, असे मत आहे.

प्रस्ताव- तरी ठेकेदार अरिहंत इंजिनीअरींग वर्क्स, औरंगाबाद यांना स्वागत कमानीचे फॅब्रीकेशन व सिव्हील वर्कचे कामापोटी बिलाची रक्कम रु.१३,५५,५४०/- मात्र आदा करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७१९** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने शिर्डी शहरामधुन जाणाऱ्या कोपरगाव-कोल्हार (प्र.रा.मा.८) या राष्ट्रीय महामार्गावर उत्तर बाजुस तात्पुरत्या स्वरुपात स्वागत कमान उभारणीचे काम देगणीदाखल करणेबाबत साईभक्त डॉ.सुमनजी, चेअरमन, साईधाम फौंडेशन, मुंबई यांनी ईच्छा प्रदर्शीत केली होती. त्यानुसार साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांचे मार्फत सदरहू कमानीचे कामातील सिव्हील व फॅब्रीकेशनचे काम अरिहंत इंजिनीअरींग वर्क्स, औरंगाबाद यांना देण्यात आले होते. ठेकेदार यांचेमार्फत सदरहू काम पुर्ण करण्यात आले आहे.**

**तथापी, ठेकेदार अरिहंत इंजिनीअरींग वर्क्स, औरंगाबाद यांनी सदरहू कामाचे रक्कम रु.१६,५५,५४०/- मात्रचे बिलापोटी रक्कम रु.३,००,०००/- मात्र साईधाम फौंडेशन यांनी आदा केली असुन उर्वरीत बिलाची रक्कम रु.१३,५५,५४०/- मात्र साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांचेकडून मिळत नसल्याने सदरची उर्वरीत बिलाची रक्कम मिळणेबाबत विनंती केली आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांनी सदरचे काम ठेकेदार अरिहंत इंजिनीअरींग वर्क्स, औरंगाबाद यांना किती रक्कमेचे दिले होते व त्यापैकी त्यांना किती रक्कम आदा केलेली आहे, याची विचारणा करुन उर्वरीत बिलाची रक्कम रु.१३,५५,५४०/- मात्र ठेकेदार अरिहंत इंजिनीअरींग वर्क्स, औरंगाबाद यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच स्वागत कमानीवरील साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांचे नाव काढून टाकण्यात यावे व भविष्यात त्यांना संस्थानचे कोणतेही काम देऊ नये, असे ठरले.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टरांना नव्याने सुरु होत असलेल्या २०० % प्रोत्साहन (इन्सेंटिव्ह) भत्ता ऐवजी पुर्वीप्रमाणे दर मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधिल तरतुद:- कलम १७ (१) व १७ (२) (ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहारूय करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र.:- १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.३१/०८/२०१६ च्या सभेतील निर्णय क्र. ६०६ २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०२/२०१८ च्या सभेतील निर्णय क्र. १२६ ३) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२३/१०/२०१७ च्या सभेतील निर्णय क्र. ८६८ ४) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२२/०८/२०१८ च्या सभेतील निर्णय क्र. ५२५.

प्रास्ताविक:- श्री साईनाथ रुग्णालयातील तज्ञ वैद्यकीय अधिकारी व प्रशासकीय पदावर काम करणारे वैद्यकीय अधिकारी यांना प्रोत्साहन भत्ता लागु करणे बाबत मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेत विषय क्र. ८५ निर्णय क्र. ६०५ व मा. व्यवस्थापन समिती दि.१४/११/२०१७ विषय विषय क्र. १ निर्णय क्र.८६८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. ४ चे वित्त विभागाकडील पत्रान्वये श्री साईनाथ रुग्णालयातील तज्ञ वैद्यकीय अधिकारी व प्रशासकीय पदावर काम करणारे वैद्यकीय अधिकारी यांना दि.०१/०७/२०१८ पासुन २०० टक्के प्रोत्साहन (इन्सेंटिव्ह) भत्ता लागू करणेत आलेला आहे.

संदर्भ क्र. ५ चे पत्रान्वये श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉ. महेंद्र विलास तांबे व गोविंद श्रीपतराव कलाटे या दोघांनी दि.०२/१०/२०१८ रोजीचे अर्जान्वये वरिल प्रमाणे प्रोत्साहन भत्ता ऐवजी पुर्वीप्रमाणे दि.१५/०७/२०१६ राजीचे मा. व्यवस्थापन समितीचे विषय क्र. २५ निर्णय क्र. ६०६ अन्वये त्यांचे डयुटी व्यतिरिक्त संध्याकाळी ६ ते १० या वेळेस होणा-या मेडीयम ऑपरेशनसाठी रक्कम रु. ६५०/- व मेजर/तातडीचे ऑपरेशनसाठी रक्कम रु. १,२००/- (प्रति ऑपरेशनसाठी ) तसेच दि. १९/०४/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभा विषय क्र. २०, निर्णय क्र. १२६ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टरांचे संपुर्ण पदे भरेपर्यंत गरजेनुसार आहे त्याच भुलतज्ञ डॉक्टरांना रुटीन /तातडीच्या शस्त्रक्रियेकरीता मेडीयम ऑपरेशनसाठी रक्कम रु. ६५०/- व मेजर/तातडीचे ऑपरेशनसाठी रक्कम रु. १,२००/- (प्रति ऑपरेशनसाठी ) अतिरिक्त दर कायम ठेवणेकरीता अर्जान्वये विनंती केलेली आहे.

विभागाचे मत :-सद्यस्थितीला श्री साईनाथ रुग्णालयातील तज्ञ तसेच अतिविशिष्ट तज्ञ सर्वच डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता लागु झाला असलेमुळे भुलतज्ञ डॉक्टरांना देखील सदरचा प्रोत्साहन भत्ता लागू झाला आहे. याकरीता त्यांना सर्वच ऑपरेशन करणे आवश्यक आहे. तशा आशयाचा मुद्दा क्र. १४ प्रोत्साहन भत्ता नियमावलीमध्ये टाकण्यात आलेला आहे. त्यामध्ये असे नमुद केलेले आहे की, रुग्णालयात कार्यरत भुलतज्ञांना सायंकाळी ६०० वाजेनंतर नियोजित व तातडीच्या शस्त्रक्रियेसाठी उपस्थित राहणे आवश्यक राहील, त्याचा कोणताही वेगळा मोबदला मिळणार नाही. परंतु भुलतज्ञ डॉक्टरांची डयुटी ही सकाळी ०८.०० ते सायंकाळी ०४.०० अशी असलेमुळे सदरच्या डयुटीचे वेळेत होणा-या शस्त्रक्रिया भुलतज्ञ डॉक्टर्स देत आहेत. सायंकाळी ०६.०० वाजेनंतरच्या अतिरिक्त केसेससाठी त्यांना वरिल नियमाप्रमाणे अतिरिक्त भत्ता मिळत नसलेमुळे त्यांनी केसेस देणेस तोंडी नकार दिलेला आहे. यासंबंधी रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षिका यांचेशी त्यांनी चर्चा केली परंतु सदरचा निर्णय हा मा. व्यवस्थापन समितीचा असलेमुळे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करावी असे ठरले.

श्री साईनाथ रुग्णालयात आठवडयातून तीन दिवस (मंगळवार, बुधवार, गुरुवार) सायंकाळी ०६.०० वाजेनंतर डॉ. राम नाईक यांचे विभागातील साधारणपणे १० ते १५ केसेस दैनंदिन होत असतात. डॉ. राम नाईक स्वतः सदर केसेसचा कोणताही मोबदला घेत नाहीत परंतु भुलतज्ञ डॉक्टरांनी सदरच्या केसेस देणेस नकार दिलेला असलेमुळे डॉ. राम नाईक यांचे देखरेखेखाली असलेल्या रुग्णांचे ऑपरेशन सद्यस्थितीला होत नाहीत. प्रसंगी रुग्णांना डिसचार्ज करावा लागतो. याकरीता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेबरोबर रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षिका, जनरल सर्जन डॉ. राम नाईक, भुलतज्ञ डॉ. मनिषा शिरसाठ, डॉ. महेंद्र तांबे, डॉ. गोविंद कलाटे यांनी चर्चा केली असता डॉ. राम नाईक यांचे कामाचा आवाका पहाता व रुग्णांची त्यांचेवरील श्रध्दा पहाता भुलतज्ञ डॉक्टरांना खालीलपैकी कोणताही एक भत्ता स्विकारणेकामी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुभा दिली व तशा आशयाचा अर्ज करणेस सांगितले.

१) इतर डॉक्टरांप्रमाणेच २०० प्रोत्साहन भत्ता स्विकारावा व सर्व केसेस कराव्यात.

२) पुर्वीप्रमाणेच सायं. ०६.०० वाजेनंतरच्या केसेससाठी मा. व्यवस्थापन समिती निर्णयाप्रमाणे मेडीयम ऑपरेशनसाठी रक्कम रु. ६५०/- व मेजर/तातडीचे ऑपरेशनसाठी रक्कम रु. १,२००/- (प्रति ऑपरेशनसाठी ) मानधन घेण्यात यावे.

या अनुषंगाने भुलतज्ञ डॉक्टरांनी दि.०२/१०/२०१८ रोजी पुर्वीप्रमाणे भत्ता मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे. श्री साईनाथ रुग्णालयात सद्यस्थितीला दोनच भुलतज्ञ डॉक्टर्स कार्यरत आहेत. तरी सदर डॉक्टरांवर ताण पडू नये याकरीता यापुर्वी दि. ०२/०२/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णय क्र. १२६ अन्वये डॉक्टरांचे पॅनल बनविणे कामी मान्यता दिलेली होती. त्यानुषंगाने एकुण चार भुलतज्ञ डॉक्टर्स पॅनलवर घेतलेले आहेत. व आवश्यकतेनुसार त्यांना ऑनकॉल बेसीस शस्त्रक्रीयेकरीता बोलविणेस सुरु आहे. तरीदेखील तरी देखील डॉ. तांबे व डॉ. कलाटे हे रुग्णालयातील कायम भुलतज्ञ डॉक्टर्स असलेमुळे त्यांनी

दिलेल्या अर्जाचा विचार करता खालील अटी शर्तीवर त्यांना सायंकाळी ०६.०० नंतरच्या केसेसचे अतिरिक्त मानधन देण्यात यावे.

३) डॉ. राम नाईक यांचे विभागात आठवडयातुन तिनच दिवस (मंगळवार, बुधवार, गुरुवार) सायं. ६ वाजेनंतर केसेस होत आहेत. पैकी रुटीन शेडयुलप्रमाणे ज्या भुलतज्ञ डॉक्टरांची डयुटी डॉ. राम नाईक यांचे विभागाकरीता असेल त्यांनी डॉ. नाईक यांचे केसेस कराव्यात उर्वरित दिवशी कायम भुलतज्ञ डॉक्टरांना प्राधान्य द्यावे. अन्यथा पॅनलवरील भुलतज्ञ डॉक्टरांना बोलविता येईल.

४) सदर भुलतज्ञ डॉक्टरांनी रोटेशनप्रमाणे ऑनकॉल डयुटी आठवडयातून दोन दिवस (प्रत्येकी दोन दिवस ) करणे आवश्यक आहे. त्याचा कोणताही मोबदला देता येणार नाही. उर्वरित दिवशी पॅनलवरील असलेल्या डॉक्टरांना बोलविता येईल.

५) भुलतज्ञ डॉक्टरांनी दोन रविवार (ऑन कॉन डयुटी) प्रत्येकी १ रविवार अशी करावी व त्याचा कोणताही C-Offदेता येणार नाही. तसेच उर्वरीत रविवार बाहेरुन पॅनलवरील भुलतज्ञ बोलविता येईल.

६) तसेच पुर्णवेळ भुलतज्ञ डॉक्टर्स रजेवर असतील तर पॅनलवरील भुलतज्ञांना आवश्यकतेनुसार बोलविता येईल.

७) जेणेकरुन कोणतीही केस त्यांच्या डयुटीत Postponed होणार नाही, याची संपुर्ण दक्षता भुलतज्ञ डॉक्टरांची राहील.

तरी यामध्ये काही गैरप्रकार / टाळाटाळ आढळलेस भुलतज्ञ डॉक्टरांना देण्यात येणारा अतिरिक्त भत्ता वसुल करणेत येईल. तसेच नियमाप्रमाणे एकाच वेळी अनेक गोष्टीचा लाभ देता येणार नाही. यामुळे एकाच वेळी दुस-या ओटीसाठी दि. ०२/०२/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. १२६ अन्वये देणेत येणारा अतिरिक्त भत्ता देखील यापुढे देता येणार नाही.

श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व डॉक्टरांना २०० टक्के प्रोत्साहन भत्ता देत असलेमुळे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सासंवि १०१७९८०प्र.क्र.१०८/का.१६ व दि. २२/०८/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभा विषय क्र. २०, निर्णय क्र. ५२५ अन्वये सर्व डॉक्टरांचे ०३ व ०६ वेतनवाढी रद्द करणेत आलेले आहे. त्याप्रमाणे भुलतज्ञ डॉक्टरांच्या देखील तीन व सहा वेतनवाढी बाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

१. श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टरांना सायंकाळी ०६ ते १० या वेळेत होणा-या शस्त्रक्रीयेचा मिळणार भत्ता खालीलप्रमाणे (लाभ क्र. ०१)

| अ.नं. | भुलतज्ञ डॉक्टरांचे नांव | महिना | एकुण केसेस | | | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मेडियम | मेजर | एकुण | |
| ०१ | डॉ. श्रीपत गोविंदराव कलाटे | फेब्रुवारी-१८ | ११ | १६ | २७ | २६९०० |
| | | मार्च -१८ | १४ | ३३ | ४७ | ४८७०० |
| | | एप्रिल -१८ | १६ | ३७ | ५३ | ५४८०० |
| | | मे -१८ | १८ | ३८ | ५६ | ५७३०० |
| | | जुन -१८ | २१ | ४७ | ६८ | ७००५० |
| एकुण | | | ८० | १७१ | २५१ | २५७७५० |

| अ.नं. | भुलतज्ञ डॉक्टरांचे नांव | महिना | एकुण केसेस | | | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मेडियम | मेजर | एकुण | |
| ०२ | डॉ. महेंद्र विलासराव तांबे | फेब्रुवारी-१८ | १७ | २३ | ४० | ३८६५० |
| | | मार्च -१८ | ०६ | २६ | ३२ | ३५६५० |
| | | एप्रिल -१८ | १४ | ३७ | ५१ | ५३५०० |
| | | मे -१८ | १३ | ३८ | ५१ | ५४०५० |
| | | जुन -१८ | २४ | ४४ | ६८ | ६७८५० |
| एकुण | | | ७४ | १६८ | २४२ | २४९७०० |

०२. श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टरांना अतिरिक्त ओ.टीसाठी रुटीन/ तातडीच्या शस्त्रक्रीयेचा मिळणार भत्ता खालीलप्रमाणे (लाभ क्र. ०२)

| अ.नं. | भुलतज्ञ डॉक्टरांचे नांव | महिना | एकुण केसेस | | | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मेडियम | मेजर | एकुण | |
| ०१ | डॉ. श्रीपत गोविंदराव कलाटे | फेब्रुवारी-१८ | ०७ | १४ | २१ | २०१५० |
| | | मार्च -१८ | ०१ | ०३ | ०४ | ४२५० |
| | | एप्रिल -१८ | ०२ | ०४ | ०६ | ६१०० |
| | | मे -१८ | ० | ०५ | ०५ | ६००० |
| | | जुन -१८ | ० | ०३ | ०३ | ३६०० |
| | | एकुण | १० | २९ | ३९ | ४०१०० |

| अ.नं. | भुलतज्ञ डॉक्टरांचे नांव | महिना | एकुण केसेस | | | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मेडियम | मेजर | एकुण | |
| ०२ | डॉ. महेंद्र विलासराव तांबे | फेब्रुवारी-१८ | ०१ | ०४ | ०५ | ५४५० |
| | | मार्च -१८ | ० | ०४ | ०४ | ४८०० |
| | | एप्रिल -१८ | ०२ | ०७ | ०९ | ९७०० |
| | | मे -१८ | ०२ | १० | १२ | १३३०० |
| | | जुन -१८ | ० | ०२ | ०२ | २४०० |
| | | एकुण | ०५ | २७ | ३२ | ३५६५० |

भुलतज्ञ डॉक्टरांना एकुण (लाभ क्र. ०१ व ०२) अदा होणारी रक्कम

| अ.नं. | भुलतज्ञ डॉक्टरांचे नांव | महिना | ०६ ते १० या वेळेतील लाभ | रुटीन/तातडीच्या शस्त्रक्रीया दुस-या ओटीचा लाभ | एकुण अदा होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ. श्रीपत गोविंदराव कलाटे | फेब्रुवारी-१८ | २६९०० | २०१५० | ४७०५० |
| | | मार्च -१८ | ४८७०० | ४२५० | ५२९५० |
| | | एप्रिल -१८ | ५४८०० | ६१०० | ६०९०० |
| | | मे -१८ | ५७३०० | ६००० | ६३३०० |
| | | जुन -१८ | ७००५० | ३६०० | ७३६५० |
| | | एकुण | २५७७५० | ४०१०० | २९७८५० |

| अ.नं. | भुलतज्ञ डॉक्टरांचे नांव | महिना | ०६ ते १० या वेळेतील लाभ | रुटीन/तातडीच्या शस्त्रक्रीया दुस-या ओटीचा लाभ | एकुण अदा होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | डॉ. महेंद्र विलासराव तांबे | फेब्रुवारी-१८ | ३८६५० | ५४५० | ४४१०० |
| | | मार्च -१८ | ३५६५० | ४८०० | ४०४५० |
| | | एप्रिल -१८ | ५३५०० | ९७०० | ६३२०० |
| | | मे -१८ | ५४०५० | १३३०० | ६७३५० |
| | | जुन -१८ | ६७८५० | २४०० | ७०२५० |
| | | एकुण | २४९७०० | ३५६५० | २८५३५० |

०३. भुलतज्ञ डॉक्टरांचे मुळ वेतनामध्ये जादा ०३ व ०६ वेतनवाढी देखील अदा केलेले आहे. (लाभ क्र. ०३ )
वैद्यकीय संचालक यांचे अभिप्रायः-

अ. सदर भुलतज्ञांच्या विनंती अर्जानुसार त्यांना माहे जुलै-२०१८ पासून नव्याने सुरु होत असलेल्या २०० टक्के प्रोत्साहन भत्ता न देता व त्यांची प्रोत्साहन वर वेतनवाढ ( ०३ किंवा ०६ इंक्रीमेंट) कमी न करता त्यांना त्यांना आहे तेच वेतन ठेवणेत यावे व मा.व्य. समिती सभा दि. ३१/०८/२०१६ रोजीच्या विषय क्र. २५ निर्णय क्र. ६०६ अन्वये भुलतज्ञांना संध्याकाळी ०६ ते १० या वेळेत होणा-या सर्व केसेस व आवश्यक असलेल्या मिडीयम ऑपरेशनसाठी रुपये ६५० व मेजर तातडीचे ऑपरेशनसाठी रुपये १२०० याप्रमाणे (प्रत्येकी ऑपरेशनसाठी) दर देण्यात यावे तसेच डॉ.राम नाईक यांचे सायंकाळी ०६ नंतर च्या केसेस करणेसाठी पुर्ण वेळ भुलतज्ञ डॉक्टरांना प्राधान्य देण्यात यावे. जर पुर्ण वेळ भुलतज्ञ रजेवर असतील तर पॅनलवरील व्हिजीटींग भुलतज्ञांना बोलविणेत यावे.

आ. मा. व्य.समिती सभा दि. ०२/०२/२०१८ विषय क्र. २० मधील विभागाचे अभिप्राय व निर्णय क्र. १२६ नुसार श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टर्स दोन ऑपरेशन थिएटरमधील शस्त्रक्रीया पार पाडत आहे. त्यांनी दोन ऑपरेशन थिएटरमधील शस्त्रक्रीया ॲडजेस करुन तिस-या थिएटरमध्ये शस्त्रर्कीया कराव्यात. तिस-या ऑपरेशन थिएटरकरीता या दोन भुलतज्ञांना पुर्वी निश्चीत केलेप्रमाणे मिडीयम ऑपरेशनसाठी रुपये ६५० व मेजर तातडीचे शस्त्रक्रीयेसाठी रु. १२०० दर देता येईल. याकरीता पुर्णवेळ भुलतज्ञांना प्राधान्य देण्यात यावे. जर पुर्णवेळ भुलतज्ञ रजेवर असतील तर पॅनलवरील व्हिजीटींग भुलतज्ञांना बोलविणेत यावे.

इ. पुर्णवेळ भुलतज्ञ व पॅनलवरील नेमलेल्या व्हिजीटींग भुलतज्ञांचे दरामध्ये तफावत नसावी.

विभागाचा अभिप्राय :-श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता लागु होणेपुर्वी सदर भुलतज्ञ डॉक्टरांना सायं ६ ते १० या वेळेत तसेच अतिरिक्त शस्त्रक्रियेसाठी अंदाजे ४०,०००/- ते ५०,०००/- इतका भत्ता मिळत होता. सद्यस्थितीला त्यांना २०० टक्के प्रमाणे इन्सेंटिव्ह साधारणपणे तितकाच म्हणजे अंदाजे ५०,०००/- एवढा मिळत आहे.

करीता,
०१. भुलतज्ञ डॉक्टर्स यांची दि. ०२/१०/२०११ रोजीच्या अर्जाचा विचार होणेस
०२. दि. ०१/०७/२०१८ रोजी पासून लागू केलेल्या प्रोत्साहन भत्ता (इन्सेंटिव्ह) रद्द करणेस
०३. सायंकाळी ०६ ते १० या वेळेचे केसेसचे दर भुलतज्ञ डॉक्टरांना पुर्वीप्रमाणे लागू होणेस.
०४. तातडीचे / रुटीन शस्त्रक्रीया दर देणेस विचार होणेस
०५. भुलतज्ञ डॉक्टर्स यांचे जादा देणेत आलेल्या तीन व सहा पगारवाढी (इंक्रीमेंट)बाबत निर्णय होणेस.
०६. दि. ०१/०७/२०१८ पासून आत्तापर्यत देणेत आलेल्या प्रोत्साहन भत्ता वसूल होणे बाबत निर्णय होणेस.(२००% प्रमाणे)

सदरचा प्रस्ताव उपरोक्त अटीशर्ती प्रमाणे अ.नं.०१ ते ०६ मुद्दयावरील निर्णय होणेकरीता अथवा वैद्यकिय संचालक यांनी दिलेल्या अभिप्राय नुसार निर्णय घेण्याकरीता सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७२० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉ. महेंद्र विलास तांबे व डॉ.गोविंद श्रीपतराव कलाटे या दोघांनी दि.०२/१०/२०१८ रोजीचे अर्जान्वये जुलै-२०१८ पासून नव्याने सुरु झालेला २०० टक्के प्रोत्साहन भत्ता न देता पुर्वीप्रमाणे मिडीयम ऑपरेशनसाठी रक्कम रु. ६५०/- व मेजर/तातडीचे ऑपरेशनसाठी रक्कम रु. १,२००/- (प्रति ऑपरेशनसाठी ) अतिरिक्त दर कायम ठेवणेबाबत केलेली विनंती मान्य करण्यात आली.**

**श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टरांना माहे जुलै-२०१८ पासून नव्याने सुरु झालेला २०० टक्के प्रोत्साहन भत्ता न देता पुर्वीप्रमाणेच सायंकाळी ०६.०० ते १०.०० या वेळेत होणारे सर्व ऑपरेशन तसेच आवश्यक असलेले मिडीयम ऑपरेशनसाठी रक्कम रु.६५०/- व मेजर/तातडीचे ऑपरेशनसाठी रक्कम रु.१२००/- या प्रमाणे प्रत्येक ऑपरेशनसाठी दर देण्यात यावे. तसेच डॉ.राम नाईक यांच्या सायंकाळी ०६ नंतर होणाऱ्या केसेस करणेसाठी पुर्ण वेळ भुलतज्ञ डॉक्टरांना प्राधान्य देण्यात यावे. जर पुर्ण वेळ भुलतज्ञ डॉक्टर रजेवर असतील तर पॅनलवरील व्हिजीटींग भुलतज्ञ डॉक्टरांना बोलविण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही - वैद्यकीय संचालक)**

---

आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

आयत्या वेळेचा
विषय नं.०८, निर्णय क्र.७२१ महाराष्ट्र दुकाने व व्यापारी संस्था कायदा २०१७ मधील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना दि.०१.१२.२०१८ पासून भरपगारी साप्ताहिक सुट्टी (Paid Weekly Off ) देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- प्र.कामगार अधिकारी, कामगार विभाग/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०९, निर्णय क्र.७२२ शिर्डी नगरपंचात हद्दीतील नगरपंचायत मालकीच्या सर्व्हे क्र.१०३ मधील ॲमेनिटी स्पेस व ओपन स्पेस येथे इनडोअर स्टेडीयम तसेच ऑडीटोरीयम विकसीत करणेबाबतचे प्रस्तावात मा.छाननी समितीचे दि.२२.०८.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३९ नुसार काढलेल्या त्रुटींबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी जा.क्र.नप/टे-०८/३०१३/२०१८, दि.२०.११.२०१८ नुसार पुर्तता अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाची नोंद घेण्यात आली व इनडोअर स्टेडीयम तसेच ऑडीटोरीयम विकसीत करणेसाठी रक्कम रु.१२,०८,८३,६७४/-मात्र एवढे अनुदान मागणीचा प्रस्ताव पुर्तता अहवालासह पुन्हा मा.छाननी समितीपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१०, निर्णय क्र.७२३ दि.०५.१०.२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.६१३/२० खालील प्रमाणे झालेला आहे.

"जिल्हा परिषद, अहमदनगर यांना नवीन शाळा खोल्या बांधकामासाठी मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीने कळविलेल्या शाळा खोल्यामधुन शाळांची निवड दि.०३.०९.२०१८ रोजीच्या स्थानिक उपसमितीचे सभेमध्ये करण्यात आली होती. मात्र यावर पुन्हा चर्चा होऊन मा.जिल्हाधिकारी यांनी फेर आढावा घेतल्यानंतर त्यांचेकडून नव्याने नवीन शाळा खोल्यांची गरज असलेल्या शाळांची नावे व संख्या प्राप्त झाल्यानंतर नव्याने शाळा खोल्यांची निवड करण्यासाठी प्रस्ताव स्थानिक उपसमिती सभेपुढे सादर करण्यात यावा, तोपर्यत पहिल्या टप्पयातील अनुदान रु.१० कोटी स्थगित ठेवण्यात यावे. अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

आजचे सभेमध्ये उपरोक्त निर्णयावर सविस्तर चर्चा होऊन, विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/८९३/प्र.क्र.८८/का.१६ दि.२६ जुन,२०१८ अन्वये जिल्हा परिषद, अहमदनगर यांना शाळांच्या नविन खोल्या बांधण्यासाठी पहिल्या टप्प्यात रु.१० कोटी इतके अनुदान देण्यास मान्यता मिळालेली आहे.जिल्हा परिषद, अहमदनगर यांना नवीन शाळा खोल्या बांधकामासाठी मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीने कळविलेल्या शाळा खोल्यामधुन शाळांची निवड दि.०३.०९.२०१८ रोजीच्या स्थानिक उपसमितीचे सभेमध्ये करण्यात आली होती. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील अनुदान रक्कम रु.१० कोटी जिल्हा परिषद,अहमदनगर यांचेमार्फत शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग,अहमदनगर यांचेकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच जिल्हा परिषद, अहमदनगर यांना उर्वरीत रक्कम रु.२० कोटी अनुदान देणेबाबतच्या प्रस्तावास शासन मान्यता मिळाल्यानंतर मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीकडून उर्वरीत शाळा खोल्यांची यादी मागविण्यात यावी. मा.जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या शाळा खोल्यांची निवड करण्यासाठी प्रस्ताव पुन्हा मा.स्थानिक उपसमितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा. मा.उपसमितीचे शिफारशीनुसार व मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने निवड करण्यात आलेल्या शाळा खोल्यांकरीता दुसऱ्या टप्प्यातील रक्कम रु.२० कोटी अनुदान जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेमार्फत शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग,अहमदनगर यांचेकडे वर्ग करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.११, निर्णय क्र.७२४ दि.०१.११.२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.१७, निर्णय क्र.६९४ अन्वये ठरलेनुसार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, कंत्राटी सल्लागार (सेवा निवृत्त नायब तहसिलदार) यांनी मागील एक वर्षात केलेल्या कामाचा अहवाल सादर केलेला असुन सदरचा अहवाल समाधानकारक असल्याने त्यांना दि.१९.१०.२०१८ पासून दि.१८.०९.२०१९ पर्यंत ११ महिने या कालावधीसाठी एकत्रित रक्कम रु.२५,०००/- मात्र इतक्या मासिक मानधन तत्वावर कंत्राटी कर्मचारी म्हणून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१२, निर्णय क्र.७२५ शिर्डी नगरपंचायतीचे अग्निशमन वाहन खरेदीसाठी संस्थानकडून रक्कम रु.५० लक्ष निधी ची मागणी केली होती. याबाबत सविस्तर फेरप्रस्ताव सादर करणेबाबत शिर्डी नगरपंचायतीस कळविण्यात आले होते. त्यानुसार मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी फोम टेंडर अग्निशमन वाहन खरेदीचा सविस्तर प्रस्ताव सादर केला असुन सदर प्रस्तावाचे अवलोकन करुन शिर्डी नगरपंचायतीस अग्निशमन वाहन खरेदीसाठी रक्कम रु.५० लक्ष मात्र निधी देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदरचा प्रस्ताव शिफारशीसाठी मा.छाननी समितीपुढे ठेवून त्याचे शिफारशीनंतर शासन मान्यतेने निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- - मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१३, निर्णय क्र.७२६ मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये व्हॅटकराचे संबधीत रिट अर्ज दाखल करण्यासंबधीत ॲड आर.एन.धोर्डे यांची फी रक्कम रु.२ लाख आदा करणेस तसेच आयकर विषयक मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका सुनावणीसंबधीत वरिष्ठ वकील श्री.एस.गणेश यांच्या दिल्ली ते मुंबई व मुंबई ते दिल्ली या विमान प्रवासाची तिकीटे Trail Blazer Tours India Pvt.Ltd. या संस्थेमार्फत काढण्यात आली होती.सदर तिकीटाची रक्कम रु.१,४८,८८८/- मात्र Trail Blazer Tours India Pvt.Ltd. या संस्थेस RTGS व्दारे आदा करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्र.विधी अधिकारी,विधी विभाग/मुख्यलेखाधिकारी)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१४, निर्णय क्र.७२७ श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग प्रकल्पाचे ठेकेदार भानु कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री. दर्शन भानुशाली (पार्टनर) हे आजचे सभेपुढे उपस्थित होते. सदर प्रकल्पाचे बांधकामासाठी राहाता व लगतचे तालुक्यामध्ये नैसर्गिक वाळू उपलब्ध नसल्याने Artificial Sand वापरणेस परवानगी मिळणेबाबत त्यांनी सभेस विनंती केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर कामाचे निविदा शर्तीनुसार नैसर्गिक वाळू उपलब्ध नसल्यास तातडीचे परिस्थीतीत Artificial Sand वापरणेस परवानगी देण्याची तरतुद असल्याने, ठेकेदार भानु कन्स्ट्रक्शन, मुंबई यांना सदर प्रकल्पासाठी नैसर्गिक वाळू उपलब्ध होईपर्यत परंतु जास्तीत जास्त दि.३१ डिसेंबर,२०१८ अखेर पर्यंतचे कालावधीकरीता VSI Quality Artificial Sand आवश्यक त्या तपासण्या करुन वापरण्यास परवानगी देण्यात यावी, तसेच या कालावधीनंतर नैसर्गिक वाळूचे उपलब्धतेबाबत आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)

---

वरील निर्णय क्र.६९७ ते ७२७ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर दुपारी ०३.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.